सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, १० डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २५६ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# ठरलं तर! १६ डिसेंबर रोजी नागपुरात होणार हिवाळी अधिवेशन सुरु

मुंबई : राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आले आहे. त्यानंतर आता विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूरमध्ये होणार आहे. या संदर्भातील तारीख जाहीर करण्यात आली असून, १६ डिसेंबर रोजी नागपुरात हिवाळी अधिवेशन सुरू होणार असल्याची घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली आहे.



विधानभवन येथे विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. यावेळी अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली.

या अधिवेशनादरम्यान आमदारांचा शपथविधी, राज्यपालांचे अभिभाषण आदी पार पडेल. सध्या मुंबई राज्याचे ३ दिवसीय विशेष अधिवेशन सुरू आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात होत आहे. हे सत्र आठवडाभर असेल. तसेच १२ डिसेंबरपासून सचिवालय आणि १५ डिसेंबरपर्यंत संपूर्ण सरकार नागपुरात दाखल होणार आहेत.

दरम्यान, नागपूरात होणाऱ्या अधिवेशनाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून मंत्र्यांच्या निवासस्थानाबाहेर नवीन नावाच्या पाट्या लावण्यात येत आहेत. एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानाबाहेर नवीन नावाची प्लेट लावण्यात आली आहे. ज्यामधाये एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे असे लिहिले आहे. त्यांना देवगिरी बंगला देण्यात आलेला आहे.

विदर्भाचे अनेक प्रश्न या हिवाळी अधिवेशनात मार्गी लागणार का? प्रत्येकजण उत्सुक आहे. याशिवाय मुख्यमंत्री स्वतः विदर्भातील असल्याने लोकप्रतिनिधींसह विदर्भातील जनतेकडूनही विशेष अपेक्षा असल्याचे बोलले जाते. विदर्भाच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी नागपुरात हिवाळी अधिवेशन घेतले जात आहे.

दरम्यान, आज महाराष्ट्र सरकारचा विश्वासदर्शक ठराव मंजूर करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना नेते उदय सामंत यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे दिलीप वळसे-पाटील, भाजपचे आमदार संजय कुटे आणि आमदार रवी राणा यांनी सरकारवर विश्वासदर्शक ठराव मांडला होता. यावेळी आवाजी मताने विश्वास दर्शक ठराव मंजूर करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळावर ही विधानसभा पूर्ण विश्वास करत आहे, अशा पद्धतीनं हा ठराव मांडण्यात आला. या बैठकीला विधानसभा अध्यक्ष ड.राहुल नार्वे कर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, यांच्यासह कामकाज सल्लागार समितीचे सदस्य, विधिमंडळ सचिव जितेंद्र भोळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## पुन्हा थंडी आली हो! राज्यातील तापमानाचा पारा घसरला



मुंबई: गायब झालेली थंडी राज्यात पुन्हा वाढू लागली आहे. राज्यातील अनेक भागांतील तापमान एका दिवसांत ४ अंशांनी घसरले आहे. यामुळे राज्यात अनेक ठिकाणी चांगलाच गारवा जाणवत आहे. राज्यातील तापमानात आणखी घसरण होणार असल्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.

गेल्या आठवड्यात फेंगल चक्रीवादळामुळे थंडी गायब झाली होती. राज्यातील तापमानात वाढ झाली होती. मात्र आता हे वादळ गेल्याने थंडीचा जोर पुन्हा एकदा वाढू लागले. तसेच गार वारेही वाहत आहेत. पुण्यामध्ये डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यातील तापमान २० अंशापर्यंत गेले होते. त्यामुळे काही दिवस उकाडा जाणवत होता. मात्र आता पुन्हा तापमान घसरू लागल्याने थंडी परत आली आहे. रविवारपासून राज्यातील अनेक ठिकाणी नाशिक, पुणे, खांदेश, धुळे तापमान अचानक घसरले. हे घसरलेले तापमान १८ डिसेंबरपर्यंत राहण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे. उंचीवरून वाहणाऱ्या उच्च वेगवान पश्चिम वाऱ्यांच्या झोतामुळे तापमानाचा पारा आणखी घसरेल. तसेच जम्मू-काश्मीरमधील बारामुल्ला परिसरासह अनेक ठिकाणी बर्फ पडत आहे.

# सीमा भागातील मराठी भाषिकांच्या पाठीशी राज्य शासन ठाम उभे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. ९ डिसेंबर :- कर्नाटक सरकारकडून बेळगावसह सीमा भागातील मराठी भाषिक जनतेवर सुरु असलेल्या अन्यायाचा आम्ही निषेध करतो. मराठी माणसांनी मेळावे घेऊ नयेत, अशी कर्नाटक सरकारने घेतलेली भूमिका घटनात्मक अधिकारांचे उल्लंघन करणारी आहे. तसेच कर्नाटक सरकारमधील एका मंत्र्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांची कर्नाटक विधानसभेतील प्रतिमा काढणार असल्याचे वक्तव्य केले, हे गंभीर असून या घटनेचा राज्य शासन निषेध करत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत स्पष्ट केले. तसेच महाराष्ट्र विधानमंडळ सीमाभागातील मराठी भाषिकांच्या पाठीशी ठामपणे उभे असून बेळगाव, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र होत नाही तोवर आमचा लढा सुरूच राहणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्यातील १२ कोटी जनता आणि जगभरातील मराठी माणूस कर्नाटक सीमाभागातील मराठी माणसाच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. सीमा भागातील मराठी भाषिकांसाठी आम्ही शिक्षण, आरोग्य सेवा उपलब्ध केल्या आहेत. यापुढे देखील सीमा भागातील मराठी भाषिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आमचे सरकार तत्पर राहील.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, सीमा भागातील मराठी भाषिकांच्या मेळाव्याला कर्नाटक सरकारने विरोध केला. महाराष्ट्र एकीकरण समितीचे सदस्य यांना अटक करण्यात आली. तसेच लोकप्रतिनिधींना स्थानबद्ध करण्यात आले. या कर्नाटक सरकारच्या कृत्याचा महाराष्ट्र शासन तीव्र निषेध करीत आहे. मी देखील मराठी भाषिकांच्या लढ्यात तुरुंगवास भोगला असून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जी भूमिका होती तीच भूमिका आमच्या सरकारची आहे. सर्वोच्च न्यायालयात शासनाच्या वतीने वकील दिले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे देखील यापूर्वी या प्रश्नाबाबत बैठक झाली होती. या बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा होऊन देखील कर्नाटक सरकार अशी भूमिका घेत असेल तर कर्नाटक सरकारच्या या भूमिकेचा आम्ही निषेध करतो, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत बोलताना स्पष्ट केले. याबाबत विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

# शेतकऱ्यांचा पुन्हा दिल्ली चलो एल्गार!

## शंभू सीमेवरून १०१ शेतकरी कूच करणार

नवी दिल्ली : दिल्लीत संसदेत हिवाळी अधिवेशन सुरु असून यापार्श्वभूमीवर आता शेतकऱ्यांनी पुन्हा आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. मागण्या मान्य होत नसल्यामुळे शेतकऱ्यांनी पुन्हा 'दिल्ली चलो'चा नारा दिला असून किसान मजदूर मोर्चा आणि एसकेएम गटातील १०१ शेतकरी आज दिल्लीकडे कूच करणार आहेत. परंतु हे आमदोलन रोखण्यासाठी पंजाब-हरियाणा सीमेवर मोठ्या प्रमाणात सुरक्षा तैनात करण्यात आल्या आहेत.



शेतकरी नेते सर्वनसिंग पंढेर यांनी दिलेल्या माहितीनुसार, किमान आधारभूत किंमतीसाठी कायदेशीर हमीसह त्यांच्या चिंता आणि मागण्यांबाबत केंद्राकडून चर्चेसाठी कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे आज त्यांनी १०१ शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ दुपारी १२ च्या सुमारास दिल्लीकडे पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.

परंतु यादरम्यान केंद्राने शेतकरी आणि मजुरांशी चर्चा न करण्याचा निर्णय घेतला असून ते आम्हाला रोखण्यासाठी बळाचा वापर करत आहेत. त्यामुळे यावेळी ते शांततेत आणि शिस्तीने दिल्लीत जाणार असल्याचे सांगितले.

**मागण्या काय ? :** नवीन भूसंपादन कायद्यानुसार १ जानेवारी २०१४ नंतर संपादित केलेल्या जमिनीच्या चौपट मोबदला मिळायला हवा, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. गेल्या १० वर्षांपासून गौतम बुद्ध नगरमध्ये सर्कलचे दर वाढलेले नाहीत. नवीन भूसंपादन कायद्याचा लाभ जिल्ह्यात लागू झाला पाहिजे. भूसंपादनाच्या बदल्यात १० टक्के विकसित जमीन द्यावी आणि ६४.७ टक्के दराने भरपाई द्यावी, अशी शेतकऱ्यांची इच्छा आहे. जमीनदार आणि भूमिहीन शेतकऱ्यांच्या मुलांना रोजगार आणि पुनर्विकासाचा लाभ मिळावा. उच्चाधिकार समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी. लोकसंख्या असलेल्या क्षेत्राची योग्य विल्हेवाट लावली पाहिजे. हे सर्व निर्णय शासनस्तरावर घ्यायचे आहेत.

**पोलिसांकडून अश्रुधुराचा मारा**

**पंजाब-हरियाणा सीमेवरील शंभूपासून दिल्लीकडे मोर्चा नेण्यासाठी १०१ शेतकऱ्यांनी काल सकाळी तयारी केली होती. मात्र काही मीटर अंतरावरच त्यांना हरियाणा सुरक्षा दलांनी टाकलेल्या बॅरिकेडमुळे थांबावे लागले. बॅरिकेडपर्यंत आंदोलक पोहोचल्यानंतर पोलिसांनी त्यांच्यावर अश्रुधुराचा मारा केला आणि आंदोलकांना मागे जाण्यास भाग पाडले.**

# आरबीआयच्या गव्हर्नरपदी संजय मल्होत्रा

मुंबई : केंद्र सरकारने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या गव्हर्नरपदी ख-ड अधिकारी संजय मल्होत्रा यांची नियुक्ती केली आहे. संजय मल्होत्रा हे सध्या महसूल विभागाचे सचिव आहेत. त्यांची आता आरबीआयच्या गव्हर्नरपदी नियुक्ती करण्यात आली आहे. आरबीआयचे सध्याचे गव्हर्नर शक्तिकांद दास यांचा कार्यकाळ येत्या १० डिसेंबर २०२४ ला समाप्त होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडून नव्या गव्हर्नरपदी संजय मल्होत्रा यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. पुढील ३ वर्ष ते या पदावर असणार आहेत. संजय मल्होत्रा हे सध्या महसूल सचिव पदावर कार्यरत होते. दरम्यान केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीकडून त्यांची नव्या गव्हर्नरपदी नियुक्ती करण्यात आल्याचं जाहीर करण्यात आले.



संजय मल्होत्रा नेमके कोण आहेत?

संजय मल्होत्रा हे १९९० बॅचचे राजस्थान केडरचे भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी आहेत. त्यांनी इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, कानपूर येथून कॉम्प्युटर सायन्समध्ये अभियांत्रिकी पदवी घेतली आहे. मल्होत्रा यांनी प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी, यूएसए येथून पब्लिक पॉलिसी या विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी ऊर्जा, वित्त आणि कर, माहिती तंत्रज्ञान, खाणी इत्यादींसह विविध क्षेत्रांमध्ये काम केले आहे. सध्या ते अर्थ मंत्रालयात सचिव (महसूल) पदावर कार्यरत आहेत. त्यांनी भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या अंतर्गत वित्तीय सेवा विभागात सचिवपद भूषवले होते. मल्होत्रा यांना राज्य आणि केंद्र सरकारमधील वित्त आणि कर आकारणी या क्षेत्राचा मोठा अनुभव आहे. ते प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांच्या संदर्भात कर धोरण तयार करण्यात महत्वाची भूमिका बजावतात.

# अध्यक्षांच्या अभिनंदनाचा ठराव रंगला सत्ताधारी, विरोधकांतील कलगीतुरे, कोपरखळीने !

## रोहित पाटलांनी भाषणाने मुख्यमंत्र्यांसह सभागृहाला खळखळून हसविले

तभा वृत्तसेवा/जमीर काझी

मुंबई,दि.९ डिसेंबर : गेली अडीच वर्षे त्यांची सत्व परीक्षा होती, त्यांना मी सल्ला दिला होता अध्यक्षपद नको मंत्रीपद घ्या, त्यांच्या सासऱ्यांचाच आग्रह होता, नार्वेकरांनी असा निकाल दिला की सर्वोच्च न्यायालय बुचकळ्यात पडले,अजून केवळ तारीखच देत आहे, जनतेने कसा करेक्ट कार्यक्रम केला? , आता कसं वाटतंय?, माझे पहिल्यापासूनच तुमच्यावर बारीक लक्ष आहे पण तुम्हीच प्रतिसाद देत नाही, संख्या कमी असेल पण आवाज कमी होऊ देणार नाही, या सारख्या एका पेक्षा एक अर्थपूर्ण शेरेबाजी व कोपरखळीने विशेष अधिवेशनातील अखेरचा दिवस गाजला. तर विधानसभेतील सर्वात तरुण आमदार रोहित पाटील यांच्या 'अमृताहुन नाम तुझे गोड देवा' या संत वचनातील ओवीमुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पूर्ण सभागृह हास्य कल्लोळात बुडाले.

या सर्वाला निमित्त होते ते नूतन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावरील अभिनंदनांचे ठरावाचे. नव्या विधानसभा निवडणुकीतील तीन दिवसाच्या विशेष अधिवेशनात अखेरच्या दिवशीचे पहिले सत्र सत्ताधारी व विरोधी नेत्यांनी नार्वेकर यांच्या अभिनंदनपर केलेल्या भाषणातून केलेले विविध 'कोटी आणि शालजोडीतून लगावलेल्या चपराकीमुळे गाजले . मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नानांच्या मुळे हा योग आल्याचे सांगत सुरवात करून दिली.तर शिंदे व पवार या उपमुख्यमंत्र्यांनी ईव्हीएम मशीनबाबतच्या टिकेवर विरोधकांना जोरदार सुनावले. जयंत पाटील यांनी सत्ताधाऱ्यांना हळुवार चिमटे काढले.तर नाना पटोले, जितेंद्र आव्हाड,विजय वडेट्टीवार यांनी संख्याबळामुळे सत्तेचा माज येवू देवू नका असे सुनावले.

# लाडकी बहीण योजनेच्या अर्जांची छाननी होणार नाही : आदिती तटकरे

मुंबई : विधानसभा निवडणुकीपूर्वी महाराष्ट्र सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना' सुरू केली होती. या योजनेअंतर्गत महिलांच्या खात्यामध्ये दरमहा १५०० रुपये जमा केले जात होते. त्यांनतर आता पुन्हा एकदा महायुतीचं सरकार आलं आहे. त्यामुळे आता महिलांच्या खात्यावर महायुती सरकारकडून २१०० रुपये देण्यात येणार आहे. या योजनेतील लाभार्थी महिलांच्या तक्रार आलेल्या अर्जांची छाननी होऊन लाभार्थी महिलांची संख्या कमी होणार असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे. याबाबत राज्याच्या माजी महिला व बालकल्याण विभागाच्या मंत्री आदिती तटकरे यांनी माहिती दिली आहे.



आदिती तटकरे यांनी या सर्व चर्चा फेटाळत अशी छाननी करण्याचा सरकारचा विचार नसल्याचे स्पष्ट केले आहे. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये छाननी करण्याचा आमचा कोणताही विचार नाही. छाननीबाबत चुकीची चर्चा सुरू आहे. कारण आम्ही अतिशय व्यवस्थितरीत्या ही योजना राबवलेली आहे. राज्यातील २ कोटी ४० लाखांपेक्षा अधिक महिलांना या योजनेअंतर्गत लाभ मिळत असून आम्ही सर्व पडताळणी करूनच लाभार्थी महिलांचा या योजनेत समावेश केला आहे, अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली आहे. तसेच एखाद्या बाबतीत तक्रार आली तर छाननी केली जाते.

मी महिला आणि बालविकास खात्याची मंत्री असेपर्यंत कोणतीही तक्रार आमच्याकडे प्राप्त झालेली नव्हती. आता नव्याने तक्रार आली असेल तर मला त्याबाबत माहिती नाही.

पण तक्रारी असतील तरच त्याबाबतीतच छाननी होईल, या तक्रारींबाबतसंबंधित विभाग निर्णय घेईल. पण सध्यातरी अर्जांच्या छाननीबाबत कोणताही निर्णय झालेला नाही, असंही आदिती तटकरे यांनी सांगितलं आहे.

महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत आल्यास लाडकी बहीण योजनेचे पैसे दीड हजारांवरून २१०० रूपये करणार असल्याचे आश्वासन देण्यात आले होते. दम्यान, विधानसभा निवडणुकीत 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना महत्त्वपूर्ण ठरल्याने, महायुती सरकार विक्रमी मताधिक्याने पुन्हा एकदा सत्तेवर आले आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही लाडकी बहीण योजना ही बंद होणार नाही. लाडकी बहीण योजनेचे पैसे दीड हजारांवरून २१०० रूपये करणार असून बजेटच्या वेळी आम्ही तसा विचार करू, असे आश्वासन दिले आहे आता या लाडक्या बहिणींना पुढील हप्त्याची प्रतीक्षा असून तो खात्यात कधी जमा होणार, याची चर्चा आहे. आतापर्यंत या योजनेचे पाच हप्ते बहिणींच्या खात्यात जमा झाले आहेत. जुलै २०२४ पासून सुरू केलेल्या या योजनेंतर्गत ऑक्टोबर २०२४ पर्यंत शेकडो महिला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेस पात्र ठरल्या आहेत.

# दर्गा बाबा रमजान, मशिद-कब्रस्तान ही वक्फ संस्था नसून, कानिफनाथ मंदिर : दावा याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : दर्गा बाबा रमजान, मशिद व कब्रस्तान ही वक्फ संस्था नसून, कानिफनाथ मंदिर (कान्होबा देव) असल्याचा दावा करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती अरविंद कुमार यांनी फेटाळून लावली आहे. तसेच हे धार्मिक स्थळ वक्फ संस्था असल्याचा महाराष्ट्र वक्फ न्यायाधीकरण आणि औरंगाबाद खंडपीठाचा निर्णय कायम ठेवला आहे.

२००४ मध्ये शिरपूर (गात), ता. शिरुर कासार, जि. बीड येथील दर्गा बाबा रमजान, मशिद व कब्रस्तान यांचे मुतवल्ली इनामदार शेख रहिमुद्दीन खठाडू यांनी महाराष्ट्र वक्फ न्यायाधीकरण, छत्रपती संभाजीनगर येथे वक्फची मालकी घोषित करणे व कायम मनाई हुकुमासाठी वक्फ दावा दाखल केला होता. अनेक शतकांपासून हा दर्गा, मशिद व कब्रस्तान अस्तित्वात आहे. वक्फ संस्थेची सेवा त्यांचे कुटुंब वंशपरंपरेने करीत आहे. वक्फ संस्थेच्या सेवेसाठी सर्व्हे क्र. २२ आणि २५ (नवीन गट क्र. १०१ अ आणि १०१ ब) मध्ये एकूण ६१ एकर २३ गुंठे जमीन 'सशर्त सेवा इनाम' म्हणून बहाल आहे. ज्याची नोंद सन १९३२-३३ पासून अभिलेखात आहे, असे त्यांनी म्हटले होते. यासंदर्भात १९७८ च्या महाराष्ट्र शासनाच्या वक्फ राजपत्र व इतर महसूल अभिलेख्यातही नोंदी आहेत. परंतु कोणत्याही आधारविना दिनांक १७ जुलै १९५७ च्या फेरफार अन्वये वक्फ संस्थेच्या महसूल रेकॉर्डवरील इनामदारांचे नाव कमी करून कानिफनाथ मंदिर म्हणून बेकायदेशीररित्या नोंद घेण्यात आली होती. याच नोंदीचा गैरफायदा घेत प्रतिवादी बबन नारायण गात व इतरांनी वक्फ संस्थेच्या व्यवस्थापनात अडथळे निर्माण करून वक्फ संस्था व मालमत्तेचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला होता.

या प्रकरणात प्रतिवादींच्या वतीनेही बाजू मांडण्यात आली. सर्व साक्षी-पुराव्यांचे अवलोकन केल्यानंतर ३१ मार्च २०१२ रोजी न्यायाधिकरणाने इनामदारचा दावा मंजूर करून ही मालमत्ता वक्फची असल्याचे घोषित करीत प्रतिवादींना कायम मनाईचा निर्णय दिला. या निर्णयास प्रतिवादींनी औरंगाबाद खंडपीठात आव्हान दिले. ९ एप्रिल २०१४ रोजी खंडपीठाचे न्यायमूर्ती टी. व्ही. नलावडे यांनी सविस्तर निर्णय पारित करीत न्यायधिकरणाचा निर्णय कायम ठेवला.

यावर प्रतिवादींनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. त्यात पुराव्यांचे निरीक्षण केल्यानंतर 'खंडपीठाच्या निर्णयामध्ये हस्तक्षेप करण्यासाठी याचिकेमध्ये कोणतेही तथ्य आढळले नाही' असे नमूद करीत सर्वोच्च न्यायालयाने प्रतिवादींची याचिका फेटाळली. मुतवल्ली व वक्फ संस्थेच्या वतीने ॲड ईशाद हनिफ आणि ॲड सईद शेख, तर प्रतिवादींच्या बाजूने ॲड अमोल कारंडे, ॲड पी. चंदना, ॲड ओम वीर यांनी बाजू मंडली.

## विराट कोहलीच्या निर्णयाचं गावसकर यांनी केलं कौतुक

मुंबई: पर्थमधील विजयी सुरुवातीनंतर टीम इंडिया ॲडलेडमध्ये ऑस्ट्रेलियावर मात करण्यात अपयशी ठरली. डलेडमधील डे-नाईट कसोटीत तिसऱ्या दिवसातील पहिल्या सत्रातच ऑस्ट्रेलियाने पुन्हा एकदा आपले वर्चस्व कायम राखत टीम इंडियाचा पराभव केला.टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली या दोघांनी घोर निराशा केली आहे. विराटने या सामन्यातील पराभवाच्या आणि धावांच्या अपयशानंतर मोठा निर्णय घेतला. विराटच्या या निर्णयाचं लिटील मास्टर सुनील गावसकर यांनीही कौतुक केलं आहे. बॉर्डर गावसकर ट्रॉफीतील तिसरा सामना हा १४ ते १८ डिसेंबर दरम्यान ब्रिस्बेन, गाबा येथे होणार आहे. विराट दुसऱ्या कसोटीतील पराभवांनतर वेळ न दवडता तिसऱ्या सामन्याच्या अनुषंगाने नेट्समध्ये जाऊन बॅटिंगचा सराव करु लागला. विराटच्या या निर्णयाचं गावसकर यांनी कौतुक केलं आहे.

# भाजपा युती सरकार आता 'लाडका भाऊ'साठी काम करणार : नाना पटोले

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. ९ डिसेंबर : 'लाडकी बहीण'मुळेच पुन्हा सत्तेत आलो असे भाजपा युतीचे नेते सांगत आहेत पण निवडणुका संपल्याने लाडक्या बहिणीची त्यांना गरज राहिलेली नाही. हा विषय आता संपला असून सरकारचा शपथविधी होताच दोन दिवसात एका 'लाडक्या भावाला' एक हजार कोटीची संपत्ती परत मिळाली आहे. सरकार हे 'लाडक्या भावा' साठी काम करणारे सरकार आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.

विधिमडळ परिसरात माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, महायुतीला पाशवी बहुमत मिळाले आहे त्यामुळे त्यांची मस्ती दिसत आहे. विधानसभा अध्यक्षांच्या निवडीनंतर अभिनंदनाचा ठराव मांडला असता त्यावरच चर्चा होणे अपेक्षित होते पण सत्ताधारी पक्षातील सदस्य मतदारांची थट्टा करत होते. मारकवाडीप्रमाणे इतर गावातही ग्रामसभा ठराव करत आहेत. मतदार हा राजा आहे, त्याला मताचा अधिकार असून आपले मत कुठे गेले हे जनता विचारत आहे. मारकडवाडीतील लोक मॉक पोलिंग करणार होते तो अधिकार गावकऱ्यांना आहे, तो कोणीही हिरावू शकत नाही. मारकडवाडीच्या मुद्द्यावर सभागृहातही चर्चा झाली पाहिजे , असे सांगून ते म्हणाले की, महाराष्ट्र विधिमंडळाला एक मोठी परंपरा लाभलेली आहे. अनेकदा काँग्रेसकडे मोठे बहुमत असतानाही त्यावेळी विरोधी पक्षांची सदस्य संख्या न पहाता विरोधी पक्षनेते पद दिले होते. हीच परंपरा लक्षात घेऊन विधान सभेचा विरोधीपक्ष नेता व विधानसभेचा उपाध्यक्ष विरोधी पक्षांचा असावा ,अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेल्या चर्चेत मांडली आहे. सरकारही सकारात्मक असून नागपूर अधिवेशनात विरोधी पक्षनेता होईल अशी अपेक्षा आहे.

कर्नाटकात भाजपाचे सरकार असताना बेळगावात मराठी भाषिकांवर अत्याचार करण्यात आले होते, त्यावेळी भाजपा गप्प बसले होते आणि आता ते का बोलत आहेत. केंद्रात सरकार भाजपाचे आहे ,त्यांनी काही निर्णय घ्यावा. भाजपा हा धर्माच्या नावावर भाजपा मते मागून राजकारण करत असल्याचा आरोप हे पटोले यांनी केला.

## एमजीएममध्ये प्रोजेक्ट आयटूआयचे उद्घाटन संपन्न
### सिंगापूरच्या विद्यार्थी शिष्टमंडळाचे एमजीएममध्ये स्वागत



छत्रपती संभाजीनगर, दि.९ : एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, एमजीएम विद्यापीठ आणि नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ सिंगापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'प्रोजेक्ट आयटूआय' या विशेष उपक्रमांतर्गत सिंगापूर येथून आलेल्या विद्यार्थी आणि प्राध्यापक यांचे एमजीएममध्ये उत्साहपूर्ण वातावरणात आज स्वागत करण्यात आले. आज द्योतन सभागृहात 'प्रोजेक्ट आयटूआय' चे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी सिंगापूर शिष्टमंडळातील प्रोजेक्ट आयटूआयचे संचालक डॉ.रुपेश अगरवाल, डॉ.सतीश रामपटना, डॉ.रोहित अगरवाल तर एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.राजेंद्र बोहरा, वैद्यकीय अधिक्षिका डॉ. अपर्णा कक्कड, अधीक्षक डॉ.राघवन, अधीक्षक बी.के.सोमाणी, नेत्र विभागप्रमुख डॉ.सारिका गाडेकर, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ.पी.एम.जाधव म्हणाले, सिंगापूर येथून आलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाचे एमजीएममध्ये स्वागत करतो. आपणा सर्व विद्यार्थ्यांना भारतात अनेक गोष्टी शिकता येतील त्याचप्रमाणे आम्हालाही आपल्याकडून बऱ्याच गोष्टी शिकता येतील. कोणीही परिपूर्ण नसून शिकण्याची प्रक्रिया कायम सुरू असते. या एका आठवड्यात आपण प्रत्येक मिनिटाचा वापर करीत हा वेळ शिकण्यासाठी व्यतीत करा. रुग्ण डॉक्टरांकडे येण्यापेक्षा डॉक्टर रुग्णांकडे जाऊन तपासणी करण्यासाठी 'प्रोजेक्ट आयटूआय' हा उपक्रम २०१९ मध्ये सुरू करण्यात आला आहे. या अगोदर ओरिसा, उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेश या राज्यांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आलेला आहे. दरवर्षी अशा प्रकारच्या प्रकल्पाचे आयोजन करण्यात येत असते. विशेषत: या उपक्रमात वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी सहभागी होत असतात. एमजीएमचे विद्यार्थी आणि सिंगापूरचे विद्यार्थी एकत्रितरित्या पुढील एक आठवडा छत्रपती संभाजीनगर येथील ४ ठिकाणी विविध शिबिरांच्या माध्यमातून रुग्ण तपासणीचे काम करणार असल्याचे प्रोजेक्ट आयटूआयचे संचालक डॉ.रुपेश अगरवाल यांनी यावेळी सांगितले.

'प्रोजेक्ट आयटूआय' शिष्टमंडळात सिंगापूर येथून आलेल्या २८ विद्यार्थ्यांसह ३ प्राध्यापकांचा समावेश आहे. आजच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नेत्र विभागप्रमुख डॉ.सारिका गाडेकर यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ.मधुरा राजन यांनी केले. 'प्रोजेक्ट आयटूआय' यशस्वी करण्यासाठी एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर आपले योगदान देत आहेत.

## एनएचसी फूड्स लिमिटेडचेराइट्स इश्यू ५ डिसेंबर पासून सबस्क्रिप्शनसाठी उघडले

नाशिक – गुजरात. नॅशनल हेल्थ कॉर्पोरेशन फूड्स लिमिटेड (बीएसई–५१७५५४), मसाले, धान्य, तेलबिया, डाळी, सुका मेवा आणि इतर कृषी उत्पादनांच्या निर्यात व्यवसायात गुंतलेली गुजरातची मोठी कंपनी आहे. कंपनी ने ५ डिसेंबर २०२४ पासून सबस्क्रिप्शनसाठी ४७.४२ कोटी राइट्स इश्यू उघडला आहे. ६ डिसेंबर २०२४ रोजी प्रति शेअर रु. २.७६ प्रति शेअर सध्याच्या बाजारभावासमोर रु. १ च्या आकर्षक किमतीवर राइट्स इश्यू ऑफर करत आहे. १८ डिसेंबर २०२४ रोजी राइट्स इश्यू बंद होईल. कंपनीच्या राईट इश्यूमध्ये गुंतवणूकदारांनी रु. १ च्या आकर्षक किमतीत घेण्यासाठी/सदस्यत्व घेण्यासाठी (बीएसई चिन्ह: एनएचसीएफओ–आरई) देखील खरेदी करू शकतो. ऑन–मार्केट हक्क सोडण्याची अंतिम मुदत डिसेंबर १२, २०२४ आहे.

## वीवो ची स्विचऑफ मोहीम सहाव्या आवृत्तीसह परतली

नवी दिल्ली : स्मार्टफोन आपल्या जीवनातील प्रत्येक पैलूचा एक भाग बनत असताना, आपल्या कौटुंबिक नातेसंबंधांवर त्याचा प्रभाव विचारात घेणे नेहमीपेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञानाच्या माहितीपूर्ण वापराला प्रोत्साहन देण्याचा आपला प्रयत्न सुरू ठेवत, विवो इंडिया ने स्विचऑफमोहिमेची सहावी आवृत्ती अभिमानाने सादर केली आहे, कुटुंबांना त्यांचे स्मार्टफोन बंद करण्याचे आवाहन केले आहे आणि आपल्या कुटुंबासोबत चांगले आणि संस्मरणीय क्षणांचा आनंद घ्यावा. एफसीबी इंडिया द्वारे तयार केलेल्या आकर्षक व्हिडिओसह ही मोहीम, विवो – सायबर मीडिया रिसर्च (सीएमआर) अभ्यासाच्या सहाव्या आवृत्तीतून २०२४ मध्ये पालक–मुलांच्या नातेसंबंधांवर स्मार्टफोनचा प्रभाव यातून घेण्यात आली आहे. अभ्यास दाखवतात की १० पैकी ८ मुले त्यांच्या पालकांना 'स्मार्टफोन वापरा'साठी 'पालक नियंत्रण' विचारतात. सर्वेक्षणात असेही दिसून आले आहे की ६९% मुले स्मार्टफोनचा अतिवापर हे त्यांच्या आणि त्यांच्या पालकांमधील संघर्षाचे कारण मानतात. विशेष म्हणजे, ८६% पालकांना असे वाटते की स्मार्टफोनच्या अतिवापरामुळे ते त्यांच्या मुलांशी चांगले संपर्क साधू शकत नाहीत.

## ग्राहकांचे प्रश्न समन्वयातून सोडवा–सिद्धाराम सालीमठ



अहिल्यानगर, दि.९– ग्राहकांच्या असलेल्या अडी–अडचणी व प्रश्न जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या माध्यमातून समन्वयाने सोडविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी हेमलता बडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. सालीमठ म्हणाले,दैनंदिन जीवनामध्ये ग्राहकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ग्राहकांच्या विद्यूत विषयक समस्या सोडविण्यासाठी तालुका व जिल्हा पातळीवर ऊर्जामित्र बैठकांचे आयोजन करण्यात यावे. जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये लोंबकळणाऱ्या विद्यूत तारांमुळे अपघात होण्याची शक्यता असल्याने या तारांची तातडीने दुरुस्ती करुन घेण्यात यावी. अहिल्यानगर शहरामध्ये गुटखा विक्रेत्यांवर कारवाई करण्याच्या सुचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केल्या.

जिल्ह्यातील प्रत्येक रुग्णालयामध्ये रुग्णहक्क सनद तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजनेबाबतचे फलक लावण्यात यावेत. ऊस वाहतुक करणाऱ्या वाहनांचे अपघात टाळण्यासाठी प्रत्येक वाहनांवर रिफ्लेक्टर बसविण्यात यावेत. रिफ्लेक्टर न बसविलेल्या वाहनांवर कारवाई करण्याच्या सुचनाही श्री. सालीमठ यांनी यावेळी केल्या.

बैठकीस अशासकीय सदस्य अतुल कुऱ्हाडे, विलास जगदाळे, रणजित श्रीगोड, गजेंद्र क्षीरसागर, बाबासाहेब भालेराव, डॉ. मंगला भोसले, डॉ. अशोक गायकवाड, डॉ. विलास सोनवणे, डॉ. गोरख बारहाते, प्रकाश रासकर उपस्थित होते.

## प्रल्हादराव चव्हाण यांचे निधन

सिल्लोड प्रतिनिधी : वय ७६ वर्ष राहणार बोरगाव बाजार तालुका सिल्लोड (ह.मु.टिळकनगर सिल्लोड) यांचे दिनांक ८/१२/२०२४ आज रविवार रोजी संध्याकाळी ५:३० वाजे दरम्या अल्पशा आजाराने निधन झाले आहे त्यांच्या पश्चात चार भाऊ, भावजया, एक बहिण, दोन मुले, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे भाजपचे जेष्ठ नेते सुनील मिरकर याचे ते सासरे होत.

# 'भारत तोडो'च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीयत्व बळकट करण्याची गरज : अविनाश धर्माधिकारी







पुणे, ९ डिसेंबर : एकसंध राष्ट्रीयत्व ही भारताची खरी ताकद आहे. वेगवेगळ्या मार्गांनी भारत तोडण्याचे प्रयत्न सुरू असले तरी आपले राष्ट्रीयत्व बळकट करू या. कारण जगाला सुख, शांती, समाधान देण्याचे सामर्थ्य आमच्यामध्ये आहे, असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी केले.

कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित शिवशाहीर कै. बाबासाहेब पुरंदरे स्मृती व्याख्यानमालेत धर्माधिकारी बोलत होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापाठाचे माजी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. व्याख्यानमालेचे यंदा तिसरे वर्ष होते.

'भारत तोडो षडयंत्र' या विषयावर मार्गदर्शन करताना धर्माधिकारी म्हणाले, भारताचा सनातन विचार हाच जगातील सर्वात सहिष्णु विचार आहे. हा सर्व जगाला जोडणारा विचार आहे. विश्वालाच कुटुंब मानणे ही भारताची संकल्पना आहे. भारत एकसंध राहू नये म्हणून परकीय शक्ती आणि त्यांना मदत करणाऱ्या भारतातील शक्ती भारत तोडण्याचा प्रयत्न करत आहेत. डॉ. करमळकर म्हणाले, भारत तोडण्याचे जे कारस्थान सुरू आहे, ते समजून घेणे, त्याची माहिती घेणे आवश्यक आहे.

व्याख्यानमालेचे द्वितीय सत्र प्रसिद्ध निरूपणकार, लेखक विवेक घळसासी यांनी गुंफले. 'भारताच्या वैभवाचा आधार – माझं घर माझा परिवार' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. प्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी आणि कायदेतज्ज्ञ डी. डी. शहा यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. घळसासी म्हणाले, आपल्या देशाला आपल्याला परमवैभवाला न्यायचे आहे आणि हे काम इतरांनी नाही तर मला माझ्यापासून, माझ्या घरापासून करायचे आहे. देशाला परमवैभवाला नेणे ही माझी जबाबदारी आहे, हे प्रत्येकाला लक्षात ठेवावे लागेल.

स्वतः विषयीचा आत्मविश्वास, कृतज्ञता, सर्वसमावेशकता, सहभागीता, संयम, श्रमप्रतिष्ठा, उत्तम अभिव्यक्ती, अनुशासन, त्याग, तपस्या ही तत्त्व आपल्याला अंगी बाणवावी लागतील. मुळात उत्तम माणूस घडला तर देश उभा राहील. हा माणूस घरात म्हणजेच कुटुंबात संस्कारातून घडेल. म्हणून माझं घर – माझा परिवार हा वैभवशाली भारताचा आधार आहे, असेही घळसासी यांनी सांगितले. व्याख्यानमालांसारख्या कार्यक्रमांची समाजाला गरज आहे. म्हणून असे कार्यक्रम सातत्याने करत राहणे आवश्यक आहे, असे मृणाल कुलकर्णी म्हणाल्या.

संस्थेचे अध्यक्ष सुनील राऊत यांनी सत्कार आणि स्वागत तर नागेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

## बिडकीनमध्ये रस्त्याची दुरावस्था अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष; नागरिकांना व वाहनधारकांना नाहक त्रास





तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ९ डिसेंबर : पैठण ते नक्षत्रवाडी दरम्यान छत्रपती संभाजीनगर साठी पाणी पुरवठा करणारी पाईप लाईनचे काम मागील आठ महिन्यापासून सुरू असून या पाईप लाईनच्या कामासाठी मोठमोठी खड्डे खोदून ठेवलेले आहे असून बाजूला मातीचे मोठी ढिगारे असून त्यामुळे मुख्य रोडवर साचलेल्या मातीमुळे सर्व ठिकाणी खड्डे पडलेले असून या खड्ड्यात अनेक छोट्या मोठ्या वाहनाचा अपघात होउन अनेकांना जीव गमवावा लागला असून बिडकीन मधील मुख्य पैठण रोडची दयनीय दुरावस्था झालेली असून जागोजागी मोठ मोठी खड्डे पडलेले आहे. यामुळे वाहन चालकाला नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

बिडकीन येथील शेकटा फाटा ते निलजगाव फाटा दरम्यान अनेक मुख्य बाजार पेठ असून या दरम्यान जिल्हा परीषद शाळा, सरस्वती भुवन शाळा असून हजारो विद्यार्थी , नागरिक ,वाहन मुख्य रोडवरून ये जा करतांना खड्डेमय रोडमुळे अनेक वाहनाचा त्रास होत आहे.

बिडकीन मध्ये पाईप लाईनचे सूरु असताना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांनी भेट दिली होती त्यांनतर माजी सहकार मंत्री अतूल सावे यांनी सुध्दा बिडकीन मध्ये येऊन सूरु असलेल्या कामाला भेट दिली त्यानंतर दोन काम बंद पडले मागील तीन महिन्यापासून काम बंद असून तसेच रोडचेही काम बंद असल्याने बिडकीनच्या नागरिकांना व वाहन चालकाला बंद पाईप लाईनच्या कामामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तरी संबंधित अधिकारी यांनी शेकटा फाटा ते निलजगाव फाटा पर्यंत रस्त्याचे काम त्वरित चालू करावे अशी बिडकीन स्थानिक नागरिकांची मागणी आहे.

## दत्त जयंती निमित्त अखंड सप्ताहास झाली सुरुवात



कन्नड :दि.०९ डिसेंबर - शहरातील स्वामी सेवा अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र येथे दत्त जयंती निमित्त अखंड नाम, जप, यज्ञ सप्ताहाला दि. ९ डिसेंबर सोमवार पासुन सुरुवात झाली असून या सप्ताहात दोनशे पन्नास महिला व छत्तीस पुरुष सेवेकरी गुरुचरित्र पारायणास बसलेले आहे सात दिवस चालणाऱ्या या सप्ताहात गणेश याग, मनोबोध याग, चंडी याग, स्वामी याग, रुद्र याग मल्हारी याग असे यागाचे आयोजन करण्यात आले आहे तसेच दि.१६ डिसेंबर रोजी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. केंद्र प्रतिनिधी रामकृष्ण मराठे , संजय शिरसागर, कल्याण चव्हाण, गणेश वाघ, गणेश शेजवळ ,नितीन लोंढे महिला प्रतिनिधी संध्या घुले, मीनाक्षी चव्हाण यांच्यासह सेवेकरी परिश्रम घेत आहे.

## रक्तदान शिबिर,सामाजिक उपक्रमांनी संताजी महाराज जयंती साजरी





तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०९ डिसेंबर - संताजी महाराज जगनाडे यांची ४०० वी जयंती शिवना नदीतिरा वरील लिंगेश्वर महादेव मंदीर परीसरात प्रदेश तेली महासंघ, संताजी महाराज ट्रस्ट व कन्नड शहर तिळवण तेली समाजाच्या वतीने साजरी करण्यात आली

शहरातून शोभायात्रा, रक्तदान शिबीर, सामाजिक प्रबोधन, विश्वमाई वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने धार्मिक भजनाचा व महाप्रसादाने साजरी करण्यात आली. यावेळी माजी उपनगराध्यक्ष वाल्मीक लोखंडे व सुनीता सोनवणे यांनी संताजी महाराजांचे जीवन चरित्र उलगडून दाखवले व सामाजिक प्रबोधनात्मक विचार मांडले. प्रथम शनी मंदीर परिसरातून रविवारी सकाळी आठ वाजता भव्य शोभा यात्रा काढण्यात येऊन लिंगेश्वर महादेव मंदीर येथे संपन्न झाली. या वेळी मान्यवरांच्या हस्ते संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व शहरातून लिंगेश्वर महादेव मंदीर पर्यंत शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरात १६ रक्त दात्यांनी रक्तदान केले, या कार्यक्रमासाठी महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी शहर तसेच ग्रामीण भागातील समाज बांधवांची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुनील सोनवणे यांनी केले तर आभार संतोष बागुल यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी भरत चौधरी, रामेश्वर वाघ, योगेश खंडागळे, प्रमोद चौधरी, संदीप बागुल, सचिन राऊत, संदीप घोंगते, सागर लोंखडे, राहुल वाघ, रमेश उचित, संतोष दारुणकर, रमेश हिरे, गणेश राऊत आदींनी परिश्रम घेतले.

## ग्राहक जागरण पंधरवाडा निमित्त ग्राहक हिताच्या दृष्टीने करण्यात येणारे नियोजनासंबंधी यंत्रणेस सूचना देण्याची मागणी
### ग्राहक तक्रार निवारण मंचाच्यावतीने तहसीलदारांकडे मागणी



सिल्लोड/ प्रतिनिधी : राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त ग्राहक जागरण पंधरवाडा साजरा करताना राज्य शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या योजना व ग्राहक हिताच्या दृष्टीने करण्यात येणारे नियोजन यासंबंधी यंत्रणेस सूचना देण्यात याव्यात अशी मागणी ग्राहक तक्रार निवारण मंचाच्यावतीने तहसीलदारांकडे करण्यात आले.

याबाबत तहसीलदार संजय भोसले यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी १५ डिसेंबर २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ ग्राहक जागरण पंधरवड्या निमित्त साजरा करण्याचा संबंधाने ग्राहक दिन साजरा करण्याच्या संबंधाने केलेल्या नियोजनात शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या योजना ग्राहकांना आवश्यक असलेली सर्व माहिती मिळावी या उद्देशाने महाविद्यालय शाळा वस्ती व ग्रामीण भागातील छोटी मोठी गावे अशा सर्व ठिकाणी ग्राहक जागरणाचे कार्य करण्याच्या अनुषंगाने नियोजन करण्यात यावे यासाठी शहरासह तालुक्यातील जिल्हा ग्राहक संरक्षणा परिषदेचे सदस्य ग्राहक चळवळीतील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पथनाट्य निबंध स्पर्धा महिला मंडळ शेतकरी मेळावे अशा उपक्रमाद्वारे व्यापक जनसंपर्क करण्यात येऊन ग्राहक जागरणाचे कार्य करण्याच्या अनुषंगाने संबंधित यंत्रणेस सूचना देण्यात याव्यात ग्राहक जागरण पंधरवड्यात ग्राहक जागरण पंधरवड्यात नव्याने आलेला ग्राहक संरक्षण कायदा अन्नसुरक्षेच्या बाबतीत विविध माहिती ग्राहकापर्यंत पोहोचणे कुटुंबावर उपभोगवादाचा प्रभाव दिशाभूल करणारी जाहिरात सायबर फसवणूक गुन्हे आणि डिजिटल अटक याबद्दल ग्राहकांना माहिती देणे दैनंदिन जीवनात उद्भवणाऱ्या खरेदी संबंधी विविध कायद्यात ची माहिती वैधमापन शास्त्र अन्न व औषध प्रशासन संबंधीच्या मूलभूत अधिकारांची माहिती आदी बाबींचा ग्राहक जागरण उपक्रमामध्ये समावेश असावा.

याप्रमाणे सर्व तालुक्यात ग्राहक जागरण पंधरवडा साजरा करण्याच्या अनुषंगाने नियोजन करण्यात यावे अशी मागणी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनावर संजय कुलकर्णी मनोज मोरेलू विष्णू काटकर मयूर कुलकर्णी गजानन मरकड राजू शिरसाठ आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जाहिर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए.क. ५१२/२०२४

अर्जदार :– १. बिस्मिला मुन्सी शेख, तथ. ५५ वर्षे, धंदा–घरकाम व शेती. रा. बगडी ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टप्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी मयत वडील सय्यद नुर मोहम्मदभाई यांचे वारस असल्याबाबत प्रकरण या मा. न्यायालयात त्यांचे विधीज्ञ अविनाश चव्हाण यांच्या मार्फत दाखल केला असून अर्जदारांनी अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार यांचे वडील मयत सय्यद नूर मोहम्मदभाई है. दि. ०१/११/२०१० रोजी बगडी ता. गंगापूर येथे मयत झालेले आहे. मयत सय्यद नुर मोहम्मदभाई यांना अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारसदार नाही. अर्जदारास शासकिय, निमशासकीय कामासाठी मृत्यूनंतरच्या लाभासाठी हेअरशिप प्रमाणपत्र आवश्यक आहे

त्याअर्थी तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार हे मयत सय्यद नूर मोहम्मदभाई यांचे कायदेशीर वारसदार आहे व त्याप्रमाणे त्याचे वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदारांचे हक्कात जारी करण्यात यावे अशी मागणी केलेली आहे. तरी सदरील मागणीस कुणाचा काही आक्षेप उजर असल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा आपल्या विधीज्ञामार्फत न्यायालयात आक्षेप नोंदवावा मुदतीत आक्षेप न असल्यास न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे आदेश पारित करेल. पुढील तारीख ०७/०१/२०२४.

आदेशावरून
सहायक अधिक्षक
न्यायलय गंगापूर ता. गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.वि.अर्ज क्र.५५/२०२४
१२३/

अर्जदार : १) अनिल बन्सी कोळसे, वय ३८ वर्षे, धंदा मजुरी रा. रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) कल्पना भ्र. किसन गायकवाड, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम रा. क्रांती नगर, गल्ली नं.१, क्रांती चौक, छत्रपती संभाजीनगर ३) बेबी भ्र. कैलाश धीवर, वय ४९ वर्षे, धंदा. घरकाम रा. रांजणगाव शेणपुंजी, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) जयश्री भ्र. संजय भालेराव, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम रा. रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) कविता भ्र. विजु बनसोडे, वय ३७ वर्षे धंदा घरकाम रा. घानेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.ए. पारधे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ५ आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिणी असुन अर्जदार क्र.१ यांची आई नामे कडुबाई बन्सी कोळसे ह्या मौजे रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर येथील रहिवाशी होत्या त्या दिनांक ३०/१२/२०२० रोजी मौजे रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर येथे मयत झालेल्या आहे. तसेच अर्जदारांचे वडील नामे बन्सी राघोजी कोळसे हे यापुर्वीच मयत झालेले आहे. मयत कडुबाई बन्सी कोळसे यांना अर्जदार क्र.१ ते ५ हेच कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन वारसप्रमाणत्र मिळणे कामी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ९/१२/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## 'जलजीवन मिशन'ची कामे समन्वयाने करा : जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



छत्रपती संभाजीनगर,दि.९(जिमाका)- हर घर नल से जल उपलब्ध करुन देण्यासाठी जल जीवन मिशन ही योजना राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत जिल्ह्यात ११६४ कामे सुरु करण्यात आली असून ६३५ कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वय साधावा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज यंत्रणांना दिले. जलजीवन मिशन संदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, कार्यकारी अभियंता वाघमारे, तसेच सर्व यंत्रणा प्रमुखआदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील जलजीवन मिशन संदर्भातील कामांचा आज आढावा घेण्यात आला. जिल्ह्यात जलजीवन मिशनची ११६४ कामे सुरु करण्यात आली. त्यापैकी ६३५ कामांची भौतिक प्रगती झाली आहे, अशी माहिती बैठकीत देण्यात आली आहे. तथापि, उर्वरित कामे मात्र किरकोळ तांत्रिक सोपस्कारांअभावी प्रलंबित दिसत आहेत. त्यासाठी आवश्यक ना- हरकत पत्रे, दाखले इ. ची पूर्तता करुन कामांची पूर्तता करुन घ्यावी. त्यासाठी सर्व विभागांनी आपापसात समन्वय राखावा,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग विभाग, पाटबंधारे विभाग, महावितरण, ग्रामविकास विभाग इ. विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### मानवी हक्क दिनानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर,दि.९(जिमाका)- मानवी हक्क दिन दि.१० डिसेंबर रोजी साजरा केला जातो. यानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवार दि.१० रोजी दुपारी ४ वा. अभय टाकसाळ यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांनी कळविले आहे.

## वाढत्या शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर विशेष दिलासा पॅकेज द्या : किसान सभा

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : विधानसभेच्या निवडणुकीच्या ६० दिवसांच्या कालावधीत विदर्भातील १६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या करत आपले जीवन संपवले. महाराष्ट्रात उर्वरित ठिकाणीसुद्धा अशाच प्रकारे शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत.

शेतीमालाचे भाव सातत्याने पाडण्याचे धोरण, वाढता उत्पादन खर्च व नैसर्गिक आपत्तीत होणारे शेतकऱ्यांचे नुकसान या प्रमुख कारणांमुळे शेतकऱ्यांच्या या आत्महत्या वाढत आहेत.

केंद्र सरकारने ही बाब लक्षात घेत महाराष्ट्रासाठी विशेष पॅकेज देत शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी पावले टाकावीत. शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करून शेतीमालाला रास्त दर देत नैसर्गिक आपत्ती शेतकऱ्यांना दिलासा देणारी धोरणे घ्यावीत आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. महाराष्ट्रात वाढत असलेल्या शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर वरील प्रमुख बाबींचा समावेश असणारे 'दिलासा पॅकेज' शेतकऱ्यांना द्यावे, अशी मागणी किसान सभेच्या वतीने आम्ही करत आहोत, असे राष्ट्रीय किसान सभेच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## प्रोजेक्ट आयटूआय अंतर्गत मोफत ४ आरोग्य शिबिरांचे आयोजन

### एमजीएम आणि नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ सिंगापूर यांचा संयुक्त उपक्रम

छत्रपती संभाजीनगर, दि.९ : एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, एमजीएम विद्यापीठ आणि नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ सिंगापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'प्रोजेक्ट आयटूआय' या विशेष उपक्रमांतर्गत बाजार सांगवी, वरूड काझी, वाळुंज आणि फुलंब्री या चार ठिकाणी मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या ४ विशेष शिबिरांमध्ये पहिले शिबिर मंगळवार, दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी बाजार सांगवी, दुसरे शिबिर बुधवार, दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी वरूड काझी, तिसरे शिबिर शुक्रवार, दिनांक १३ डिसेंबर २०२४ रोजी वाळुज येथे तर चौथे शिबिर शनिवार दिनांक १४ डिसेंबर २०२४ रोजी फुलंब्री येथे होणार आहे. सर्व शिबिरांसाठी सर्वांना खुला प्रवेश असणार असून सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत रुग्णांची मोफत तपासणी येथे होणार आहे.

या सर्व शिबिरांमध्ये सिंगापूर येथून आलेल्या शिष्टमंडळातील प्रोजेक्ट आयटूआयचे संचालक डॉ.रुपेश अगरवाल, डॉ.सतीश रामपटना, डॉ. रोहित अगरवाल यांच्यासह नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ सिंगापूरचे २८ विद्यार्थी सहभाग नोंदवणार आहेत. एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील तज्ञ डॉक्टर, विद्यार्थी आणि सिंगापूरवरून आलेले शिष्टमंडळ हे रुग्णांची तपासणीसह उपचार करणार आहेत.

या शिबिरामध्ये स्त्रीरोग विभाग, बालरोग विभाग, नेत्ररोग विभाग, वैद्यकशास्त्र विभाग आदि विभाग सहभागी होत असून या संबंधित विभागातील तज्ञ डॉक्टर्स यावेळी उपचार करणार आहेत. या शिबिरामध्ये जे मोतीबिंदूचे रुग्ण आढळतील अशा सर्व रुग्णांवर एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे. या सर्व शिबिरांमध्ये मोठ्या संख्येने नागरिकांनी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या नेत्र विभागप्रमुख डॉ.सारिका गाडेकर यांनी केले आहे.

## भारतातील सर्वात वेगवान स्मार्टफोन आईकू १३ ११ डिसेंबरपासून विक्रीसाठी उपलब्ध

पुणे : भारतातील सर्वात वेगवान आणि उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू ने त्याचे नवीन प्रकार आईकू १३ लाँच करून मोबाइल उद्योगाचे मानक उच्च ठेवले आहेत. ज्यांना फक्त चांगले ब्रँड हवे आहेत त्यांच्यासाठी हे फ्लॅगशिप डिव्हाइस जबरदस्त कामगिरी, अत्याधुनिक वैशिष्ट्ये, प्रीमियम डिझाइनसह येते. आईकू १३ ची १२जीबी + २५६जीबी व्हेरिएंटसाठी ५४,९९९ रुपये (प्रभावी किंमत: ५१,९९९ रुपये) आणि १६जीबी + ५१२जीबी व्हेरिएंटसाठी रुपये ५९,९९९ (प्रभावी किंमत: ५६,९९९ रुपये) किंमत आहे, जे दोन रंगीत आणि सुंदर पर्यायांमध्ये उपलब्ध असतील. नार्डो ग्रे. ग्राहक लॉन्च ऑफरचा लाभ घेऊ शकतात, ज्यात एचडीएफसी आणि आईसीआईसीआई बैंक बँक क्रेडिट/डेबिट कार्ड्सवर ३,००० रुपयांची सवलत समाविष्ट आहे. वापरकर्ते नॉन-वीवो/ आईकू उपकरणांसाठी ३,००० रुपये आणि वीवो/ आईकूउपकरणांसाठी रुपये ५,००० चा एक्सचेंज बोनस देखील घेऊ शकतात. याव्यतिरिक्त, ९ महिन्यांपर्यंतचे विनाखर्च ईएमआई देखील उपलब्ध आहेत.

## अनावश्यक खर्च टाळण्यासाठी, नवीन बोधचिन्ह तयार करण्याचा निर्णय रद्द करा



नगरः महानगरपालिकेचे सध्या अस्तित्वात असलेले बोधचिन्ह बदलण्याची आवश्यकता नाही. कारण राज्य शासनाने केवळ अहमदनगर महानगरपालिकेचे नामांतर अहिल्यानगर महानगरपालिका असे करण्याचे निर्देश दिलेले आहेत. २००३ साली महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर तत्कालीन जेष्ठ पत्रकार व तज्ञांच्या समितीने सध्या अस्तित्वात असलेल्या बोधचिन्हाची निवड केलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या सध्या वापरात असलेल्या बोधचिन्हमध्ये फक्त नावाचा बदल करून आहे तेच बोधचिन्ह वापरण्यात यावे.

प्रस्तावित बोधचिन्हपेक्षा सध्या अस्तित्वात असलेले बोधचिन्ह हे अतिशय ठळक व स्पष्ट असून त्यामध्ये फक्त नावाचा बदल करून त्याचा नमुना या पत्रासोबत जोडत आहे. महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती पाहता नवीन बोधचिन्ह तयार करण्यासाठीचा अनावश्यक खर्च टाळून नव्याने बोधचिन्ह तयार करण्याचा निर्णय रद्द करण्यात यावा.

अशी मागणी अभय ललवाणी यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. पत्रामध्ये नावात बदल केलेल्या सुधारीत बोधचिन्हाचा समावेश देखील करण्यात आला आहे.

# गावकऱ्यांनी अडवली एस. टी. चालक, वाहकांचा गांधीगिरी करत केला सत्कार

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०९ डिसेंबर - तालुक्यातील हतनुर येथील ग्रामस्थांनी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या एस.टी.बस थांबून चालक वाचकांचा सत्कार केला

सोमवार रोजी सकाळच्या सुमारास राष्ट्रीय महामार्गावर हतनुर परिसरातील गावकऱ्यांनी एस.टी. बसला थांबवून चालक वाहकांचा सत्कार करत गांधीगिरी करत अनोख्या पध्दतीने आंदोलन केले,

महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या एस.टी. बस दररोज उड्डाणपूला वरून जात असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे,त्याबाबत कन्नड आगारात निवेदन देऊन सुद्धा काही फरक पडत नसल्याने गावकऱ्यांनी हे पाऊल उचलत उड्डाणपूलावर छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने जाणाऱ्या एस.टी. बसला थांबवून चालक व वाहकांचा हार घालून सत्कार केला आहे

हतनुर हे गाव महामार्ग लगत असून सुद्धा प्रवाशांची होत असलेली परवड बघता गावकऱ्यांनी अखेर गांधीगिरी पद्धतीने आंदोलन केले आहे





**हतनुर ग्रामस्थांचे निवेदन मिळाले तेव्हा तिथे एक कर्मचारी दोन ते तीन महिन्यासाठी ठेवण्यात आला होता, बाहेरील लांब पल्ल्याच्या एस.टी.बस या उड्डाणपूला वरून जात आहेत, कन्नड आगाराची एस.टी.बस ही हतनुर येथे थांबा घेते.**

**- बाळासाहेब राठोड, आगार प्रमुख कन्नड**

## एमजीएममध्ये पहिल्या फोटोजेनी चित्रपट महोत्सवाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.९ : महात्मा गांधी मिशनचा ४२ वा वर्धापन दिन आणि दुसऱ्या एमजीएम युवा महोत्सवानिमित्त एमजीएम स्कुल ऑफ फिल्म आर्ट्स येथे मंगळवार, दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता पहिल्या फोटोजेनी चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध छायाचित्रकार मिलिंद जोग याच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार असून यावेळी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, प्रा.शिव कदम, साउंड डिझायनर संकेत धोटकर आदि मान्यवर उपस्थित असणार आहेत. एमजीएम स्कुल ऑफ फिल्म आर्ट्सच्या विद्यार्थ्यांनी बनवलेल्या चित्रपटांचे प्रदर्शन यामध्ये पाहायला मिळणार आहे. त्याचबरोबर यामध्ये इतर राज्यातील चित्रपटांनी देखील आपला सहभाग नोंदवला आहे. अंतिम निवड झालेले चित्रपट, अजंता एल्लोरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये दाखवण्यात येतील. फोटोजेनी चित्रपट महोत्सवात १२ लघुपट, २ माहितीपट, १ पूर्ण लांबीचा चित्रपट आणि ३ चित्रपटांच्या ट्रेलरचे प्रदर्शन होत आहे. त्याचबरोबर दिग्गज व्यक्तिमत्व राज कपूर आणि रित्विक घाटक यांच्या कार्याला आदरांजली वाहण्यात येणार आहे. तरुण चित्रपट निर्मात्यांना एक व्यासपीठ निर्माण व्हावे तसेच त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, हा फोटोजेनी चित्रपट महोत्सवाचा उद्देश आहे. मिलिंद जोग आणि संकेत धोटकर, कार्यक्रमाचे ज्युरी मेंबर्स म्हणून आपली भूमिका बजावणार आहेत. फोटोजेनी चित्रपट महोत्सवामध्ये सर्वांना खुला प्रवेश असून मोठ्या संख्येने रसिकांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा असे, आवाहन कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर यांनी केले आहे.

## बांधकाम व्यावसायिकावर चाकू हल्ला; गुन्हा दाखल

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : प्लॉटिंगवर आमचा कब्जा असल्याचे म्हणत बांधकाम बंद पाडून गोंधळ घालत दहशत निर्माण करणार्‍यास समजावून सांगत असताना अरेरावी करत शिवीगाळ करून जिवेच मारून टाकतो असे म्हणत स्वत:च्या चारचाकी कारमधून चाकू काढून जिवे मारण्याच्या इराद्याने बिल्डर सोलपुरे यांच्या पोटावर वार करून गंभीर जखमी करणाऱ्या विरुद्ध एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याविषयी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, वडगाव परिसरातील गट नं. ८ मध्ये प्लॉटिंगचा व्यवसाय करणारे गोविंद सोलपुरे यांच्या साईटवर बांधकाम सुरू होते, त्याठिकाणी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास गणेश दुधाट, साळवे मामा व एक अनोळखी इसम आले. त्यांनी त्याठिकाणी बांधकाम मजुरांना धमकावत काम बंद पाडले. बांधकाम व्यावसायिक सोलपुरे यांना ही माहिती मिळताच घटनास्थळी हजर दाखल झाले. यावेळी गणेश दुधाट यांना माझ्या प्लॉटवरील बांधकाम का बंद पाडले असे विचारताच दुधाट याने सोलपुरे यांच्या तोंडावर ठोसा मारत, थांब आता तुला खतमच करतो असे म्हणत स्वत:च्या चारचाकी वाहनातून चाकू आणून पोटावर वार केला. परंतु सोलपुरे यांनी मोठ्या शिताफिने पोटावरील वार चुकवला मात्र तो वार सोलपुरे यांच्या पाठीमागून डाव्या पायाच्या मांडीवर लागला. यात सोलपुरे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्या मांडीला ३२ टाके पडले आहेत. जखमी आवस्थेत त्यांना कामगारांनी उपचारासाठी एका खासगी दवाखान्यात दाखल केले. याप्रकरणी बांधकाम व्यावसायिक यांनी एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात तक्रार देत गणेश दुधाट याने जिवे मारण्याच्या उद्देशाने माझ्यावर हल्ला करत माझ्यावर चाकू हल्ला केला तसेच जिवे मारण्याची धमकी दिली असल्याची तक्रार दिली असून, त्यांच्या तक्रारीवरून एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास वरीष्ठ पोलीस निरीक्षक कृष्णकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक अरविंद शिंदे हे करीत आहेत.



**अंबाजोगाई - श्री योगेश्वरी देवीच्या मार्गशिर्ष महोत्सवाची सुरुवात देवीच्या वर्णीपुजेने झाली. यावेळी देवीची महाआरती करताना देवलकमिटीचे अध्यक्ष तथा तहसिलदार विलास तरंगे व त्यांच्या सुविद्य पत्नी मयुरी तरंगे. यावेळी देवलकमिटीचे सर्व पदाधिकारी व विश्वस्त उपस्थित होते... (छाया : अशोक कचरे)**

## मनरेगातून जि.प.शाळांचे सौंदर्यीकरण,सुविधाविकास; जिल्हाधिकाऱ्यांनी मागविले शाळानिहाय नियोजन



छत्रपती संभाजीनगर,दि.९(जिमाका)- जिल्हा परिषद शाळांचे सौंदर्यीकरण व सुविधांच्या विकासाची कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेतून करण्यासाठी शाळानिहाय सविस्तर नियोजन मुख्याध्यापकांनी तयार करावे व १५ दिवसांत प्रस्ताव सादर करावा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

येथील नियोजन सभागृहात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेचा जिल्ह्यातील कामांचा आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, उपजिल्हाधिकारी (रोहयो) उमाकांत पारधी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख तसेच सर्व तहसिलदार, गटविकास अधिकारी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, मनरेगा सारख्या योजनेतून आपल्या गावातील शाळांचा विकास गावकऱ्यांना करणे सहज शक्य आहे. याबाबत दि.१ डिसेंबर २०२० रोजी नियोजन विभागाने एक परिपत्रक निर्गमित केले आहे. त्यानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळांचा आणि अंगणवाड्यांचा भौतिक विकास करता येईल. मजूरी प्रधान कामे करण्यात यावीत, यासाठी शासनाने हे परिपत्रक निर्गमित केले होते. जिल्हा परिषदेच्या शाळांच्या मुख्याध्यापकांनी आपापल्या शाळेत करावयाच्या भौतिक सुविधांची प्राधान्यक्रमवार यादी करुन ती शिक्षणविस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी मार्फत शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवावे. त्यावर तात्काळ अंमलबजावणी करुन येत्या शैक्षणिक वर्षाच्या आधी ही कामे पूर्ण करावीत असे निर्देशही जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

### १३ प्रकारची कामे

शासन परिपत्रकानुसार, शाळांसाठी किचन शेड, शाळा-अंगणवाडीचे रेन वॉटर हार्वेस्टींग, शोषखड्डा , शौचालये , खेळाचे मैदान तयार करणे, संरक्षक भिंत बांधणे, वृक्ष लागवड करणे, आवश्यकतेनुसार शाळा परिसरात पेव्हर ब्लॉक लावणे, कॉंक्रीट नाली बांधकाम, शाळेकडे येणारे रस्ते गुणवत्तापूर्ण करणे, शालेत बोलरवेल असल्यास त्याचे पुनर्भरण करणे, गांडुळखत प्रकल्प तयार करणे, नाडेप कंपोस्ट तयार करणे अशी कामे मनरेगातून शाळांमध्ये करता येतील.

### ७ तालुक्यात जलसंधारणाची कामे

मनरेगा मधून जलसंधारणाची कामे (माथा ते पायथा) करण्यात यावी. त्यावर लक्ष केंद्रीत करुन प्राधान्य द्यावे,असेही निर्देश यावेळी देण्यात आले. यासंदर्भात केंद्रीय ग्रामिण विकास मंत्रालयाने जलनियोजनासाठी देशातील २१२९ तालुक्यांमध्ये ही उपाययोजना राबविण्यात येणार असल्याचे केंद्रशासनाच्या ग्रामिण विकास मंत्रालयाने दिलेल्या वार्षिक प्रधान सुचनापत्रात निर्देशित करण्यात आले आहे. त्यासंदर्भात दि.४ डिसेंबर २०२४ रोजी शासनाने कळविले आहे. त्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ७ तालुक्यांचा समावेश आहे. जलसंधारण उपाययोजना करुन त्याद्वारे जलपातळी वाढविणे असे उद्दिष्ट असून ही सर्व कामे मनरेगा मधून करावयाची आहेत,अशी माहिती यावेळी उमाकांत पारधी यांनी दिली.

### सेवा विषयक १३८ प्रकरणे तडजोडीने निकाली

## 'मॅट'च्या ३३ वर्षात प्रथमच लोक अदालतीचे आयोजन

### तीन प्रकरणांमध्ये १२६ अर्जदारांना शासकीय नोकरीचा लाभ





मुंबई, दि. ९ : महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या (मॅट) इतिहासात ३३ वर्षात प्रथमच लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीत ५४२ सेवा विषयक प्रकरणांपैकी १३८ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

न्यायाधिकरणाच्या अध्यक्ष न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभिनव उपक्रम यशस्वी करण्यात आला. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण आणि मुंबई उच्च न्यायालय विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोक अदालतीसाठी तीन पॅनल आयोजित करण्यात आले होते. पॅनल प्रमुख म्हणून न्यायमूर्ती विनय जोशी, सेवानिवृत्त सदस्य (न्या) ए. पी. कुऱ्हेकर, आर. बी. मलिक यांनी काम पाहिले. नितिन गद्रे (नागपूर), विजयकुमार (औरंगाबाद), विजया चौहान, संदेश तडवी, आर. एम. कोलगे आणि एम.बी. कदम यांनी सदस्य म्हणून काम पाहिले. अदालतीत बरीच वर्षे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची मुख्य सादरकर्ता अधिकारी स्वाती मणचेकर यांनी तपासणी केली. या लोक अदालतीमध्ये नागपूर, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर या तिन्ही खंडपीठातील ५४२ प्रकरणांपैकी १३८ निकाली निघाली. यामध्ये मुंबई खंडपीठाच्या- २३८ प्रकरणांपैकी ३९ तर नागपूर-खंडपीठाच्या १५० पैकी ६३ आणि छत्रपती संभाजीनगर खंडपीठाच्या १५४ प्रकरणांपैकी ३६ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

### तीन प्रकरणांमध्ये १२६ अर्जदारांना शासकीय नोकरी

लोक अदालतीत तीन प्रकरणात तडजोड झाल्याने १२६ अर्जदारांना शासकीय नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जलसंधारण विभागाच्या १७१ आणि कृषि विभागाच्या २१८ जागा माजी सैनिकांसाठी आरक्षित होत्या. यामध्ये सर्व जागांसाठी माजी सैनिक उमेदवार मिळू शकले नाही. त्यामुळे लोक अदालतीत तडजोडीनंतर उर्वरीत रिक्त जागा इतर उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात आल्या. या निर्णयामुळे १२६ उमेदवारांना शासकीय नोकरी मिळू शकणार आहे. या निर्णयामुळे माजी सैनिकांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही.

लोक अदालत यशस्वी करण्यासाठी मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागातील सचिव यांच्यासह न्यायाधिकरणामधील सर्व अधिकारी, कर्मचारी, मुख्य सादरकर्ता अधिकारी, न्यायाधिकरण बार असोसिएशनमधील सर्व वकील, शासनाचे सर्व नोडल अधिकारी यांनी सहकार्य केले.

## राज्यातील वाघांची संख्या वाढतेय

अमरावती: महाराष्ट्रात वाघांची संख्या झपाट्याने वाढत आहे. वन्यजीव संस्थेच्या अहवालानुसार २०२२ च्या व्याघ्र गणनेनुसार महाराष्ट्रात जवळपास ४४६ वाघ आहेत. २००६ मध्ये महाराष्ट्रात वाघांची संख्या ही १०३ इतकी होती. २०१० च्या व्याघ्रगणनेनुसार महाराष्ट्रात वाघांची संख्या ही १६८ वर पोहोचली. २०१४ मध्ये महाराष्ट्रात एकूण १९० वाघ होते. पुढील चार वर्षात वाघांच्या संख्येत झपाट्याने वाढ झाली. २०१८ च्या व्याघ्र गणनेनुसार महाराष्ट्रात ३१२ वाघ होते. वाघांच्या संख्यावाढीचा आलेख पुढील चार वर्षे देखील कायम राहिला. २०२२ च्या व्याघ्र गणनेनुसार आज महाराष्ट्रात जवळपास ४४६ वाघ आहेत. राज्यात वाघांचे प्रमाण हे २३ टक्क्याने वाढत असल्याचे शुभ संकेत आहेत, असे महाराष्ट्र वन्यजीव मंडळाचे माजी सदस्य यादव तरटे यांनी सांगितले.

**व्याघ्र संवर्धनासाठी सज्ज होण्याची गरज :** आज वाघांच्या बाबतीत जगात भारत पहिल्या क्रमांकावर आहे. त्यातही महाराष्ट्रात वाघांची संख्या सर्वाधिक असणे, ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. १९०० मध्ये भारतात एकूण ४०,००० वाघ होते. १९७१ मध्ये दुर्दैवाने भारतात केवळ १८०० वाघ उरले होते. देशाच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी वाघांच्या मोठ्या प्रमाणात खालावलेल्या संख्येची गांभीर्याने दखल घेत भारतीय वन्यजीव अधिनियम १९७२ हे कलम लागू केले. तसेच १९७३ मध्ये व्याघ्र प्रकल्प योजना जाहीर केली.

**व्याघ्र प्रकल्पावर मोठी जबाबदारी :** व्याघ्र प्रकल्प योजनेमुळे वाघांसह जंगलातील इतर प्राण्यांचे संरक्षण व्हायला लागले. आता वाघांची संख्या वाढायला लागली असतानाच हे वाघ जंगलाबाहेर जाणार नाही, याबाबत व्याघ्र प्रकल्पावर मोठी जबाबदारी राहणार आहे. वाघ आणि मानवांचा संघर्ष होणार नाही, याची काळजी घेणे देखील गरजेचे आहे. वाघांची शिकार होणार नाही, याबाबत देखील व्याघ्र प्रकल्पासह वन विभागाला सज्ज राहणे अत्यंत गरजेचे आहे, असे देखील यादव तरटे म्हणाले.

## चेष्टा मस्करीमध्ये केला मित्राचा खून

नाशिक : नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यामध्ये असलेल्या मडकीजाम येथे चेष्टामस्करीत दोन मित्रांच्या किरकोळ वादावादीत झालेल्या मारहाणीत एकाचा मृत्यू झाला असून, दिंडोरी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करत एकास अटक केली आहे.

रात्री दत्तू चंदर रेहरे व वसंत नामदेव गांगोडे हे मित्र गावातील पिंपळाच्या पारावर गप्पा मारताना त्यांच्यात वाद झाला. यात वसंतने धारदार कोटराच्या सहाय्याने दत्तूवर वार केले. यात दत्तू रेहरे (५५) यांचा मृत्यू झाला. किरण दत्तू रेहरे यांनी दिंडोरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करत वसंत गांगोडे यास अटक केली आहे. सपोनि गायत्री जाधव अधिक तपास करत आहेत.

## अग्रलेख...

# बंद करा रडीचा डाव

राज्यात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीप्रणीत महायुतीला २३४ जागा मिळाल्यापासून महाविकास आघाडीने रडीचा डाव सुरू केला आहे. ईव्हीएमला दोष देत जनादेशाचा वारंवार अपमान करण्याचे पाप काँग्रेस, उबाठा आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुरू आहे. शनिवारी विधानसभेचे विशेष अधिवेशन सुरू झाले. नवनिर्वाचित सदस्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देण्यासाठी या अधिवेशनाचे प्रयोजन होते. पहिल्याच दिवशी महाविकास आघाडीच्या सदस्यांनी सभात्याग केला आणि आम्ही शपथ घेणार नसल्याचे सांगितले. नवीन सरकार जनतेने निवडून दिले नसल्याचे रडगाणे गात त्यांनी हा बहिष्कार टाकला. महाराष्ट्रातील कोट्यवधी मतदारांनी निवडून दिलेल्या सरकारला नाकारण्याचा कितीही करंटेपणा काँग्रेस, उबाठा आणि शरद पवार यांच्या पक्षाने केला तरी सरकारचे काहीही बिघडणार नाही. कारण मतदारांच्या मनातले हे सरकार आहे. जनतेने हिंदुत्वाच्या विचारधारेला भरभरून कौल दिला आहे. लाडक्या बहिणींनी देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार या लाडक्या भावांच्या झोळीत मतांचे पवित्र दान टाकले आहे. त्यामुळे जनतेने नाकारलेल्या या लोकांनी आता रडीचा डाव सुरू केला आहे. याच वर्षी मे महिन्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी या लोकांना भरभरून मते दिली होती, तेव्हा ईव्हीएमच्या नावाने गळे काढले नव्हते. मात्र, विधानसभा निवडणुकीत मतदारांनी वेगळा विचार करत महायुतीला मतदान करताच यांचे डोळे पांढरे झाले. स्वतःचे अपयश झाकण्यासाठी हे लोक आता जनादेशाचा अपमान करायलाही मागेपुढे पाहात नाहीत, हे आपल्या लोकशाहीचे दुर्दैव होय. लोकसभेच्या निवडणुकीत आपल्याला कौल देणाऱ्या मतदारांनी पाच महिन्यांच्या अल्पावधीतच स्वतःचे मन कसे बदलले, याबाबत आत्मचिंतन करायचे सोडून महाविकास आघाडीचे नेते ईव्हीएमवर खापर फोडत आहेत, निवडणूक आयोगाला दोष देत आहेत आणि सत्ताधारी भाजपावर बळाचा वापर केल्याचा आरोप करत आहेत. असे करून आपण मतदारांचा अपमान करतो आहोत, याचेही भान त्यांना राहिलेले नाही. काँग्रेसचे नेते राहुल गांधी, त्यांच्या भगिनी प्रियांका वढेरा आणि त्यांच्या पक्षाचे खासदार हातात संविधान घेऊन संसद भवन परिसरात फिरत आहेत आणि दुसरीकडे संविधानानुसारच पार पडलेल्या निवडणुकीवर, मतदारांनी दिलेल्या कौलावर त्यांचेच महाराष्ट्रातील नेते आक्षेप घेत आहेत, हा प्रकार यांचे ढोंग दाखवत आहे. ज्या संविधानानुसार सगळी प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडली, ते संविधान केवळ हाती घेऊन फिरण्याने काहीच साध्य होणार नाही. राहुल गांधी यांनी आधी संविधान पूर्ण वाचले पाहिजे; त्यातल्या तरतुदींचा अभ्यास करायला पाहिजे आणि महाराष्ट्रातल्या स्वपक्षीयांना मार्गदर्शन करायला पाहिजे. इतरांना संविधानाचे धडे देणाऱ्या काँग्रेसने आधी आत्मपरीक्षण करायला पाहिजे. संविधानाचा अपमान सर्वाधिक जर कुणी केला असेल तर काँग्रेसने केला आहे. कारण नसताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर अनेकदा बंदी घातली; १९७५ साली आणिबाणी लागू करून देशातील जनतेचे मूलभूत अधिकार काढून घेतले होते. सोयीनुसार अनेक घटनादुरुस्त्याही करवून घेतल्या. एवढे सगळे करूनही आम्हीच कसे संविधानाचे रक्षक आहोत आणि भाजपावाले कसे भक्षक आहेत, हे दाखविण्याचा अतिशय केविलवाणा प्रयत्न काँग्रेसकडून सुरू आहे. खरे तर काँग्रेसने संविधानाबाबत काहीही बोलण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे. यासंदर्भात एकही शब्द बोलता येणार नाही, एवढ्या वेळा काँग्रेसने संविधानाच्या चिंधड्या उडवल्या आहेत. आपला देश जर धर्मनिरपेक्ष आहे आणि काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांचे म्हणणे आहे, तर मग देशातल्या सर्व नागरिकांसाठी एकच कायदा म्हणजे समान नागरी कायदा का असू नये? काँग्रेसकडून समान नागरी कायद्याला विरोध का केला जातो? एका विशिष्ट समुदायाचे लांगूलचालन का केले जाते? बहुसंख्य असलेल्या हिंदुहिताकडे काँग्रेसचे दुर्लक्ष का आहे? कारण धर्मनिरपेक्षतेशी काँग्रेसला, शरद पवारांना आणि आता उबाठालाही काही घेणेदेणे राहिलेले नाही. त्यांनी कायम दाढ्या कुरवाळत मतपेटीचे राजकारण केले, हे कुणापासूनही लपून राहिलेले नाही. ज्यांना हे लोक कायम अल्पसंख्य म्हणत आले, तेही आता अल्पसंख्य राहिलेले नाहीत. बहुसंख्य असलेल्या हिंदू यात्रेकरूंना कधीही कोणत्याच सुविधा न देणाऱ्या या स्वयंघोषित धर्मनिरपेक्षतावाद्यांनी हज यात्रेसाठी किती प्रचंड सुविधा देऊ केल्यात हे संपूर्ण देशाला माहिती आहे. त्यामुळे महाभकास झालेल्या उबाठा, काँग्रेस आणि शरद पवार यांच्या महाविकास आघाडीने फालतू बाता मारणे बंद केले पाहिजे. कारण विधानसभेत विरोधी पक्षनेतेपद मिळेल एवढे संख्याबळही मतदारांनी यांना दिलेले नाही, याचा विसर पडता कामा नये. लोकसभेच्या मुस्लिम मतदारांनी ठरवून भाजपाच्या विरोधात जिंकू शकेल अशा उमेदवारांना मतदान केले होते, ज्याला नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'व्होट जिहाद' असे नाव दिले आहे, याचा विसर पडून कसा चालेल? लोकसभेत विधानसभेचे सहा मतदारसंघ येतात आणि या सहाही मतदारसंघातील मुस्लिम मतदारांनी त्यांची मते महाविकास आघाडीच्या उमेदवारांना दिली, ही बाब लपून राहिलेली नाही. विधानसभेच्या निवडणुकीत ही मुस्लिम मते विखुरलेली होती, त्याचा फटका महाविकास आघाडीला बसला. याउलट जे हिंदू आपल्या हिताचा विचार करत नव्हते त्यांनी यावेळी हिंदुहिताला प्राधान्य देणाऱ्या महायुतीला मतदान केले. लाडक्या बहिणींनीही महायुतीलाच मतदान केले. त्यामुळे महाविकास आघाडीला मोठा हादरा बसला, हे वास्तव आहे. मरकडवाडीचे उदाहरण देऊन महाविकास आघाडीने जनतेची कितीही दिशाभूल केली तरी उपयोग होणार नाही. ईव्हीएमच्या नावाने कितीही गळे काढले तरी जनमताचा कौल बदलणार नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. रडीचा डाव खेळून जनादेश नाकारत संविधानाचा अनादर करण्याचे पाप काँग्रेस, उबाठा आणि शरद पवारांच्या पक्षाने करू नये. जो जनादेश आला आहे तो सन्मानपूर्वक स्वीकारण्यातच त्यांचे हित आहे. ज्यांनी या तीन पक्षांच्या उमेदवारांना विजयी केले आहे, त्यांच्या मतांचा आदर करत पहिल्या दिवशी महाविकास आघाडीने सदस्यांच्या शपथविधी कार्यक्रमावर बहिष्कार घालायला नको होता. अशी कृती करून आपण संविधानानुसार अस्तित्वात आलेल्या विधिमंडळाचा अपमान करतो आहोत, याचेही भान इतरांना संविधानाचे दाखले देणाऱ्यांना राहिले नाही, याचेही आश्चर्य वाटत नाही. कारण यांनी संविधानाचा सन्मान कधी केलाच नाही. आणिबाणीचे काळे पर्व जनता विसरलेली नाही. काँग्रेसच्या नेत्या आणि पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या सरकारने काहीही कारण नसताना जनतेचे मूलभूत अधिकार काढून घेतले होते; एवढेच नाही तर कोणतेही कारण न सांगता हजारो लोकांना, विशेषतः राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अधिकाऱ्यांना आणि स्वयंसेवकांना १९ महिने तुरुंगात डांबले होते. तेव्हा कुठे गेले होते संविधान? हे पाप काँग्रेस विसरली असेल, ज्यांचा छळ झाला, ज्या कुटुंबांनी छळ सहन केला ते कसे विसरतील? संविधान पायदळी तुडवून ज्यांनी अमर्याद सत्ता उपभोगली, ज्यांनी कायम मतपेटीचे राजकारण करून दोन समुदायांमध्ये अंतर निर्माण केले, ते लोक आज इतरांना संविधानाचे दाखल देत फिरत आहेत, हे केवळ हास्यास्पद आहे. मनाचा मोठेपणा दाखवत काँग्रेसने जाहीर माफी मागायला हवी आणि आणिबाणी लादून ऐतिहासिक चूक केली होती, असा कबुलीजबाब काँग्रेसकडे मागणेही व्यर्थच ठरेल! कारण त्यांनी सगळ्या चुका ठरवून केल्या होत्या, लोकशाहीची ठरवून हत्या केली होती, ठरवून संविधानाच्या चिंधड्या उडवल्या होत्या. आज तेच लोक सांस्कृतिक राष्ट्रवाद जोपासणाऱ्या आणि देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या भारतीय जनता पार्टीला आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शिव्या घालताहेत, हे जनतेनेही ओळखले आहे. आणि म्हणूनच सर्व भाषिक, सर्वपंथीय, सर्वप्रांतीय, सर्वजातीय लोकांनी भाजपाचा, हिंदुत्वाच्या विचारांचा स्वीकार केला आहे. ही बाब लक्षात घेऊन तरी काँग्रेसप्रणीत महाविकास आघाडीने रडीचा डाव थांबवला पाहिजे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# आता 'व्यापार-युद्ध' भडकणार!

एकीकडे अमेरिकेचे मावळते राष्ट्रपती ज्यो बायडेन यांनी युक्रेनला ६ हजार कोटींची अत्याधुनिक शस्त्रास्त्रे देण्याची घोषणा केली, तर दुसरीकडे उगवते राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासह काही देशांत 'व्यापार-युद्ध' सुरू करण्याचा इशारा दिला आहे. भारत, रशिया, चीन या देशांमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर १०० टक्के आयात शुल्क लावण्याचा इशारा दिला आहे.

**अमेरिकेची भीती :** लष्करी सामर्थ्य हे जसे अमेरिकेच्या जागतिक वर्चस्वाचे एक प्रतीक आहे, तसेच आणखी एक प्रतीक आहे, ते म्हणजे डॉलर! जगाचा बहुतांश व्यापार डॉलर्सच्या माध्यमातून केला जातो. अशा या शक्तिशाली डॉलरला भारत, रशिया, चीन यांचा सहभाग असलेल्या 'ब्रिक्स' या संघटनेकडून धोका असल्याची कुणकुण लागल्यानंतर ट्रम्प यांनी हा इशारा दिला असल्याचे मानले जाते.

**ऑक्टोबरची बैठक :** ऑक्टोबर महिन्यात रशियातील कझान शहरात ब्रिक्स देशांची एक बैठक झाली होती. त्या बैठकीत अन्य विषयांसोबतच 'ब्रिक्स' देशांचे एखादे चलन असावे काय, यावर प्राथमिक चर्चा झाली होती. युरोपमधील देशांनी 'युरो' चलन तयार केले, तसेच एखादे चलन ब्रिक्स देशांनी तयार करावे, अशी चर्चा मागील अनेक वर्षांपासून केली जात आहे. ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका, इराण, इजिप्त, इथोपिया व संयुक्त अरब अमिरात हे नऊ देश ब्रिक्सचे सदस्य आहेत.

**रशियाचा पुढाकार :** ब्रिक्सचे नवे चलन असण्याच्या चर्चेत रशियाचा पुढाकार आहे. कारण, युक्रेन युद्धामध्ये अमेरिका व युरोपमधील अन्य देशांनी रशियावर आर्थिक निर्बंध लावले आहेत. परदेशातील रशियाची संपत्ती, परदेशी बँकांमधील त्याची खाती या सर्व बाबी गोठविण्यात आल्या आहेत. त्यामुळे रशिया अडचणीत आला असला तरी त्याची पूर्ण कोंडी करणे अमेरिकेला शक्य झालेले नाही, याचे कारण भारत व चीन या दोन देशांनी त्याला केलेली मदत. भारताने रशियाकडून मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आयात केले. हे तेल स्वस्त असल्याने भारताला फायदा झाला आणि भारताने ही किंमत रशियाच्या चलनात म्हणजे रूबलमध्ये चुकविण्याने रशियालाही दिलासा मिळाला. यात चीनने रशियाला मोठी मदत केली. युआन या आपल्या चलनाच्या माध्यमातून चीनने रशियाशी आपला व्यापार सुरू ठेवला. रशियाच्या अर्थव्यवस्थेने तग धरला याचे हे एक मुख्य कारण ठरले. बहुधा यातूनच रशियाने ब्रिक्स देशांचे एक स्वतंत्र चलन असावे हा मुद्दा रेटून धरला.

**अमेरिका संतप्त :** रशियाच्या या खेळीत भारत व चीन दोघेही सामील असल्याचा संशय आल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी ब्रिक्स देशांना धमकी देणारे एक निवेदन जारी केले. डॉलरला कमजोर करण्याचा वा डॉलरला पर्याय देण्यासाठी एखादे नवे चलन बाजारात आणण्याचा प्रयत्न ब्रिक्स देशांनी केल्यास, आपण गप्प बसणार नाही, त्याला जोरदार प्रतिकार केला जाईल, असेही ट्रम्प यांनी स्पष्ट केले.

**भारताचा खुलासा :** डोनाल्ड ट्रम्प यांच्या या भूमिकेनंतर भारत डॉलरच्या विरोधात नाही, डॉलरला कमजोर करण्याच्या प्रक्रियेत सामील होणार नाही, हे स्पष्ट करण्यात आले. भारताने हे स्पष्टीकरण करीत अमेरिकला योग्य संदेश दिला आहे. रशिया-चीन यांच्या 'अमेरिकाविरोधी' भूमिकेत भारताने सहभागी होण्याचे कारण नव्हते. त्यामुळे भारताच्या या भूमिकेचे अमेरिकेत स्वागत केले जाईल, अशी अपेक्षा आहे.

**तर युआन बळकट :** डॉलर कमजोर होणे म्हणजे चीनचे चलन युआन बळकट करण्यासारखे आहे. भारत-चीन संबंधांचा इतिहास, २०२०मध्ये पूर्व लडाखमधील सीमा भागात भारत-चीन यांच्यात झडलेली चकमक, पाकिस्तान, नेपाळ, भूतान, श्रीलंका, बांगलादेश या देशांवर चीनची घट्ट होत चाललेली पकड, या साऱ्याचा विचार करता चीनचे चलन बळकट होणे वा ब्रिक्स देशांनी चिनी चलनाचा स्वीकर करणे भारताला मुळीच परवडणारे नाही. आज अमेरिकेचा एक डॉलर खरेदी करण्यासाठी चीनला साडेसात युआन मोजावे लागतात. युआन अधिक कमजोर होणे, भारताच्या फायद्याचे ठरणार आहे. या साऱ्याचा विचार करून, भारताने डॉलरविरोधी मोहिमेतून स्वतःला बाजूला केले, हे योग्यच झाले आहे.

**व्यापार-युद्ध :** राष्ट्रपती असताना डोनाल्ड ट्रम्प यांचा चीनशी जोरदार संघर्ष सुरू होता. चिनी कंपन्यांनी अमेरिकन कंपन्यांमधील माहिती चोरून आपले स्वतःचे तंत्रज्ञान विकसित केले. याचा फटका अमेरिकेला बसला, असा ट्रम्प यांचा आरोप होता आणि तो बरोबर होता. चीन आज प्रगत देश असल्याचा दावा करीत आहे, वेगवेगळ्या क्षेत्रांत यश संपादन केल्याचा दावा करीत आहे, पण हे सारे तंत्रज्ञान त्याने अमेरिकन कंपन्यांमधून चोरले आहे. त्याविरोधात ट्रम्प यांनी जोरदार आघाडी उघडली होती.

**२० जानेवारीनंतर :** अमेरिकेचे नवे राष्ट्रपती म्हणून ट्रम्प २० जानेवारी रोजी शपथ घेतील. त्यानंतर ते चीनविरोधात जोरदार आघाडी उघडतील काय, असा प्रश्न आता विचारला जाऊ लागला आहे. म्हणजे एकीकडे युक्रेन व इस्रायल-हमास-हिजबुल्ला यांच्यात सुरू असलेला संघर्ष आणि अमेरिका-चीन यांच्यात सुरू होणारे □'व्यापार-युद्ध' असे चित्र आताच दिसू लागले आहे. ट्रम्प यांनी हमासला नवा इशारा दिला आहे. युक्रेनबाबत त्यांची भूमिका पुरेशी स्पष्ट झालेली नाही. त्यांनी अमेरिकेची विद्यमान भूमिका जारी ठेवल्यास २० जानेवारीनंतर जगाचे तापमान वाढण्याचीच शक्यता आहे. भारत यात कुठेच नसला तरी भारतालाही याच्या झळा बसणे अनिवार्य असल्याचे मानले जाते.

**पहिली ठिणगी :** दोन देशांमध्ये सुरू होणाऱ्या व्यापार-युद्धाची पहिली ठिणगी पडली आहे. अमेरिकेने चीनच्या सेमीकंडक्टर उद्योगांवर निर्बंध लावण्याची घोषणा केल्यानंतर, गॅलियम, जर्मेनियम आणि अँटीमोनी या धातूंच्या निर्यातीवर बंदी घालण्याची घोषणा केली. ही बंदी तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे. या धातूंचा वापर अमेरिकेतील सेमीकंडक्टर उद्योगात केला जात होता. जगातील एकूण गॅलियम उत्पादनापैकी ९४ टक्के उत्पादन एकट्या चीनमध्ये होते, तर जगाच्या एकूण जर्मेनियम उत्पादनापैकी ८३ टक्के उत्पादन एकटा चीन करतो. सेमीकंडक्टर उद्योगांत हे दोन्ही धातू महत्त्वाचे असतात. अशा या सेमीकंडक्टर उद्योगांपासून दोन्ही देशांत व्यापार-युद्धाचा नवा भडका उडाला आहे.

**पुढील ठिणगी :** अमेरिकेला मादक द्रव्याच्या प्रसाराने ग्रासले आहे. या मादक द्रव्यांमध्ये जे रसायन वापरले जाते, त्याचे उत्पादन चीनमध्ये मोठ्या प्रमाणावर केले जाते. चीनने या पदार्थांचे उत्पादन थांबवावे, असे प्रयत्न अमेरिकेकडून अनेकदा करण्यात आले आहेत. मात्र, चीनने त्याकडे दुर्लक्ष करण्याचे धोरण स्वीकारले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात हा मुद्दा उपस्थित केला होता. आता दुसऱ्या कार्यकाळातही ते पुन्हा मादक द्रव्यांच्या प्रसारात चीनच्या भूमिकेचा मुद्दा उपस्थित करतील, असे म्हटले जाते.

**चीनची गुगली :** चीनचे अधिकृत वृत्तपत्र ग्लोबल टाईम्सने एपल, टेसला, एचपी यासारख्या कंपन्यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. अमेरिका-चीन यांच्यात नव्याने सुरू झालेल्या व्यापार-युद्धात चीनकडून या कंपन्यांचे कौतुक 'गुगली' मानले जाते.

**तिसरे युद्ध :** २०२२च्या फेब्रुवारी महिन्यात रशियाने युक्रेनवर आक्रमण केले. केवळ तीन-चार दिवसांत युक्रेनचा पाडाव होईल, या योजनेने राष्ट्रपती पुतिन यांनी युक्रेन मोहीम सुरू केली. आता २०२४ म्हणजे आक्रमणाचे जवळपास तिसरे वर्ष सरत आले असले तरी निर्णायक विजय रशियाच्या दृष्टिपथात नाही. २०२३च्या ऑक्टोबर महिन्यात हमासने-इस्रायलवर हल्ला केला. याला इस्रायलने उत्तर दिले. काही दिवसांत हमासला संपविले जाईल, असे इस्रायलला वाटत होते. ते इस्रायलला अद्याप करता आलेले नाही आणि आता २०२४ सरत आले असताना नवनिर्वाचित राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनशी व्यापार-युद्ध सुरू करण्याचा इशारा दिला आहे. या युद्धाचा अधिकृत प्रारंभ २० जानेवारी रोजी होणाऱ्या त्यांच्या शपथविधीने होईल की, काही काळाने? सारे जग याची श्वास रोखून प्रतीक्षा करणार आहे.

## वेध

अनिरुद्ध पांडे

# 'मैं ना भुलूंगा...!'

५१ वर्षांपूर्वी, म्हणजेच १९७३ मध्ये तेव्हाचे पाकिस्तानचे पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांनी तेथील सार्वत्रिक निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर 'मांग रहा है हर इन्सान, रोटी कपडा और मकान' हा नारा पाकिस्तानी जनतेला दिला होता. या नाऱ्याच्या भरवशावर, लोकांनी त्यावर विश्वास ठेवल्यामुळे भुट्टोंनी ती निवडणूक जिंकून पंतप्रधानपदही मिळविले होते. त्याच काळात, नव्हे त्यापूर्वीच आपल्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी 'गरिबी हटाव' हा नारा देऊन लोकप्रियही केला होता. त्या लोकप्रियतेतूनच त्यांनी दीर्घकाळ, म्हणजे चार वेळा भारताचे पंतप्रधानपदही भूषविले होते. भारतातील गरिबी काही हटली नाही, पण फार वाढलीही नाही, असे एक मत आहे. पाकिस्तानात मात्र तसे काही झाले नाही. तेथील गरिबी, दैना वाढतच गेली, रोटी, कपडा और मकानसाठी तेथे आजही किती भयंकर संघर्ष आहे, हे सारे जग पाहातच आहे. पण भुट्टोंच्या १९७३ मधील 'मांग रहा है हर इन्सान, रोटी कपडा और मकान' या नाऱ्यापासून ५० वर्षांपूर्वी, १९७४ मध्ये आपले लोकप्रिय भारतकुमार ऊर्फ मनोजकुमार यांनी प्रेरणा घेऊन 'रोटी कपडा और मकान' हा चित्रपट भारतीय हिंदी चित्रपट रसिकांसाठी निर्मिला होता. शहीद, उपकार, पूरब और पश्चिम अशा लोकप्रिय देशभक्तिपर चित्रपटांनंतर 'भारतकुमार' असा उल्लेख होऊ लागलेल्या मनोजकुमारने नंतर 'शोर' या वेगळ्या विषयावरील चित्रपट निर्मिती केली. पण एक चांगला विषय असूनही तो आर्थिक आघाडीवर पडला. त्यानंतर मनोजकुमारने पुन्हा 'भारतकुमार'चे कपडे घालून 'रोटी कपडा और मकान'ला हात घातला.

लेखक, दिग्दर्शक आणि नायक अशा सबकुछ मनोजकुमारने हा 'रोटी कपडा और मकान' काढला होता. आपल्या परंपरेनुसार याही चित्रपटात तो 'भारत' याच नावाचा नायक होता. यात भारतचा लहान भाऊ विजय म्हणून अमिताभ बच्चन, भारतची प्रेयसी शीतलच्या भूमिकेत झीनत अमान, तुलसी या गरीब तरुणीच्या भूमिकेत मौसमी चटर्जी, मोहनबाबू नावाच्या गर्भश्रीमंत उद्योगपतीच्या भूमिकेत शशी कपूर आणि सरदार हरनामसिंगच्या भूमिकेत प्रेमनाथ असे भारी कलावंत या प्रमुख भूमिकांमध्ये होते. यातही गंमत म्हणजे 'रोटी कपडा और मकान'च्या सुरुवातीच्या जाहिरातींमध्ये अमिताभ बच्चनला दुय्यम स्थान होते. पुढे अमिताभचा 'दीवार' आला आणि त्याने मनोजकुमार, झीनत, शशी कपूर यांना खूपच मागे टाकले. त्यानंतरच्या 'रोटी कपडा..'च्या जाहिरातींमध्ये 'दुय्यम' भूमिका असलेल्या अमिताभ बच्चनला 'अव्वल' स्थान मिळाले; किंबहुना बॉक्स ऑफिसवर लक्ष ठेवून निर्मात्यांना ते द्यावेच लागले. त्या दुसऱ्या टप्प्यातल्या जाहिराती पाहिल्या तर या चित्रपटाच्या मध्यवर्ती भूमिकेतच अमिताभ आहे, असे वाटते. पुढे या चित्रपटाच्या वाटचालीत अमिताभ हेच नाणे वाजत होते, अशीही तेव्हा चर्चा होती. कारणे काहीही असो, ५० वर्षांपूर्वीचा, १९७४ चा 'रोटी कपडा और मकान' हा नक्कीच एक यशस्वी आणि ब्लॉकबस्टर चित्रपट होता. या चित्रपटाला त्यावर्षी फिल्मफेअरच्या ११ पुरस्कारांचे नामांकन मिळाले होते. त्यापैकी सर्वश्रेष्ठ दिग्दर्शक मनोजकुमार, सर्वश्रेष्ठ गीतकार संतोष आनंद (मैं ना भुलूंगा) आणि सर्वश्रेष्ठ पार्श्वगायक महेंद्र कपूर (और नहीं बस और नहीं) या तीन पुरस्कारांवर या चित्रपटाने मोहर उमटवली होती.

'रोटी कपडा और मकान'साठीच सर्वोत्कृष्ट चित्रपट, कथा व अभिनेता म्हणून मनोजकुमार, सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेता म्हणून प्रेमनाथ व अभिनेत्री म्हणून मौसमी चटर्जी, सर्वोत्कृष्ट संगीतकार म्हणून लक्ष्मीकांत- प्यारेलाल, सर्वोत्कृष्ट गायक म्हणून मुकेश आणि दुसऱ्या गीतासाठी संतोष आनंद अशी ही पुरस्कार हुकलेली नामांकने होती. लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्या लक्षणीय संगीत नियोजनात संतोष आनंद यांची सारीच गाणी त्यावेळी लोकप्रिय झाली होती. लता मंगेशकर आणि मुकेश यांनी गायलेले 'मैं ना भुलूंगा', महेंद्र कपूर यांचे 'और नहीं बस और नहीं' आणि नरेंद्र चंचल व जानीबाबू कव्वाल यांची 'बाकी कुछ बचा तो महंगाई मार गयी' ही कव्वाली या गाण्यांनी त्यावेळी धूम केली होती. सोबतच 'हाय हाय ये मजबुरी' आणि 'पंडितजी मेरे मरने के बाद' ही तशी हलक्या दर्जाची गाणीही त्याच दर्जाच्या प्रेक्षकांना थोडीफार आवडली होती. १९७४ चा बॉलिवूडमधील सर्वाधिक सुपरहिट असे यश 'रोटी कपडा और मकान'लाच लाभले होते. त्या वर्षी 'चोर मचाये शोर' हा दुसरा सुपरहिट चित्रपट होता. तर मजबूर, पत्थर और पायल, आप की कसम, हाथ की सफाई, प्राण जाए पर वचन ना जाये असे काही चित्रपट बॉक्स ऑफिसच्या हिशेबाने 'सेमी हिट' ठरले होते. त्यावर्षी दिलीपकुमारच्या उतरत्या काळातील 'सगीना' हा चित्रपट फ्लॉपमध्येच जमा झाला होता. त्या काळातील गरिबी, बेकारी, भ्रष्टाचार अशा ज्वलंत प्रश्नांवर 'रोटी कपडा और मकान' उत्तम भाष्य करतो. हा चित्रपट तेव्हापासून आजही कायमच असलेल्या त्या प्रश्नांवर तेवढेच ज्वलंत भाष्य करत असल्यामुळे तो आजची पिढीही नक्कीच 'एन्जॉय' करू शकते.

९८८१७१७८२९

## कानोसा

अमोल पुसदकर

# बांगलादेशी हिंदूंचा तारणहार कोण?

५ ऑगस्ट २०२४ ला बांगलादेशमध्ये चाललेल्या कट्टरवादी हिंसक आंदोलनाने शेख हसीना सरकारचा बळी घेतला. हिंसक प्रदर्शन करणारा जमाव संसदेच्या दिशेने चालू लागला. आपल्या जीविताची हमी शेख हसीना यांना वाटली नाही त्यामुळे त्यांनी ताबडतोब राजीनामा दिला व भारताचा आश्रय घेतला. १९७१ च्या बांगलादेश मुक्ती संग्रामात भाग घेतलेल्या सैनिकांच्या मुला-मुलींच्या आरक्षणासंदर्भातला निर्णय तेथील न्यायालयाने पारित केला होता. त्याच्या विरोधात हे आंदोलन सुरुवातीला उभे राहिले. परंतु पाकिस्तान समर्थित कट्टरवाद्यांनी हे आंदोलन आपल्या हातात घेतले आणि त्यानंतर तेथे हिंसाचाराला सुरुवात झाली. जवळपास २०० ठिकाणी हिंदू वस्त्या, हिंदू घरे, देवालये, हिंदूंची दुकाने, हिंदूंच्या कंपन्या व हिंदू समाजातील विविध घटकांना हिंसाचाराचे लक्ष्य करण्यात आले. मंदिरांमध्ये तोडफोड झाली. मेहरपूरमध्ये इस्कॉन मंदिरावर हल्ला करण्यात आला. भगवान जगन्नाथ, सुभद्रा यांच्या मूर्ती भग्न करण्यात आल्या. मंदिरांची तोडफोड करून भक्तांना मारहाण करण्यात आली. मंदिराच्या पुजाऱ्यांनी कसाबसा आपला जीव वाचवला. नौखालीमध्ये मंदिराची जाळपोळ करण्यात आली. भक्तांना आपल्या देवाला जळताना बघणे अनिवार्य झाले. मौलवी बाजारातसुद्धा हिंदूंवर हल्ले करण्यात आले. हे सत्र संपूर्ण बांगलादेशातच सुरू होते; ज्यामध्ये प्रामुख्याने मौलवी बाजार, रंगपूर, छत्रपूर, ढाका, मैमनसिंह, चट्टोग्राम, ब्राह्मणबरिया, सिराजपूर इत्यादी ठिकाणांचा समावेश होता. या हिंसाचारामध्ये खेळाडू, कलाकार, हिंदू पोलिस, सर्वसामान्य नागरिक, महिला, बालक अशा अनेकांना आपले प्राण गमवावे लागले. साधारणतः ३५० पेक्षा अधिक लोक या हिंसाचारात मारले गेले.

ज्या बांगलादेशाला १९७१ मध्ये भारताने स्वातंत्र्य मिळवून दिले तोच बांगलादेश आज त्याच्या मुक्तिदात्यांच्या जीवावर उठलेला दिसून येत आहे. गाझापट्टीमध्ये थोडेसे मुसलमान मारले गेले की ज्या वृत्तवाहिन्या वारंवार




मुसलमानांवर इस्रायल कसे अत्याचार करीत आहे हे दाखवतात, मानवतावादी आपली छाती पिटून रडतात, बॉलिवूड कलाकार त्याचा निषेध करतात ते बॉलिवूड आज शांत आहे. मानवतावादी झोपलेले आहेत. वृत्तवाहिन्या बांगलादेशींच्या करुण परिस्थितीला दाखविण्यासाठी उत्सुक नाही. अशा पद्धतीची परिस्थिती सध्या निर्माण झालेली आहे.

भारतामध्ये इतके राजकीय पक्ष आहेत, परंतु हिंदूंच्या परिस्थितीवर कोणीही चिंता व्यक्त केली नाही. कोणत्याच पक्षाने निदर्शने केली नाहीत. कोणत्याच पक्षाने सरकारवर हिंदूंच्या सुरक्षेसाठी काही पावले उचलली पाहिजेत अशा पद्धतीचा दबाव निर्माण केला नाही. जागोजागी हिंदू संघटनांनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे. सर्वसामान्य हिंदू समाजाने एकत्र येण्याची आवश्यकता आहे. सरकार मोदींचे असो किंवा कोणाचेही; परंतु हिंदुहितासाठी रस्त्यावर येणे, सरकारला जागे करणे व कडक पावले उचलायला बाध्य करणे आवश्यक आहे. पाकिस्तानमध्ये मुसलमानांवर अत्याचार होत होते त्यावेळेला आम्हीच त्यांच्या रक्षणासाठी धावलो व पाकिस्तानचे दोन तुकडे केले. बांगला मुसलमानांच्या रक्षणासाठी जर आम्ही पाकिस्तानचे दोन तुकडे करू शकतो तर बांगलादेशाने हे लक्षात ठेवावे की, एक कोटी हिंदूंच्या रक्षणासाठी बांगलादेशाचेही तुकडे केले जाऊ शकतात. बांगलादेशने त्याच्या देशातील कट्टरवादी पाकिस्तान समर्थक, चीन समर्थक अशा शक्तींना लगाम घालणे आवश्यक आहे.

जो देश स्वतःच्या राष्ट्रपुरुषाचा म्हणजे मुजीबुर रहमानांचा पुतळा तोडू शकतो, जो देश भारताने केलेले उपकार खोडून काढू शकतो, विसरू शकतो, असा देश हा कुठल्याही संबंधासाठी पात्र नाही हे जनतेने ओळखले पाहिजे. व्यापाऱ्यांनी व्यापार करताना जोपर्यंत हिंदू सुरक्षित राहत नाही तोपर्यंत बांगलादेशसोबत व्यापार करू नये व हिंदूंनी वस्तू विकत घेताना कुठल्याही ऑनलाईन वस्तू मागवताना जर त्या बांगलादेशात बनलेल्या असतील तर त्यांना भारतामध्ये प्रवेश देऊ नये. त्रिपुराच्या सरकारने तेथे कुठल्याही हॉटेलमध्ये बांगलादेशीयांना जेवण मिळणार नाही व कुठल्याही दवाखान्यात त्यांना भरती केले जाणार नाही, असा निर्णय घेतलेला आहे. अशाच पद्धतीचे निर्णय संपूर्ण भारतभर सरकारांनी घेणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने आंतरराष्ट्रीय स्तरावर हा मुद्दा गाजविणे आवश्यक आहे. जे बांगलादेशी भारतामध्ये घुसखोरी करून राहात आहेत, त्यांना या निमित्ताने बांगलादेशात हाकलण्याची आवश्यकता आहे. झोपलेल्या संयुक्त राष्ट्र संघाला जागे करण्याची आवश्यकता आहे. भारतामध्ये जर काही हजार ठिकाणी हिंदू एकत्र आले व त्यांनी बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराचा निषेध केला तर निश्चितच हा आवाज संयुक्त राष्ट्र संघापर्यंत जाईल. मुसलमानांचा अधिकार हा मानव अधिकार आहे व हिंदूंचा अधिकार हा मानव अधिकार नाही या समजुतीतून ते बाहेर निघतील. त्यामुळे सर्व समाजाने एकत्र येणे, समाज माध्यमांवर बांगलादेशी अत्याचाराच्या कहाण्या, त्याचे फोटो इत्यादी टाकून लोकांचेही प्रबोधन करणे आवश्यक आहे. विविध वृत्तवाहिन्या, वर्तमानपत्रांमध्ये याबाबतीत लेख देणे आवश्यक आहे. काही दिवसांपूर्वी वर्तमानपत्रांनी राम मंदिर गळत आहे, अशा पद्धतीची बातमी छापली होती. बांगलादेशामध्ये हिंदूंची मंदिरे जळत आहेत, ही बातमी मात्र त्यांना छापावी वाटली नाही. अशा हिंदू विरोधी वर्तमानपत्रे व वृत्तवाहिन्यांवर बहिष्कार घालण्याची आवश्यकता आहे. हिंदूंनी या विषयाला अधिक प्रखरतेने घेण्याची व बांगलादेशी हिंदूंच्या मागे संपूर्ण भारत उभा आहे हे दाखवून देण्याची गरज आहे असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### देवाभाऊ, आम्हाला वाचवा हो!


'मिलिंद नार्वेकरांच्या पोस्टमुळे अबू आझमी मविआतून बाहेर' ही बातमी वाचली. या बातमीला अनेक गोष्टींची पृष्ठभूमी आहे. पहिली गोष्ट म्हणजे उबाठा गटाने अयोध्येतील वादग्रस्त ढांच्याची जाहिरात हेतुपुरस्सर छापली आहे. आम्ही लोकसभा निवडणुकीत मुस्लिम मतांमुळे विजयी झालो, असे म्हणणाऱ्या उबाठांच्या मताचा लंबक आता हिंदुत्वाकडे का झुकला? याला कारण आहे येणाऱ्या मुंबई मनपाच्या निवडणुका! मुंबई मनपा उबाठा गटाची रिझर्व्ह बँक असल्याने ती हातातून जाणे उबाठा गटाला परवडणारे नाही. त्यासाठीच ते हिरवी टोपी फेकून पुन्हा भगवी टोपी घालत आहेत. त्यासाठी ते पुन्हा बिनशर्त युतीत घुसखोरी करण्याचाही प्रयत्न करतील. पण भाजपा आणि महायुतीने त्यांच्या कटाला फसू नये आणि त्यांना कोणत्याही परिस्थितीत महायुतीत घेऊ नये.

दुसरे कारण म्हणजे काँग्रेस नेतृत्वाखाली आजवर इंडिया आघाडीने नव्वदच्या आसपास निवडणुकांमध्ये पराभव बघितला आहे. त्यामुळेच इंडिया आघाडीला घरघर लागली आहे. देशभरात आघाडीच्या नेत्यांकडून काँग्रेस आणि राहुल गांधींच्या नेतृत्वाला कडाडून विरोध होतो आहे. महाराष्ट्रात शरद पवारांच्या पक्षाची दुरवस्था सर्वांना माहीत आहेच. काँग्रेसच्या नादी लागून तसे झाले तर आपला त्राता कोण याची चिंता उबाठा गटाला ग्रासते आहे. निवडून आलेल्या आमदारांना पाच वर्षे सांभाळून ठेवणेही त्यांना जड जाणार आहे. त्यासाठीही ते इंडिया आघाडी सोडण्याचा निर्णय घेऊ शकतात. पण महायुतीने हा जळता निखारा पदरात घेऊ नये. नाहीतर 'असंगाशी संग अन् प्राणांशी गाठ' या म्हणीचा प्रत्यय येऊ शकतो.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### निष्काळजी जीवांची काळजी वाहतूक विभागाला कशाला?

वाहतूक विभागाच्या अचानक आलेल्या एका आदेशामुळे गेल्या आठवडाभरात हेल्मेटचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला. दुचाकी वाहनचालकाला हेल्मेटसक्ती होती. आता दुचाकीवर मागे बसणाऱ्या व्यक्तीसाठी हेल्मेटसक्ती तातडीने लागू करण्यात आली. ही नागरिकांच्या जीवाची काळजी वाहतूक विभागाला अशी अचानक



वाटण्याचे कारण काय ते अजून कळू शकले नाही. पण मुळात वाहतूक विभागाची नेमकी जबाबदारी काय आहे? असा प्रश्न मात्र नक्कीच उपस्थित झाला. रस्त्यावरील वाहतूक सुरळीत चालावी म्हणून वाहतूक संचालनाची व्यवस्था सांभाळणे, निष्काळजीपणे धोकादायक पद्धतीने वाहन चालविण्याने रस्त्यावर असलेल्या इतर वाहनांची किंवा व्यक्तींची सुरक्षा धोक्यात येत असेल तर त्या वाहनावर किंवा वाहनचालकावर तत्काळ कारवाई करणे ही त्यांची जबाबदारी असावी हे कुणालाही पटण्याजोगे आहे. पण प्रत्येक नागरिकाच्या व्यक्तिगत सुरक्षेची काळजी वाहण्याची जबाबदारी वाहतूक विभागाची आहे का? हेल्मेट न घातल्याने त्या एका व्यक्ती व्यतिरिक्त इतर नागरिकांचा जीव धोक्यात येत नसेल तर त्या निष्काळजी जीवाची काळजी वाहतूक विभागाने का करावी? हे अनाकलनीय आहे.

**प्रसाद पोफळी**/९८२२५६९६४८

### कोत्या मनाचे नेते

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी शपथ घेतली. देशाचे पंतप्रधान, अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, उद्योगपती, संत, महंत, कलाकार इत्यादी अनेक मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. काँग्रेस, शरद पवार यांचा राष्ट्रवादी गट आणि उद्धव ठाकरे यांचा गट या शपथविधीला अनुपस्थित होते ही बाब त्यांच्या कोत्या मनाची निदर्शक वाटते. या तीन पक्षांतील अनेक नेत्यांनी मुख्यमंत्री होण्याचे स्वप्नरंजन केले होते. या तीनही पक्षांची ढिसाळ धोरणे, त्यांनी चालवलेला अल्पसंख्यकांचा अनुनय आणि या पक्षांजवळ नसलेली विश्वसनीयता यामुळे मतदारांनी या तीनही पक्षांना साफ नाकारले. त्याचवेळी भाजपा व मित्रपक्ष यांच्याबद्दल जनतेला विश्वास वाटला. देवेंद्र फडणवीस यांचे कुशल नेतृत्व हे देखील या विराट विजयाचे एक कारण आहे. सकाळी ठरावीक वेळेला भोंगा वाजवणे, ईव्हीएमवर शंका घेणे यातून फार काही साध्य होणार नाही. पराभवाला कारणीभूत ठरलेले नेते सार्वजनिक ठिकाणी तोंड दाखवायला देखील तयार नाहीत असा तर्क करता येतो. महाराष्ट्र एक प्रगतिशील राज्य आहे. अजूनही या राज्यात राजकीय प्रगल्भता कायम आहे. या सर्व पृष्ठभूमीवर पराभूत पक्षांच्या निमंत्रित नेत्यांनी शपथविधी सोहळ्याला उपस्थिती लावली असती त्यांच्या परिपक्वतेचे दर्शन घडले असते. संसदेचे काम ठप्प झालेले असतानाही संसदेच्या कामामुळे येणे शक्य झाले नाही यासारखे खुलासे सामान्यांच्या पचनी पडले नाहीत. शपथविधी सोहळ्याला गैरहजर राहिलेल्या नेत्यांनी ते कोत्या मनाचे असल्याचे प्रकट केले.

**हेमंत पुरुषोत्तम कद्रे**/९४२२२१५३४३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# येल्डा येथील वसतिगृहात विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा

## ‘स्वाराती’ रुग्णालयात उपचार सुरु

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.९ डिसेंबर**

अंबाजोगाई तालुक्यात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हंगामी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याची घटना उघडकीस आली आहे. घटनेनंतर सदरील विद्यार्थ्यांना अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात अधिक उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्या विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत. विषबाधेच्या घटनेमुळे वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

या बाबत प्राप्त माहिती अशी की, बीड जिल्हा हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा आहे. सध्या ऊसतोड कामगार हे ऊसतोडणीसाठी बाहेर जिल्ह्यात आणि राज्यात गेले आहेत. ऊसतोड कामगारांच्या मुलांचं शिक्षण बंद पडू नये, यासाठी शासनाने हंगामी वसतिगृहाची सोय केलेली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील येल्डा गावातही जिल्हा परिषदेच्या शाळेत हंगामी वसतिगृह सुरु करण्यात आले आहे. या वसतिगृहात काल दिनांक ८ डिसेंबर रोजी विद्यार्थ्यांना नेहमी प्रमाणे जेवण देण्यात आले. यात वांग्याची भाजी, भात आणि भाकरी जेवण्यासाठी बनवण्यात आली होती. रात्री विद्यार्थ्यांनी जेवण केल्यानंतर काही विद्यार्थ्यांना रात्री १२ च्या सुमारास मळमळ सुरु झाली. त्यातील ६ विद्यार्थ्यांना ‘स्वाराती’ रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यानंतर हळूहळू आणखी विद्यार्थ्यांना मळमळ सुरु झाल्याने त्यांनाही ‘स्वाराती’ रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

वसतिगृहातील १५ विद्यार्थ्यांवर ‘स्वाराती’ रुग्णालयात उपचार सुरू आहेत, अशी माहिती प्राप्त झाली आहे. दरम्यान, वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाच्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रशासनाने पावले उचलावीत, अशी मागणी पालकांकडून करण्यात येत आहे.

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात, क्युप्रेशर नॅचरोपॅथी आणि सुजोक फियोथेरेपी या सात दिवसीय आरोग्य शिबिराचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.९ डिसेंबर**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव येथे फिजिओथेरपिस्ट नॅचरोपॅथी रिसर्च ट्रीटमेंट पंजिकृत संस्था जोधपुर आणि क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सात दिवसाच्या शिबिरचे आज उद्घाटन पार पडले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष एडवोकेट विश्वास जोशी, उद्घाटक श्री प्रकाश दुगड, श्री अमरनाथ खुर्पे,तज्ञ डॉक्टर रुपेश पवार, (राजस्थान), श्री सुरेंद्र रेदासनी, अभय कोकड, भानप, पवन मानधने व प्राचार्य प्रोफेसर सुहास मोराळे हे व्यासपीठावर उपस्थित होते.

या शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. हे शिबिर दिनांक ०९ डिसेंबर ते १५ डिसेंबर पर्यंत चालणार आहे. या शिबिरामध्ये फिजिओथेरपी नॅचरोपॅथी सुजोकथेरेपी इत्यादी भारतीय पारंपरिक जुन्या पद्धतीने विना गोळ्यांचा इलाज करण्यात येणार असून या शिबिराचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन उद्घाटक प्रकाश दुगड यांनी केले.

श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाच्या सर्व शिक्षक सहकारी बंधू भगिनींच्या तसेच समाजातील नागरिकांच्या आरोग्याची योग्य तऱ्हेने काळजी घेण्यात यावी,यासाठी या शिबिरामध्ये सात दिवस दररोज तपासणी होणार आहे. सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व कर्मचारी बंधू भगिनीं शहरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आव्हान केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खूर्पे यांनी केले. अध्यक्षीय समारोपात एडवोकेट विश्वास जोशी यांनी या शिबिरात सात दिवसात जे मिळणार असून ते आपण जीवनभर अंगीकारावे जेणेकरून आपण सर्वांचे आरोग्य चांगले राहील अशी अपेक्षा व्यक्त केली.शिबिरामध्ये जोधपुर (राजस्थान) येथील तज्ञ डॉक्टर हे सकाळी ०९ ते १२ आणि दुपारी ०३ ते ०६ या कालावधीत आरोग्य तपासणी करणार आहेत. याप्रसंगी सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक म्हणून श्री प्रकाश दुगड यांची नियुक्ती झाल्याच्या निमित्ताने सर्व मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला, तर राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी दीपक घाडगे याने विद्यापीठामार्फत कुलू मनाली येथे आयोजित राष्ट्रीय साहसी शिबिर यशस्वीरित्या पूर्ण केल्याच्या निमित्ताने त्याचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

प्राचार्य प्रोफेसर सुहास मोराळे डॉ रुपेश पवार यांनी यावेळी समयोचित मनोगत व्यक्त केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जिजाराम बागल यांनी तर आभार क्रीडा संचालक प्रा.डॉ उमेश साडेगावकर यांनी मानले.या कार्यक्रमासाठी शैक्षणिक संकुलातील तिन्ही विभागातील मुख्याध्यापक, शिक्षक बंधू भगिनी,विद्यार्थी,गावातील आरोग्य शिबिराचा लाभ घेणारे नागरिक उपस्थित होते.

## बीड ते शिर्डी पायी पालखी सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ डिसेंबर**

श्री साई सेवा परिवार बीड यांच्या वतीने श्री दत्तजयंती निम्मित बीड ते शिर्डी पायी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा पालखी सोहळा दि.१४ डिसेंबर २०२४ रोजी शिर्डीकडे प्रस्थान करणार असून यामध्ये सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

बीड येथील साईभक्त गत १७ वर्षांपासून बीड ते शिर्डी पायी पालखी सोहळा काढतात. यंदाचे पायी पालखीचे १८ वे वर्ष आहे यामध्ये नऊ मुक्काम असतात. सुरुवातीच्या काळात केवळ तिघांनी हा पालखी सोहळा सुरु केला होता. आता दिवसेंदिवस पायी पालखी सोहळ्यात सहभागी होणार्या भाविकांची संख्या वाढत आहे. यावर्षी हा पालखी सोहळा दि.१४ डिसेंबर २०२४ रोजी प्रस्थान करणार असून दि.२३ डिसेंबर २०२४ रोजी शिर्डी येथे पोहचणार आहे. या सोहळ्यात सहभागी होण्याकरिता साईभक्तांनी ९४०५०७६५९४ व ९८५००८८६४४ या क्रमांकावर नोंदणी करावी असे आवाहन श्री साई सेवा परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीड जिल्ह्यातील खरीप २०२४ चा प्रलंबित पिकविमा तसेच नुकत्याच झालेल्या अवकाळीच्या नुकसानीचे सॅम्पल सर्व्हे करून शेतकऱ्यांना मदत करा–धनंजय मुंडे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन दिले मागणीचे पत्र
दोन्ही विषयी तातडीने निर्णय घेऊ – मुख्यमंत्री

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ डिसेंबर**

बीड जिल्ह्यातील खरीप हंगामात अतिवृष्टी व अन्य स्थानिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाले त्याबाबत तत्कालीन पालकमंत्री असलेल्या धनंजय मुंडे यांनी भारतीय कृषी विमा कंपनीस जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून दिलेल्या निर्देशानुसार खरीप २०२४ चा पीकविमा अग्रीम २५% प्रमाणे पात्र शेतकऱ्यांना तातडीने वितरित करण्यात यावा त्याचबरोबर ३० नोव्हेंबर रोजी तामिळनाडू राज्यात आलेल्या 'फेंगल' चक्री वादळामुळे बीड जिल्ह्यात डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात झालेलता अवकाळी पावसाने रब्बी पिकांचे व फळांचे जे नुकसान झाले, त्यांचे सॅम्पल सर्व्हेक्षण करून शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करण्याबाबतचे प्रस्ताव प्रशासनाकडून गतीने प्राप्त करून शेतकऱ्यांना मदत दिली जावी, अशी मागणी आज धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कडे पत्राद्वारे केली आहे.

धनंजय मुंडे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार या दोघांची यासंदर्भात भेट घेऊन मागण्यांचे पत्र उभय नेत्यांना दिले देत चर्चा केली.

बीड जिल्ह्यात सप्टेंबर–ऑक्टोबर दरम्यान मोठ्या प्रमाणात सततची अतिवृष्टी झाल्याने खरिपातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून संपूर्ण नुकसानीचा आढावा घेत पीकविमा कंपनी व प्रशासनाची एकत्र बैठक घेऊन विमा कंपनीने प्राप्त तक्रारींच्या आधारे तातडीने सॅम्पल सर्व्हेक्षण करून घ्यावे व २५% अग्रीम विमा मंजूर करून शेतकऱ्यांना वितरित करावा, अशा सूचना केल्या होत्या. मात्र पुढे निवडणुकीची आचारसंहिता लागताच या प्रक्रियेची गती संथ झाली. त्यामुळे आता पीकविमा कंपनीने तातडीने सदर २५% अग्रीम विमा वितरित करावा याबाबत भारतीय कृषी विमा कंपनीस राज्य शासन स्तरावरून आदेश व्हावेत, अशी मागणी धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली असून याबाबत तातडीने निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.



तामिळनाडू मध्ये ३० नोव्हेंबर दरम्यान आलेल्या फेंगल चक्री वादळाच्या परिणाम स्वरूप बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी डिसेंम्बर च्या पहिल्या आठवड्यात हलका व मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. बीड जिल्ह्यात सतत दोन ते तीन दिवस अचानक हवामान बदलून हलका व मध्यम स्वरूपाचा अवकाळी पाऊस झाला; यामुळे रब्बीतील तुरीसह खरिपातील गहु, ज्वारी, हरभरा, भाजीपाला व फळपिके आदींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या नुकसानीचे देखील सॅम्पल सर्व्हेक्षण करून जिल्हा प्रशासनाकडून मदतीचे अहवाल प्राप्त केले जावेत व जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली जावी, असेही धनंजय मुंडे यांनी आपल्या मागणी पत्रात नमूद केले असून याबाबतही तातडीने निर्णय घेण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी म्हटले आहे.

# यश प्राप्तीसाठी जिद्द आणि सातत्याची गरज–पो.नि. राहुल सुर्यतळ

## सुंदराराव सोळंके महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.९ डिसेंबर**

संविधानाने सर्वांना समान अधिकार दिल्याने उच्च पदप्राप्तीसाठी विद्यार्थ्यांना संधी आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा विषयी भीती न बाळगता जिद्दीने व अभ्यासात सातत्य ठेवले तर यश नक्कीच प्राप्त होईल असे प्रतिपादन शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन प्रसंगीमार्गदर्शन करताना व्यक्त केले.



सुंदरराव सोळंके महाविद्यालयात सुंदर रत्न अकॅडमी च्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन केले जाते. यावर्षी घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन पो.नि. राहुल सूर्यतळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.जी.के. सानप होते तर उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, केंद्र संयोजक प्रा. बालाजी बोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना राहुल सूर्यतळ म्हणाले की आई वडीलांच्या कष्टाची जाणीव ठेवावी. शिक्षणाची संधी आहे. त्याचे सोने करा आणि उज्वल भविष्य घडवा. विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर शरीर संपत्ती जपावी.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.जी. के. सानप म्हणाले की, महाविद्यालयातील शैक्षणिक सुविधांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा निश्चित एक ध्येय ठेवून वाटचाल करावी तरच यश प्राप्त होईल

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बालाजी बोडके यांनी केले सूत्रसंचालन कु. दिपाली शेजुळ हिने केले तर कु.गायत्री दाभाडे हिने आभार मानले. कार्यक्रमाला प्रा.सुरेश देशमुख,प्रा ज्ञानेश्वर शिंदे, प्रा.सुदर्शन स्वामी, प्रा.उमेश राठोड, प्रा संजय बागुल,प्रा सिद्धेश्वर कदम, प्रा एकनाथ शेंडगे,प्रा संग्राम सोळंके, प्रा.इम्रान पठाण यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

# मानवी हक्क दिन १० डिसेंबर यानिमित्ताने मानवी हक्काचे संरक्षण करूया

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ डिसेंबर**

मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ च्या कलम २ नुसार , मानवी हक्क म्हणजे व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य , समानता आणि प्रतिष्ठेशी संबंधित अधिकार ज्याची संविधानाने हमी दिलेली आहे किंवा मूर्त स्वरूप दिले आहे .

प्रा.हेराल्ड लास्की यांच्या मते हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय की , ज्याशिवाय व्यक्तीला स्वतःचा सर्वांगीण विकास करून घेणे शक्य होत नाही

प्रमुख मानवी हक्क :

मानवी हक्क किंवा मानवी अधिकार हे मानवाचे मूलभूत हक्क आहेत . मानवी हक्क हे जागतिक असून सर्वांना समान असतात . हे हक्क उपजत असतात किंवा कायदेशीर असू शकतात . खाली दिलेले काही मानवी हक्क प्रमुख हक्क मानले जातात.




जीवनाधिकार , यातनांपासून मुक्तता , गुलामगिरीपासून मुक्तता , कोर्ट सुनावणीचा अधिकार , भाषण स्वातंत्र्य व वैचारिक व धार्मिक स्वातंत्र्य .

मानवी हक्क वैशिष्ट्ये :

मानवी हक्क हे सर्व मानवाच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करतात . मानवाधिकार मानव , समाज आणि त्यांचे राज्याशी असलेले नाते आणि राज्याची कर्तव्ये नियंत्रित करतात . मानवाधिकार कायदा सरकारांना काही गोष्टी करण्यास बाध्य करतो आणि त्यांना मानवाधिकार विरोधात गोष्टी करण्यापासून प्रतिबंधित करतो . यात नागरिकांच्याही जबाबदाऱ्या असतात . प्रत्येकाने मानवी हक्क वापरताना इतरांच्या हक्कांचा आदर केला पाहिजे . कोणत्याही सरकारला , गटाला किंवा व्यक्तीला दुसऱ्याच्या अधिकारांचे उल्लंघन करणारी कोणतीही गोष्ट करण्याचा अधिकार नाही . सार्वत्रिकता आणि अविभाज्यता : मानवी हक्क सार्वत्रिक आणि अविभाज्य आहेत . जगात सर्वत्र सर्व लोकांना त्यांचा हक्क आहे . त्यांना कोणीही स्वेच्छेने सोडू शकत नाही . किंवा इतर कोणी त्यांना त्याच्यापासून किंवा तिच्यापासून दूर करू शकत नाहीत.

अविभाज्यता : मानवी हक्क अविभाज्य आहेत . नागरी , राजकीय , आर्थिक , सामाजिक किंवा सांस्कृतिक स्वरूपाचे असोत , ते सर्व प्रत्येक मानवी व्यक्तीच्या प्रतिष्ठेसाठी अंतर्भूत असतात . परिणामी , त्या सर्वांना अधिकार म्हणून समान दर्जा आहे . 'छोटा' किंवा कमी हक्क असं काही नसत . मानवी हक्कांची कोणतीही श्रेणीबद्धता नाही. परस्परावलंबन आणि परस्परसंबंध : एका हक्काची प्राप्ती बहुतेकदा संपूर्ण किंवा अंशतः इतरांच्या प्राप्तीवर अवलंबून असते. उदाहरणार्थ , आरोग्याच्या अधिकाराची प्राप्ती शिक्षणाच्या किंवा माहितीच्या अधिकाराच्या प्राप्तीवर अवलंबून असू शकते . समानता आणि भेदभावाचा अभाव : सर्व व्यक्ती मानव म्हणून समान आहेत आणि प्रत्येक मानवी व्यक्तीच्या अंगभूत प्रतिष्ठेमुळे वंश , रंग , लिंग , वंश , वय , भाषा , धर्म , राजकीय किंवा इतर मत, राष्ट्रीय किंवा सामाजिक मूळ , अपंगत्व , मालमत्ता , जन्म किंवा इतर स्थिती यासारख्या कोणत्याही प्रकारच्या भेदभावाशिवाय सर्व मानवांना त्यांच्या मानवी हक्कांचा हक्क आहे .

भारत देश आणि मानवी हक्क :

भारतात मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी घटनेतच तरतुदी आहेत .

नागरिकांचे मूलभूत अधिकार : १. समानतेचा अधिकार ( अनुच्छेद १४ ते १८ ) , २. स्वातंत्र्याचा अधिकार (अनुच्छेद १९ ते २२) , ३. शोषणाविरुद्धचा हक्क (कलम २३ ते २४), ४. धर्म स्वातंत्र्याचा अधिकार (अनुच्छेद २५ ते २८), ५. संस्कृती आणि शिक्षणाचा अधिकार (अनुच्छेद २९ ते ३०), ६. घटनात्मक अधिकार मूलभूत कर्तव्ये : १. संविधानाचे पालन करणे आणि त्याच्या आदर्शांचा आणि संस्थांचा आदर करणे हे देशातील प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असेल. २. राष्ट्रीय चळवळीला प्रेरणा देणार्या उदात्त आदर्शांचे पालन करणे आणि त्यांचे पालन करणे. ३. देशाचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता यांचे रक्षण करणे आणि ते अबाधित ठेवणे. ४. आपल्या क्षमतेनुसार देशाचे रक्षण करा. ५. भारतातील सर्व लोकांमध्ये सामंजस्य आणि समान बंधुभावाची भावना निर्माण करणे. ६. आपल्या सामाजिक संस्कृतीच्या वैभवशाली परंपरेचे महत्त्व समजून घेऊन ती घडवा. ७. नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करणे. ८. नागरिकांनी वैज्ञानिक दृष्टीकोन आणि ज्ञानाची भावना स्वतःमध्ये विकसित केली पाहिजे. ९. नागरिकांनी सार्वजनिक मालमत्ता सुरक्षित ठेवावी. १०. सामूहिक आणि वैयक्तिक क्रियाकलापांच्या सर्व क्षेत्रात उत्कृष्टतेकडे जाण्यासाठी सतत प्रयत्न करा. ११. पालक किंवा पालकांकडून ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण देणे (८६ वी दुरुस्ती) इत्यादी तरतुदी आहेत .

सहभाग आणि समावेश : प्रत्येक व्यक्ती आणि सर्व लोकांना नागरी, राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासामध्ये सक्रिय, मुक्त आणि अर्थपूर्ण सहभाग, योगदान आणि आनंद घेण्याचा अधिकार आहे, ज्याद्वारे मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्य प्राप्त केले जाऊ शकतात . याशिवाय जबाबदारी आणि कायद्याचे राज्य : राज्ये आणि इतर कर्तव्य धारकांनी मानवी हक्क साधनांमध्ये समाविष्ट केलेल्या कायदेशीर नियमांचे आणि मानकांचे पालन करणे आवश्यक आहे . ते असे करण्यात अयशस्वी झाल्यास , पीडित हक्कधारकांना कायद्याने प्रदान केलेल्या नियम आणि प्रक्रियांनुसार , सक्षम न्यायालय किंवा अन्य न्यायनिर्णयकासमोर योग्य निवारणासाठी संस्थात्मक कार्यवाही करण्याचा अधिकार आहे.

महाराष्ट्र राज्य आणि मानवाधिकार :

मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ च्या कलम २१ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्यात राज्य मानवी हक्क आयोगाची दिनांक १५ जानेवारी २००० रोजी स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला असून , दिनांक १३ मार्च २००१ पासून आयोगाचे कामकाज सुरू आहे . आयोगावर एक अध्यक्ष व दोन सदस्य आहेत . आयोगाकडे एक सचिव, एक विशेष पोलीस महानिरीक्षक व एक प्रबंधक आहेत . आयोगाचे पुढीलप्रमाणे तीन विभाग आहेत : (१) विधी विभाग, (२ ) प्रशासन विभाग, (३ ) अन्वेषण विभाग. आयोगाचे कार्यालय प्रशासकीय अधिकारी महाविद्यालय आवार , हजारीमल सोमाणी मार्ग , सी. एस. टी. समोर, मुंबई येथे शासनाच्या गृह विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत असून , आयोगाची कार्ये खालीलप्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहेत :

लोकसेवकाकडून मानवी हक्क भंग झाला आहे वा त्या बाबतीत त्यांनी अपप्रेरणा दिली आहे वा मानवी हक्क भंगाचा प्रतिबंध करण्यात दुर्लक्ष केले आहे , अशा प्रकरणी स्वप्रेरणेने वा ग्रस्त व्यक्तीकडून तक्रार आल्यावर चौकशी करणे . न्यायालयाकडे प्रलंबित असलेल्या कार्यवाहीबाबत मानवी हक्क भंग झाल्याची तक्रार असेल , तर अशा बाबतीत संबंधित न्यायालयाच्या मान्यतेने हस्तक्षेप करणे. कैद्यांच्या राहणीमानाची पाहणी व अभ्यास करण्यासाठी राज्य शासनाला सूचना देऊन , तुरुंगांना वा ज्या संस्थेत कैद्यांना उपचारार्थ वा सुधारण्यासाठी वा संरक्षणाखाली ठेवले असेल, अशा ठिकाणांना भेटी देणे . मानवी हक्क संरक्षणार्थ राज्यघटना वा कोणत्याही विद्यमान कायद्याखाली पुरविण्यात आलेल्या सुरक्षिततेसंबंधीच्या तरतुदींचा आढावा घेणे व अशा तरतुदींच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शिफारशी करणे .

मानवी हक्कांचा संकोच करणाऱ्या अतिरेकी व इतर घटकांचा आढावा घेणे व योग्य ती उपाययोजना सुचविणे . मानवी हक्कांवरील प्रबंध व आंतरराष्ट्रीय कायदेशीर शोधग्रंथांचा अभ्यास करणे व त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारशी करणे .



मानवी हक्कांसंबंधी संशोधनाचे काम हाती घेणे व प्रोत्साहन देणे .

समाजातील विविध प्रवर्गात मानवीहक्कांविषयी जाणीव निर्माण करणे आणि प्रसिद्धी व प्रसार माध्यमे, संमेलने व अन्य उपलब्ध साधनांद्वारे मानवीहक्क संरक्षणाच्या उपलब्ध तरतुदींविषयी जागृती वाढावी म्हणून प्रयत्न करणे . मानवी हक्क क्षेत्रात कार्य करणाऱ्या अशासकीय संघटना व संस्थांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे .

मानवी हक्क हा विषय वैविध्यपूर्ण आहे आणि यासाठी विविध विद्यापीठात विविध अभ्यासक्रम राबविले जातात :

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ ह्युमन राइट्स : या संस्थेने पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्राम इन ह्युमन राइट्स हा अभ्यासक्रम सुरू केला आहे.

शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई : शासकीय विधी महाविद्यालय आणि हर्ट फाऊंडेशन यांनी संयुक्तपणे ‘सर्टिफिकेट कोर्स इन ह्युमन राइट्स’ हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. अण्णामलाई युनिव्हर्सिटी : बॅचलर ऑफ आर्टस् इन ह्युमन राइट्स हा अभ्यासक्रम सुरू केला आहे . मुंबई विद्यापीठ : पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ह्युमन राइट्स हा अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठाने सुरू केला आहे. युनिव्हर्सिटी ऑफ हैद्राबाद : युनिव्हर्सिटी ऑफ हैद्राबाद अंतर्गत येणाऱ्या सेंटर फॉर डिस्टन्स एज्युकेशन या संस्थेने डिप्लोमा इन ह्युमन राइट्स हा अभ्यासक्रम सुरू केला आहे . याशिवाय बरकतउल्लाह युनिव्हर्सिटी , डॉ. बाबासाहेब आंबेडकर युनिव्हर्सिटी , द इंडियन लॉ इन्स्टिटयूट , मोदी इन्स्टिटयूट ऑफ टेक्नालॉजी अँड सायन्स येथेही हा अभ्यासक्रम चालवला जातो .

मानवी जीवनाचा सातत्याने विकास होत आलेला आहे. अनादी कालापासून मानवाने आपले स्वातंत्र्य अबाधित राखण्याचा प्रयत्न केला आहे . आजच्या मानवी हक्क दिवसानिमित्त प्रत्येकाने मनाशी खुणगाठ बांधली पाहिजे की माझ्या व्यक्तिगत स्वातंत्र्याचा मला जसा अभिमान आहे तसा मी इतरांच्याही स्वातंत्र्याचा मान ठेवीन , यातच या दिवसाचे फलित आहे .

**संकलन :**
**चंद्रकांत शेळके ,**
**तहसीलदार , बीड**

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## बांगलादेश हिंदू अत्याचार प्रकरणी आज निलंगा बंद

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.९ डिसेंबर -**

बांग्लादेशातील हिंदू समाजावर सातत्याने होणारे अन्याय अत्याचार, महिलावर बलात्कार, साधु संतांचा अमानुष छळ या सारखा घटनांच्या निषेधार्थ निलंगा येथील सकल हिंदूसमाजाच्या वतीने मंगळवार दि.१० डिसेंबर रोजी निलंगा बंद व धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

बांगलादेशातील हिंदू समाजावर सातत्याने होणारे अन्याय अत्याचार, महिलावर बलात्कार साधु संतांचा अमानुष छळ या सारखा घटना त्वरीत थांबाव्यात यासाठी सदरील घटनांच्या निषेधार्थ संपुर्ण देशभरात अतिशय तीव्र संताप व्यक्त केला जात असुन, त्याचे पडसाद महागाष्ट्रातील गाव खेडयातील हिंदु समाजात उमटत आहेत. या




सर्व बाबींची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली जावी म्हणुन मिलंगा येथे सकल हिंदू समाजाच्याः वतीने दि.१० डिसेंबर मंगळवार रोजी निलंगा बंद व धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

याबाबत येथील तहसिलदार यांना दिलेल्या निवेदनावर सकल हिंदू सम ाजाच्या शेकडो जनतेच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### शिवाजी महाविद्यालयाची पल्लवी तेलंगे हिची विद्यापीठ योगा संघात निवड

**लातूर, दि.९ डिसेंबर -**

कलिंगा इन्स्टिट्युट ऑफ इंडस्ट्रीयल टेकनॉलॉजी (किट) भुवनेश्वर (ओडिशा) येथे आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन (महिला) स्पर्धेसाठी येथील शिवाजी महाविद्यालय उदगीरच्या तेलंगे पल्लवी राजकुमार (एम.कॉम. व्दितीय वर्ष) हिची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या योगासन संघात उत्कृष्ट कौशल्याच्या आधारावर संघात निवड झाली आहे. खेळाडूच्या या यशाबद्दल खेळाडूंना सातत्याने प्रोत्साहित करणारे किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील, उपाध्यक्ष माधवराव पाटील, सचिव पांडुरंग शिंदे, कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, व इतर कार्यकारिणी सदस्य, म हाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.आर.एम. मांजरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.जी.जी. सूर्यवंशी, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले. खेळाडूला कीडा विभाग प्रमुख प्रा. नेहाल अहेमद, प्रा. गजानन माने यांनी तंत्रशुध्द पद्धतीचे मार्गदर्शन केले.

### दत्त जयंतीनिमित्ताने दत्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**लातूर, दि.९ डिसेंबर -**

लातूर येथील भक्तांचे जागृत देवस्थान असलेले सदानंद दत्त मठ औसा रोड येथील मंदिर समितीच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वेळी दत्त जयंती निमित्ताने भव्य दिव्य



अखंड हरिनाम सप्ताह, गुरुचरित्र, ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात राज्यातील मान्यवर किर्तनकरांची मेजवानी तसेच लातूरकरांना मिळणार आहे. तसेच संगीत दरबाराचे आयोजन करण्यात आले असून दत्त जयंती निमित्ताने दत्त जयंती महोत्सव दि.१ ते १७ डिसेंबरपर्यंत दत्त मंदिर येथे आयोजीत करण्यात आला आहे. या सोहळ्याचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन सदानंद दत्त मठ विश्वस्त मंडळ लातूर यांच्या वतीने करण्यात आले आहे. १० डिसेंबर पासून दत्त जयंती महोत्सवाला प्रारंभ भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दत्त मंदिरात दत्त जयंती निमित्ताने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले असून महाप्रसाद होईल रात्री ८.३० ते १०.३० पर्यन्त भजन किर्तन प्रवचन होईल.

# भाजपा औसेकरांचा लाल दिव्याचा दुष्काळ संपविणार ?

## ६२ वर्षापासून प्रतिक्षा; आश्वासन पुर्ण करण्याची नेतेमंडळींना संधी...

**तभा वृत्तसेवा / सुधीर गंगणे**
**लातूर, दि.९ डिसेंबर -**

सलग दोन विधानसभेच्या निवडणुकीत प्रचारासाठी आलेल्या भाजपाच्या नेतेमंडळींनी तुम्ही विजयी करा. आम्ही तुमची लाल दिव्याची अपेक्षा पुर्ण करु असे आश्वासन दिले होते. भाजपाच्या नेतेमंडळीवर विश्वास ठेवून सलग ६२ वर्षाची प्रतिक्षा तरी संपेल अशा अपेक्षेने मतदारांनी एकापेक्षा एक अशा सरस



विक्रमी मतांनी निवडून दिले.यावेळी राज्यात महायुतीचे निर्विवाद बहुमत आल्याने दिलेल्या आश्वासनाची पुर्तता करण्याची संधी चालून आली असून कोणते खाते मिळणार याकडे औसेकरांचे लक्ष लागले आहे.

माजी मंत्री बसवराज पाटील मुरुमकर यांच्या माध्यमातून औशाला मंत्रीपदाची संधी मिळेल आणि विकासकामांना अधिकाधिक गती मिळून मतदारसंघाची वेगळी ओळख निर्माण होईल. अशा अपेक्षेने सलग दोन वेळा संधी दिली.

या काळात त्यांनी तालुक्याची जुनी ओळख पुसून विकासाच्या नव्या उंचीवर नेवून ठेवले. परंतू मतदारसंघाला जे हवे होते तेच पक्षातील नेतेमंडळीनी औसेकरांना दिले नाही.



यामुळे विकासरुपी ओळख असूनही २०१९ च्या निवडणुकीत मतदारांनी डावलून आ. अभिमन्यू पवार यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालिन केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंग यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवून २७ हजार मतांनी विजयी केले. मात्र भाजपा व शिवसेनेच्या युतीमध्ये दरार आल्याने राज्यातील सत्तेची सुत्रे आघाडीकडे गेली. आणि अडीच वर्षानी पुन्हा आघाडीत बिघाडी होवून महायुतीकडे अडीच वर्षासाठी राज्याची सत्ता आली. या पाच वर्षात झालेल्या राजकीय घडामोडीमुळे औशाला मिळणारी संधी गेली.तर या निवडणुकीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची एकमेव प्रचारसभा झाली. या सभेस मतदारांनी भरभरुन प्रतिसाद दिला. मतदारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद पाहून औसेकर जे कांही मागतील ते देणारच.

त्यापेक्षा अधिक देणार असा शब्द उपस्थितांना दिला होता. केंद्रीयमंत्री गडकरी जे बोलतात ते करतात.

अशी त्यांची ओळख औसेकरांना आहे. आता महायुतीचे सरकारही राज्यात आले आणि आ. अभिमन्यू पवार दुसऱ्यांदा विजयी झाल्यामुळे मतदारसंघाचे स्वप्न साकार होणार असल्याचा विश्वास मतदारसंघात दिसून येत आहे. या पाच वर्षाच्या काळात जिल्हाअंतर्गत वादळी झालेले पक्षीय राजकारण जसे मतदारापर्यंत पोहंचले आहे. तेवढेच भाजपाच्या नेतेमंडळीपर्यंत पोहंचले आहे.

याचप्रमाणे यापुर्वीच्या व नुकत्याच पार पडलेल्या विधानसभेच्या निवडणुकीतील पक्षाअंतर्गत झालेल्या कुरघोड्यानंतरही औसा मतदारसंघातील मतदारांनी उघड्या डोळ्यांनी पाहून मुंबई, दिल्लीकडे पाठवित भाजपाच्या नेतेमंडळीवर विश्वास ठेवून सलग दुसऱ्यांदा आणि पहिल्या निवडणुकीतील मतापेक्षा अधिक मतांची आघाडी देऊन विजयी केले. याचा नेतेमंडळी पुर्णपणे विचार करतील. असा लातूर जिल्ह्यातील राजकीय जाणकारांचा अंदाज आहे.

भाजपातील नेतेमंडळीच्या आश्वासनावर विश्वास ठेवून औसेकरांनी उत्स्फुर्तपणाने यावेळीही दाद दिली आहे. यामुळे औसा मतदारसंघातील मतदारांमध्ये लाल दिव्याचा दुष्काळ संपणार असल्याचा विश्वास दिसून येत आहे.

### ६२ वर्षानंतर औसेकरांना संधी...



राज्याच्या पहिल्या मंत्रीमंडळात आशिव येथील डॉ. देविसिंग चौहान यांना संधी मिळाली होती. यानंतर झालेल्या निवडणुकीत मतदारांनी सत्तेच्या विरोधात कौल देत संधी घालवली खरी मात्र यामागे जिल्ह्यातून औशात होणारे राजकारण कारणीभुत ठरले. उर्वरीत काळात सत्ता आली पण मित्रपक्षाचे सरकार आल्याने जागावाटपात कमी जागा आल्याने संधी गेली. या निवडणुकीत भाजपाने सर्वाधिक जागा जिंकुन वर्चस्व मिळवले आहे. यामुळे ६२ वर्षानंतर आ. अभिमन्यू पवार यांच्या माध्यमातून पहिली संधी मिळली आहे. नेतेमंडळीनी या मिळालेल्या संधीचे मंत्रीपद देऊन सोने केले तरच औसेकरांचा आश्वासनासनावरील विश्वास कायम टिकणार आहे.

## अवैध धंद्यावर पोलीसांची कारवाई; ५० लाखांचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.९ डिसेंबर -**

लातूर स्थानिक गुन्हे शाखेने अवैध धंद्यावर कारवाई केली असून जवळपास ५० लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकरणी ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी अवैध धंद्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदारांचे पथके तयार करून लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्याची माहिती काढून त्यावर कारवाई करण्याची मोहीम राबवित आहेत.

दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मटका, देशी-विदेशी दारू, हातभट्टी व वाळू यांची अवैध विक्री व्यवसाय करणाऱ्यावर कारवाई करत एकूण ११ गुन्हे दाखल केले असून मटका, दारू, हातभट्टी व वाळू तसेच गुन्ह्यात वापरलेल्या वाहनासह ५० लाख ६८ हजार ३२० रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. अवैध धंदे करणाऱ्या एकूण १२ लोकाविरुद्ध कार्यवाही करण्यात आली असून वेगवेगळ्या पोलीस स्टेशनला ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या वेगवेगळ्या पोलीस पथकांनी केली आहे.

## लातूर जिल्ह्यातील खंडोबा यात्रेत बारा बैल गाड्या एकहाती ओढण्याचा थरार

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.९ डिसेंबर -**

लातूर जिल्ह्यातील सेलू जवळील जवळगा गावात भरत असलेल्या खंडोबा यात्रेला राज्यभरातून भाविक मोठ्या संख्येने हजेरी लावतात. या यात्रेची वैशिष्ट्य म्हणजे एका व्यक्तीकडून बारा बैल गाड्या एकत्र ओढल्या जाण्याचा अनोखा आणि थरारक प्रकार. या आगळ्या-वेगळ्या परंपरेमुळे ही यात्रा चर्चेचा विषय ठरते.

यात्रेत एका मानाच्या व्यक्तीकडून बारा बैल गाड्या ओढल्या जातात. गाड्यांवर लहान मुले, तरुण मंडळी आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या उत्साहाने बसतात. हा थरारक प्रकार ५०० मीटर अंतरासाठी केला जातो. विशेष म्हणजे, या यात्रेच्या निमित्ताने जवळपासच्या १० ते १५ गावांतील वारूही शोभायात्रेत सहभागी होत असल्याने वातावरणात उत्साह आणतात. तसे पाहता खंडोबा यात्रेचा इतिहास सुमारे १०० वर्षे जुना आहे.

हा सांस्कृतिक सोहळा भाविकांना केवळ धार्मिक अनुभव देत नाही तर परंपरेचा वारसा जपण्याचा संदेशही देतो. गाड्या ओढणाऱ्या व्यक्तीला यात्रा सुरू होण्याआधी खंडोबाच्या देवळात आंघोळ घालून तयार केले जाते. त्यानंतर, मारुती मंदिराभोवती पाच प्रदक्षिणा घालून हा थरारक सोहळा सुरू होतो. याच बोरोबर यात्रेच्या ठिकाणी लहान मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी उपलब्ध असतात. लाकडी घोडे, फुगे, गाड्या यांसारख्या खेळण्यांचे स्टॉल्स मुलांच्या आनंदात भर घालतात. तसेच खंडोबा यात्रेतील बारा बैल गाड्यांचा प्रकार हा या उत्सवाचा प्रमुख आकर्षण आहे. हा सोहळा पाहण्यासाठी भाविक लांबून लांबून येतात, ज्यामुळे यात्रेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

यात्रेच्या दरम्यान गावात मेळावा भरतो, ज्यामध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम होतात. आजूबाजूच्या गावांतील लोक यात्रेला येऊन आपले योगदान देतात. आणि तीर्थ व प्रसादाचा लाभ घेतात.

## जखमी मुलीवरील उपचाराचा खर्च नगरपालिकेने करावा

### एमआयएमची मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.९ डिसेंबर -**

गेल्या चार वर्षापासून अनेकवेळा मोकाट कुत्र्यांचा बदोबस्त करण्याची मागणी करुनही नगरपालिका प्रशासनाने शहरवासियांच्या या मागणीकडे जाणीवपुर्व डोळेझाक केली आहे. या काळात कुत्र्यांच्या संख्येत झपाट्याने वाढ झाल्यामुळे दररोज दोन तीन चावा घेण्याच्या घटना घडत आहेत.तर दोन दिवसापुर्वी मोकाट कत्र्याने कहर करीत तीन वर्षाच्या चिमुकल्या मुलीवर हल्ला करुन गंभीर जखमी केले. या जखमी मुलींचे आई वडील गरीब असुन उपचाराचा खर्च नगरपालिकेने करावा, अशी मागणी एमआयएमचे जेष्ठ नेते मुझ्झफरअली इनाम दार यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

औसा शहरातील शहरवासियांना गेल्या तीन वर्षापासून मोकाट कुत्र्यांनी चावा घेण्यास सुरुवात केली. या मोकाट कुत्र्यांचा बदोबस्त करावा, अशी मागणी २०२१ मध्ये एमआयएमच्या वतीने निवेदनाद्वारे पालिकेकडे करण्यात आली होती. याचबरोबर अनेक नागरिकांनी अनेकवेळा मागणी केली. मात्र संबंधित पालिका प्रशासनाने आजपर्यंत टोलवाटोलवी करीत तीन वर्ष घालवले आहेत.



आज या मोकाट कुत्र्यांची संख्या एवढी प्रचंड वाढली आहे. शहरात जिथे मोकाट झुंड फिरत नाही असा असा शहरातील एक प्रभाग दाखवा आणि योग्य बक्षीस मिळवा, असे आवाहन केले तरी एक रुपयांचे बक्षीस देण्याची वेळ येणार नाही. एवढी मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली आहे.य ामुळे महिला, वृध्द व लहान मुलांना याचा फटका बसत आहे. गेल्या तीन वर्षापासून कुत्रे चावल्याच्या घटना सर्वाधिक औसा शहरात घडत असतानाही पालिका प्रशासन गप्प का आहे. शहरात घडत असलेल्या या सर्व घटनांना नगरपालिका प्रशासन जबाबदार आहे. लहान मुलीच्या घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे. कुटुंबियाना उपचाराचा खर्च करणे अशक्य आहे.

यापुढे होणाऱ्या अनपेक्षित घटना टाळण्यासाठी मोकाट कुत्र्यांचा नगरपालिकेने तात्काळ बंदोबस्त करावा व लहान मुलीवर होणाऱ्या उपचाराचा खर्च पालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात यावा, अशी मागणी इनामदार यांनी मुख्यमंत्री व नगरपालिकेकडे निवेदनाद्वारे केली आहे. अन्यथा टाळे ठोको आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनात दिला आहे.

## उदगीरात आज 'मानवी साखळी' आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.९ डिसेंबर -**

बांगला देशातील हिंदूवरील अन्याय व इस्कॉन मंदिराचे चिन्मय कृष्णदास यांच्या सुटकेसाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने जागतिक मानवाधिकार दिनाचे औचित्य साधून १० डिसेंबर रोजी सकाळी उदगीर शहरातील छत्रपती शाहू महाराज चौक ते उपजिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हातामध्ये फलके घेऊन मानवी साखळीद्वारे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. अशा आशयाचे निवेदन सकल हिंदू समाजाच्या वतीने उदगीर उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे यांना देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बांगला देशातील हिंदू समाजावर होत असलेले हल्ले व इस्कॉनचे धार्मिक नेते चिन्मय कृष्णदास यांनी बांगला देशातील हिंदू समाजाला जागृत करण्यासाठी केलेल्या आव्हानामुळे बांगलादेशाने त्यांना देशद्रोहाच्या गुन्ह्यात अटक केली. न्यायालयातून सुध्दा त्यांना जामीन मिळला नसून




त्यांच्यासाठी केस लढणाऱ्या वकिलावरही जीव घेणे हल्ला करण्यात आला.

यामुळे तेथील परिस्थिती खूप बिकट असून बांगलादेशाच्या सरकारने चिन्मय कृष्णदास यांना सध्या कोठे ठेवले आहे. ते कोणत्या परिस्थितीत आहेत, याचीही माहिती सरकार देत नाही.

आरक्षणाच्या नावाखाली बांगला देशात सुरु झालेल्या हिंसाचारामागे थेट हिंदूवर हल्ले होत असून महिलांचे अपरहरण, बलात्कार, कतली केल्या जात आहेत.

मंदिरे उद्वस्त होत आहेत. पूर्णपणे षड्यंत्र करून इस्लामिक राष्ट्र बनवण्याची तयारी आहे. तेथील हिंदू समाज भयभीत झाला असून त्यांना वाचवण्यासाठी व बांगलादेशाच्या सरकारवर दबाव आणण्यासाठी भारत सरकारने लवकरात लवकर ठोस पाऊल उचलावी व युनोमध्ये आवाज उठवावा. यासाठी १० डिसेंबर रोजी मानवी साखळीद्वारे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

## उदगीरच्या दत्त मंदिरात श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.९ डिसेंबर -**

सेवा येथील सर्वोदय सोसायटीमधील श्री दत्त मंदिर संस्थान, श्री सिध्दसिंहासन पीठ, श्रीमद सदगुरू गुंडा महाराज सिध्दरस उदगीरकर भक्त मंडळ उदगीर यांच्या संयुक्त विद्यमानाने रविवार दि.८ ते १४ डिसेंबर दरम्यान श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, रविवारपासून या सोहळ्यास प्रारंभ झाला आहे.



या भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात श्री. सदगुरू गुंडा महाराजांचे ७ वे वंशज भागवताचार्य प.पू. चक्रीनाथ महाराज सिध्दरस पंढरपूर यांच्या रसाळ वाणीतून भागवताकथा भक्तांना श्रवण करण्यास मिळत आहे. रविवारी दुपारी २ वाजता गोकर्ण महात्म्य व कथेला प्रारंभ झाला. दि.९ डिसेंबर रोजी शुक उपदेश श्री वराह अवतार व कपील चरित्रावर वाचन, दि. ९ रोजी जडभरत आख्यान व श्री. नृसिंह अवताराचे वाचन, दि.११ रोजी श्री. वामन अवतार, श्रीराम कथा व श्रीकृष्ण जन्मोत्सवाचे वाचन, दि.१२ रोजी गोपाळ काला व श्रीगोवर्धन पुजन याचे वाचन, दि.१३ रोजी रुक्मिणी स्वयंवर व सुदामा चरित्राचे वाचन करण्यात येणार आहे. दि. १४ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता या कथेची समाप्ती होणार असून श्री. दत्त जयंतीचा महोत्सव उत्साहात साजरा होणार आहे.

या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सर्वोदय हाउसिंग सोसायटीचे अध्यक्ष विजयकुमार पारसेवार, सचिव श्रीनिवास मालशेटवार यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले आहे

## उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.९ डिसेंबर -**

महाराष्ट्र शासन, उद्योग संचालनालय, मुंबई पुरस्कृत व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, लातूर आयोजित विशेष सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी संभाजीनगर येथे १८ दिवसीय निशुल्क निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याकरिता अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातील युवक, युवती व महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. वरील प्रशिक्षण कार्यक्रम निशुल्क असून सोबत प्रशिक्षण सर्टिफिकेट मिळणार आहे.

## आ. संभाजीराव निलंगेकर यांच्या मंत्रीपदासाठी ग्रामदैवत निळकंठेश्वरास साकडे

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.९ डिसेंबर -**

आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांची मंत्री मंडळात वर्णी लागण्यासाठी भाजपा कार्यकर्त्यांनी सोमवार दि.९ डिसेंबर रोजी निळकंठेश्वरास साकडे घालण्यात आले.



लातूर जिल्ह्यात भाजपाला झिरो ते हिरो करणारे, संपूर्ण जिल्हा भाजपमय करत भाजपची एकहाती सत्ता आणणारे नेतृत्व लोकनेते आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांची मंत्रिमंडळात मंत्रीपदी वर्णी लागावी यासाठी निलंगा नगरीचे ग्रामदैवत श्री निळकंठेश्वर महादेव मंदिर येथे भाजप परिवार निलंगा शहरच्या वतीने अभिषेक करून साकडं घालण्यात आले.

यावेळी उपस्थित दगडू सोळुंके, बाळासाहेब शिंगाडे, वीरभद्र स्वामी, संजय हलगरकर, गोविंद शिंगाडे, किशोर जाधव, वैभव पाटील, मनोज कोळे, जयंत देशपांडे, सुमित ईनानी, अविराज पाटील, पिंटू पाटील, रवी फुलारी, आकाश गाडीवान, प्रकाश पटणे, पप्पू तेलंग, भाऊसाहेब जाधव, रमेश कांबळे, प्रकाश नाटकर, पिंटू पांचाळ, भगवान वरवटे, धम्मानंद निंबाळकर, कशीनाथ जाधव, मंचक पांचाळ, नाना आकडे, शरद पेटकर, बालाजी दंडगुले, आशिष अट्टल, सौरभ नाईक, पांडुरंग तोष्णीवाल, गणेश ममाळे, आकाश पेटकर सचिन गायकवाड. निळकंठ पेटकर, संजय पेटकर, परीक्षेत राजमल्ले दत्ता जाधव, कविता तोष्णीवाल, संध्या पाटील, जाधव, मोरे इत्यादी निलंगा शहरातील माजी लोकप्रतिनिधी भाजप पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एसजीजीएस अभियांत्रिकी संस्थेच्या वसतिगृहात विद्यार्थिनीची आत्महत्या


**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०९ डिसेंबर**

श्री गुरू गोविंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालय येथील मुलींच्या वसतिगृहातील राहत्या खोलीतील छताच्या पंख्याला दोरीने गळफास घेवून एका २१ वर्षीय विद्यार्थिनीने आत्महत्या केली. ही घटना दिनांक ८ डिसेंबर रोजी सकाळी उघडकीस आली.

वाशिम जिल्ह्यातील कारंजा लाड येथील मूळरहिवासी भक्ती शरदआप्पा पिंपळे ही विष्णूपुरी, नांदेड येथील श्री गुरू गोविंदसिंघजी अभियांत्रिकी आणि तंत्रशास्त्र संस्थेत (सिव्हिल) स्थापत्य अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षात शिकत होती. भक्ती पिंपळे ही 'एसजीजीएस' अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेतील 'कृष्णा' मुलींचे वसतिगृहातील ३०७ क्रमांकाच्या खोलीत वास्तव्यास होती. भक्ती पिंपळे ही ८ डिसेंबर रोजी सकाळी तिच्या खोलीतील अन्य साथीदार विद्यार्थिनी नसल्याची संधी साधून खोलीतील छताच्या पंख्याला नायलॉनचे दोरीने गळफास घेवून आपली जीवनयात्रा संपविल्याचे वृत्त आहे.याकालवधीत नातेवाईकानी फोन केले पण फोन उचलत नसल्याने त्यांनी खोलीत राहणाऱ्या दुसऱ्या मुलीना फोन लाउन विचारपुस केली. तसेच वस्तीगृहाच्या संबंधित अधिकारी यांनी सदरील घटना लक्षात येताच फोनवरून सदरील घटनेची माहिती नांदेड ग्रामीण पोलिसांना दिली. प्रस्तुत माहिती समजताच पो. नि. ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सचिन गढवे, बीट पोलीस अंमलदार माधव गवळी व पो.कॉ. किशोर इंगळे घटनास्थळी पोहोचले. त्याचवेळी, सहायक पोलीस निरीक्षक सचिन गढवे व त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांना खोलीचे दार आतून बंद असल्याची बाब निदर्शनास आली. त्याचक्षणी, पोलिसांनी खोलीचे दार तोडून आत पाहिले असता, भक्ती पिंपळे ही पंख्यास दोरीने गळफास घेवून लोंबकळत असल्याचे चित्र पोलिसांना आढळून आले. दरम्यान, सहायक पो. नि. सचिन गढवे तसेच बीट पोलीस अंमलदार माधवराव गवळी यांनी पंख्याला लोंबकळत असलेल्या कु. भक्ती पिंपळे हिस अधिक उपचारासाठी विष्णूपुरी येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणी करून दुपारी सव्वाबारा वाजेदरम्यान भक्ती शरद पिंपळे हिचा रूग्णालयात येण्यापूर्वी मृत्यू झाला असल्याचे घोषित केले, अशी माहिती बीट अंमलदार गवळी यांनी दिली. याप्रकरणी नांदेड ग्रामीण ठाण्यात तूर्तास आकस्मिक मृत्यूची नोंद घेण्यात आली असून, पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड हे याप्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत, अशी माहिती सहायक पो.नि. सचिन गढवे यांनी दिली.

संचालक डॉ मनेश कोकरे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन सदरील घटनेविषयी माहिती तरुण भारतसी देताना संस्थेचे संचालक डॉ. मनेष कोकरे यांनी अशी दिली की, सदरील मुलीचे वडील गेल्या पाच वर्षांपूर्वी आत्महत्या करून मृत्यू पावले होते. त्यामुळे घटनेचे परिणाम डोक्यावर असल्यामुळे सदरील मुलगी कोणाशी बोलत नव्हती किंवा गप्प अशी असायची तिचा कोणाशीही जास्त दोस्ताना नव्हता व तिच्या नातेवाईकांनीही अशा प्रकारची माहिती यापूर्वीच आम्हाला कळवली होती असल्याची माहिती त्यांनी दिली. अशा घटना घडणे दुर्दैवी असल्याचे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना असे आवाहन केले की कौटुंबिक, आर्थिक, शैक्षणिक, शारीरिक अशी कुठलीही समस्या असल्यास पालकांनी किंवा विद्यार्थ्यांनी येऊन संस्था प्रशासनास प्रमाणिकपणे कळवल्यास आम्ही त्यांना शंभर टक्के मदत करण्याचा प्रयत्न करू. पण विद्यार्थ्यांनी असे टोकाचे निर्णय निर्णय घेऊ नये असे आवाहन संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी यावेळी केले.

# विष्णुपूरी शासकीय रुग्णालय झाले चकाचक





**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ डिसेंबर**

अस्वच्छतेमुळे चर्चे त असलेले विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालय सध्या स्थितीत मात्र चकाचक झाल्याचे दिसून येत आहे. शासकीय रुग्णालयाचे स्वच्छतेचे कंत्राट एका खाजगी कंपनीला देण्यात आले असून १०० कामगारांच्या माध्यमातून दररोज शासकीय रुग्णालय व परिसराची साफसफाई करण्यात येत आहे.

जवळपास वर्षभरापूर्वी मृत्यूसत्रामुळे विष्णुपुरी शासकीय रुग्णालय राज्यभर चर्चेत आले होते. यावेळी संतप्त झालेल्या तत्कालीन खासदार हेमंत पाटील यांनी रुग्णालयाचे अधिष्ठाता यांना शौचालय साफ करायला लावले होते. या प्रकारामुळे राज्यभर शासकीय रुग्णालयातील अस्वच्छतेची चर्चा सुरू होती. दरम्यान मागील काही दिवसापासून रुग्णालयात मोठ्या प्रमाणात स्वच्छता करण्यात येत असून पुणे येथील स्मार्ट सर्विसेस या कंपनीला दिनांक १८ नोव्हेंबर पासून शासकीय रुग्णालयाचे स्वच्छतेचे कंत्राट दिले आहे. या कंपनीचे १०० कामगार दररोज रुग्णालय व परिसराची साफसफाई करत असून विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात आता चकाचक झाल्याचे दिसून येत आहे.

## माजी आमदार हंबर्डे यांच्या प्रवेशाने राष्ट्रवादीची ताकद वाढणार :खावेद नवाज

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ डिसेंबर**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार, मुख्यमंत्री यांच्या महाराष्ट्रात सर्वात जास्त चांगले स्ट्राईक रेट ४१ आमदार निवडून आले व नांदेड येथील माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे राष्ट्रवादीचे आमदार झाल्याने जिल्ह्यात अनेक माजी आमदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, माजी नगरसेवक हे उपमुख्यमंत्री नामदार अजित दादा पवार व आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीत प्रवेश करून येणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत निवडणूक जिंकण्यासाठी काँग्रेसचे माजी आमदार म्हणून मोहन अण्णा हंबर्डे व अनेक माजी नगरसेवक, माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य घेऊन राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याने राष्ट्रवादीची ताकद वाढणार असल्याचे नांदेड शहर जिल्हा अल्पसंख्याकचे जिल्हाध्यक्ष खालेद नवाज यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त



**देगलूर-महाविद्यालयाचे प्रा. शेरीकर सर यांची उपप्राचार्य पदी निवड झाल्याबद्दल मुख्याध्यापक तथा संस्थेचे उपाध्यक्ष वाय. आर.गजभारे सर यांच्या मार्गदर्शनाने सावित्रीबाई फुले प्रा. व मा. विद्यालयच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी माध्यमिक विद्यालयाचे प्रभारी पाळेकर सर, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक पाटील सर, संस्थेचे कार्यकारी सदस्य कंधारकर सर, बोरगावकर सर तसेच आदी उपस्थितीत होते.**

### घुंगराळा खंडोबा यात्रेतील कुस्ती स्पर्धेत विजय शिंदे यशस्वी ठरला



**नायगाव-**नायगाव येथील खंडोबा यात्रेतील विशेष आकर्षण असलेल्या भव्य कुस्ती स्पर्धेत वाशिमचा पहिलवान विजय शिंदे याने दिल्लीच्या मनीष कुमार याला असमान दाखवत कै.माधवराव.सुगांवे यांच्या स्मरणार्थ राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस वसंत सुगांवे यांच्या तर्फे ठेवलेले खंडोबा केसरी २१,१११ रुपयांचे बक्षिस पटकावले आहे. म्हाळसाकांत यात्रे निमित्त आयोजित सदर कुस्ती स्पर्धेत हरियाणा, पंजाब, दिल्ली, यवतमाळ, वाशीम, कोल्हापूर, सातारा या सह नांदेड जिल्ह्यातील विविध ठिकाणचे अनेक मल्ल कुस्ती खेळण्यासाठी आले होते.स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य सरकारच्या आयुष विभागाचे संचालक तथा घुंगराळ्याचे भूमिपुत्र डॉ.रामन यलपलवाड व कुंटूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामकृष्ण पाटील, गटविकास अधिकारी वांजे, महिला व बालकल्याण समितीचे सदस्य किशोर नावंदे,अभियंता जाधव साहेब आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.दुपारी कुस्ती स्पर्धेस प्रारंभ करण्यात आला.या कुस्ती स्पर्धे त अंदाजे २०० ते २५० लहान ते मोठ्या वयोगटातील कुस्त्या लावण्यात आल्या.रात्री ९ वाजेपर्यंत सदर कुस्त्यांचा डाव सुरूच होता.कुस्ती स्पर्धा पाहण्यासाठी ५ ते १० हजार कुस्ती शौकीनांची उपस्थिती होती.या कुस्ती स्पर्धेला नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक श्री शहाजी उमाप साहेब यांनी भेट देऊन तास भर कुस्ती स्पर्धा पाहण्याचा आनंद घेतला व मल्लांशी चर्चा करून आनंद व्यक्त केला. कुस्ती स्पर्धेचे बक्षीस वितरणाचे कामकाज माजी विस्तार अधिकारी बालाजीराव मातावाड, ग्रामविकास अधिकारी सूर्यकांत बोंडले, शिवाजी पा.ढगे, श्यामराव यमलवाड यांनी पाहिले.या वेळी ज्येष्ठ नागरिक केरबा पा.सुगावे, संभाजीराव तुरटवाड, ग्रामविकास अधिकारी हणमंतराव शिंदे, माजी विस्तार अधिकारी दंडेवाड साहेब, मारोतराव कंचलवाड, बालाजीराव हाळदेवाड, शंकर मामा यलपलवाड, मा.उपसरपंच शेषेराव पा. ढगे, ग्रा.पं.सदस्य प्रतिनिधी व्यंकटराव कंचलवाड, माधवराव पा. ढगे, प्रल्हादराव पा. ढगे, साईनाथ पा. सुगावे, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष माधव पा. ढगे, ग्रा. पं. सदस्य गंगाधर सूर्यवंशी, व्यंकटराव कंचलवाड, गोविंदराव पा. शिंदे, विठ्ठलराव माधवराव यमलवाड, तंटामुक्ती अध्यक्ष श्याम पा.ढगे, प्रल्हाद बोधनकर, अच्युतराव पांचाळ, श्रीराम पा. सुगावे, माजी ग्रामपंचायत सदस्य गंगाधर पा. ढगे, ग्रा. पं. सदस्य गंगाराम सूर्यवंशी, गंगाधर पा.सुगावे, बालाजी पा. ढगे, ग्रा.पं.सदस्य बंटी यलपलवाड, विलास पा. सुगावे, ग्रा.पं.सदस्य प्रतिनिधी रोहिदास पा. ढगे, मा. ग्रा.पं. सदस्य प्रतिनिधी मुरहारी तुरटवाड, राम पा. सुगावे, मा.ग्रा.पं. सदस्य प्रतिनिधी गंगाधर पांचाळ, सूरज पा. सुगावे, साईनाथ पा.सुगावे, माधवराव जलदेवार, शंकर यमलवाड, राजेश पा. ढगे, विलास पा.ढगे, प्रदीप पा.सुगावे, शंतनू पा. ढगे, योगेश पा.ढगे, उमेश पा.कदम आदींनी कुस्ती स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले

## रायझिंग स्टार इंटरनॅशनल स्कूल मध्ये शिक्षक पालक सभा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ डिसेंबर**

गंगाई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था हिमायतनगर द्वारा संचलित कासराळी येथील रायझिंग स्टार इंटरनॅशनल स्कूल दि.०८ डिसेंबर रोजी रविवारी पालक सभा संपन्न झाली.नव्याने सुरू झालेल्या या शाळेमध्ये पहिल्याच वर्षी पहिल्या पालक सभेमध्ये अनेक पालकांनी लक्षणीय उपस्थिती नोंदवली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा.एम पी पाटील साईबाबा ज्युनिअर कॉलेज शंकर नगर यांनी भूषवले व पालकांना मार्गदर्शन केले. तसेच पालक प्रतिनिधी म्हणून सचिन सुभानकर सर, महिला पालक प्रतिनिधी म्हणून भाग्यश्री कर्वेडकर, सिमा अजिमोद्दीन शहा, गोपाल हरडपकर, तसेच पोलीस पाटील माधव ठक्करवाड, शाळेच्या मुख्याध्यापिकाअश्विनी हरडपकर, शाळेचे समन्वयक विठ्ठल कामनासे सर व सर्व शिक्षक व शिक्षिका या कार्यक्रमास उपस्थित होते.

# धर्माबाद येथे अल्पवयीन मुलीचा विनयभंग

## गुन्हा दाखल करताच अवघ्या एका तासात आरोपी गजाआड

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. ०९ डिसेंबर**

धर्माबाद तालुक्यातील एका गावामध्ये बारा वर्षीय मुलीवर एका नराधमाने विनयभंग केल्याची घटना घडली होती, सदर घटनेबाबत पिडीतेच्या आईने धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करताच अवघ्या एका तासाच्या आत धर्माबाद पोलिसांनी सदर आरोपीला म्हैसा येथून अटक केली आहे.

याबाबत सविस्तर वृतांत असे की दि. ४ डिसेंबर रोजी संध्याकाळी ५:५० च्या सुमारास धर्माबाद तालुक्यातील एका गावामध्ये १२ वर्षीय चिमुकली ही खेळत असताना आरोपीने स्वतःजवळ बोलवून तिचा विनयभंग केला होता. सदरची घटना ही त्या चिमुकलीने आपल्या आईला सांगितले असता तिच्या आईने धर्माबाद पोलीस ठाण्यात येवून पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांना घडलेला वृत्तांत सांगत न्याय देण्याची विनंती केली होती, घडलेली घटनेचे गांभीर्य ओळखून लगेचच पोलीस निरीक्षक यांनी पोलीस अधीक्षक यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली सूत्रे हलवत आरोपीचा भ्रमणध्वनी नंबर नेमका कुठे चालू आहे का? याची चाचणी केली होती. गुन्हा दाखल होताच अवघ्या एका तासाच्या आत आरोपीला गजाआड केले होते. पिडीतेच्याआईने दिलेल्या तक्रारीनुसार धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीस न्यायलयिन कोठडी सुनावण्यात आली आहे. ही कारवाई पोनि रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक पवार, पोलीस हवालदार कुमरे व सचिन गडपवार यांनी पार पाडली.

# मुदखेडमध्ये EVM विरोधात काँग्रेसची स्वाक्षरी मोहीम

## लोकशाही वाचविण्यासाठी 'मत पत्रिके'ची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०९ डिसेंबर**



भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने राज्यात लोकशाही वाचविण्यासाठी एतच् हटाओ स्वाक्षरी मोहिम राबविली जात असून याच धर्तीवर मुदखेड तालुक्यात एतच् हटविण्यासाठी ५० हजार स्वाक्षरीचा संकल्प काँग्रेस कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे. या मोहिमेची सुरवात मुदखेड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने दि.०८ डिसेंबर रोजी शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकातून करण्यात आली आहे.लोकसभा निवडणूक असो की, महाराष्ट्र तथा हरियाणा विधानसभा निवडणुक असो यांच्या निकालात झालेला संख्यात्मक गोंधळ आणि निवडणूक आयोगाकडून न मिळणारी समाधानकारक उत्तरे यामुळे देशात एतच् विरोधात मोठा रोष व्यक्त होत आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस खा राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने महाराष्ट्रात एतच् हटाओ स्वाक्षरी मोहिम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, आ अमित देशमुख यांच्या आदेशाने प्रत्येक जिल्ह्यात एतच् विरोधात स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्यात मुदखेड तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने 'एतच् हटाओ देश बचाओ' स्वाक्षरी मोहिमेचे आयोजन डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात करण्यात आले होते. यावेळी जिल्हाध्यक्ष बी आर कदम, कार्याध्यक्ष बालाजी चव्हाण, तिरुपती पाटील कोंडेकर, भगवानराव मनूरकर, माधवराव पवळे, तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, शहराध्यक्ष कैलास गोडसे, कार्याध्यक्ष मोहम्मद गौस, मुजिब पठाण, संदीपकुमार देशमुख, माधव हामंद, साहेबराव गोरखवाड, सुरेश सूर्यवंशी, आकाश सोनटक्के, संजय बोकेफोड, दादाराव पाटील, बळवंत पाटील, सूर्यकांत चौदंते, अविनाश चौदंते, यशवंत रानखांबे, अब्दुल रजाक, भगवान पवार, राजेश पवार, रमेश बोडके, अविनाश हटकर, बालाजी गुळेवाड, प्रशांत पाटील, शिवाजी वडजे, युसूफ भाई, अश्फाक मौली, मोईन फुलवाले अनिल कल्याणे आदी उपस्थित होते.

**५० हजार स्वाक्षरीचा निर्धार**

लोकप्रतिनिधी कायदा १९५१ कलम ६१ मध्ये अनुल्लेखित आहे की, देशातील मतदान हे मत पत्रिकेवरच घेतले जाईल. तर नव्याने १९८९ मध्ये त्यात करण्यात आलेल्या सुधारणे नुसार एका किंवा काही मतदारसंघातील विशिष्ट परिस्थिती पाहूनच EVM² चा वापर केला जाऊ शकतो असा कायदा असतांना कुठलेही ठोस कारण नसताना देशात सरसगट एतच् चा वापर करणे बेकायदेशीर असून लोकप्रतिनिधी कायदा १९५१ मधील कलम ६१ ची देशात पायमल्ली चालू आहे अशी प्रतिक्रिया प्रा संदीपकुमार देशमुख यांनी दिली.

# भव्य हिंदू न्याय यात्रा व आक्रोश मोर्चाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ डिसेंबर**

बांगलादेश येथे होत असलेल्या हिंदूंच्या अनन्वित आणि अमानुष अत्याचारांविरोधात नांदेड येथे उद्या दिनांक १० डिसेंबर २०१४ रोजी भव्य हिंदू न्याय यात्रा व आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

१० डिसेंबर हा जागतिक मानवाधिकार दिवस जागतिक मानवाधिकार परिषदेने हिंदूवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची कधीच दखल घेतली नाही. बांगलादेशात हिंदूवर व अन्य अल्पसंख्य समुदायावर अनन्वित अत्याचार होत आहेत. संयुक्त राष्ट्र व मानवाधिकार परिषद यावर सोयीस्कररित्या दुर्लक्ष करीत आहे .बांगलादेशात हिंदू संत, मंदिर, हिंदू संस्था असुरक्षित असून दररोज हल्ले होत आहेत .भारत सरकार जागतिक पातळीवर बांगलादेशी हिंदूंच्या रक्षणासाठी प्रयत्न करत आहे. हिंदू बांधवांवर जगात कुठेही अन्याय होत असेल तर त्याचा हिंदू समाजाकडून तीव्र निषेध आणि विरोध होणे व हा संदेश संपूर्ण जगात जाणे आवश्यक आहे. हिंदू समाज हा भारतात बहुसंख्य असला तरी जागतिक पातळीवर अल्पसंख्य आहे यासाठी संयुक्त राष्ट्राने याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर बांगलादेशातील हिंदू बांधवांवर होत असलेल्या अत्याचारा विरोधात सर्वांनी एकत्र येऊन याचा निषेध करणे आवश्यक आहे. त्याकरिता उद्या दिनांक १० डिसेंबर, मंगळवार रोजी नांदेड येथे जुना मोंढा ते जिल्हाधिकारी कार्यालय असा सकल हिंदू समाजातर्फे भव्य मोर्चा आयोजित करण्यात आलेला असून त्यात संत महंतांची उपस्थिती देखील असणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा येऊन जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले जाईल व मोर्चाची समाप्ती होईल. या मोर्चात अधिकधिक संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सकल हिंदू समाजातर्फे करण्यात आले आहे.

# येवती येथील विद्यालयाचे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात यश



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ डिसेंबर**

नुकत्याच पार पडलेल्या हुतात्मा माधव विद्यालय येथे ५२ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात श्री.शिवाजी माध्यमिक विद्यालय येवती या विद्यालयाचा माध्यमिक गटात चि.बोमनाळे शिवम पांडुरंग या विद्यार्थ्याने विज्ञान विषयाचे शिक्षक श्री.तळेगावे एस.जी.यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या 'सोलार मळणी यंत्र' या प्रयोगास 'तृतीय पारितोषिक' प्राप्त झाले आहे. इंधनाच्या ज्वलनातून होणाऱ्या प्रदूषणावर एक उपाय म्हणून या प्रयोगाकडे पाहता येते. तर अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्य या प्रकारात प्राथमिक गटातून सहशिक्षक तळेगावेसंतोष गणपतराव यांच्या टाकाऊ वस्तूंपासून शैक्षणिक साहित्याची निर्मिती या साहित्यास 'प्रथम पारितोषिक' प्राप्त झाले आहे. सदरील प्रयोगाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी सुभेदार, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मारोती कंतेवाड, तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

# भक्तांच्या अलोट गर्दीत जागृत खंडोबा देवांचा नरसीत पालखी सोहळा

## भक्तांच्या व वारु -वाघे यांच्या यळकोट यळकोट जय मल्हार शिवानंदाचा येळकोट येळकोट घे या जय घोषाने नरसी नगरी भक्तीत न्हाऊन गेली!

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. ०९ डिसेंबर**



नरसी येथील भंडारा डोंगरावरील लाखो अनुयायांचे आराध्य दैवत व परिसरातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान जाज्वल्य तिर्थक्षेत्र जागृत खंडोबा देवाचा रविवारी नरसी परिसरातील हजारो भाविक भक्तांच्या अलोट गर्दीत, श्री क्षेत्र खंडोबा देवाचा सविसावा वार्षिक महोत्सवाचा पालखी सोहळा संपन्न मागील गेल्या काही चाळीस वर्षा पूर्वी पासून तालुक्यातील नरसीतील भंडारा डोंगर माथ्यावरील हजारो भाविक भक्तां च्या नवसाला पावण होणारे येथील तिर्थक्षेत्र म्हणून कमी कालावधीत नरसीत नावारूपास आलेले जाज्वल्य जागृत दैदिप्यमान श्री.क्षेत्र खंडोबा मंदिर असू.त्यामुळे येथील तिर्थ क्षेत्राची ख्याती सर्व दुर पर्यंत पसरली आहे. येथील तिर्थक्षेत्राच्या स्थळी गेल्या काही वर्षापासून हजारो भाविक भक्तांनी मनोभावे पूजापाठ, अभिषेक करण्यासाठी भक्तांच्या संख्येत खुप मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. येथे येत असलेल्या भक्ताच्या संख्येच प्रमाण लक्षात घेऊन. मंदिर कमिटीतील संचालक मंडळ व अध्यक्ष माधवराव मेकॉले यांनी याठिकाणी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी ऊन, वारा पाऊस सुरक्षित राहावे यासाठी येथे विज, पाणी व सभागृह या सारख्या भौतिक सुविधेची उपलब्धता करून देण्यात आली. नरसी सह परिसरातील भाविक भक्तांच्या वतीने दर रविवारी येथे अन्नदानाच्या रुपाने मोठ्या प्रमाणात भंडारे देखील केल्या जातात. गेल्या अनेक वर्षापासून मंदिर कमिटी च्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून प्रति वर्षातील मार्गशिर्ष शुध्द सप्तमी शके १९४६ या शुभ मुहूर्तावर वार्षिक महोत्सव पालखी सोहळ्याची परंपरेला सुरुवात केली आहे.

त्या अनुषंगाने या वर्षातील मार्गशिर्ष शुध्द सप्तमी शके १९४६ दि.०८ डिसेंबर २४ रोज रविवार दुपार नंतर पुजारी पांडुरंग गणपती महाराज पाटे मल्हार नगरातील निवासस्था ना पासून सरपंच,पोलिस पाटील. इब्राहिम बेग पटेल, मंदिर कमिटीतील सर्व सन्माननीय सदस्य व गावातील प्रतिष्ठित व्यक्ती व नरसी सह परिसरातील हजारो भाविक भक्त वारु -वाघे यांच्या उपस्थितीमध्ये श्री खंडोबा देवाची सविसाव्या वार्षिक महोत्सवाच्या पालखी सोहळ्याला सुरुवात करण्या त आली. तद्नंतर या पालखी सोहळ्या वेळी हजारो भाविक भक्तांनी वारु -वाघे बेल भंडार्याची उधळण करीत पालखी सोहळा नरसीतील मुख्यचौकाला वळसा घालीत हीभंडारा डोंगरावरील मंदिरा प्रस्थान केली असता.भक्त मंडळीच्या यळकोट यळकोट जयमल्हार शिवानंदाचा येळकोट येळ- कोट घे या जय घोषाने नरसी नगरी भक्ती रसात न्हाऊन गेली होती.व पालखी भंडारा डोंगरावरील मंदिरा मध्ये पोह चल्यानंतर पांडुरंग गणपती महाराज पाटे यांच्या वेदोच्या रात श्री खंडोबा देवाचा अभिषेक करून महाप्रसादाला सुरुवात करण्यात आली. त्या नंतर रात्री आठ ते पहाटे पाच या वेळेपर्यंत नरसी सह परिसरा तील हजारो भाविक भक्त मंडळी व मंदिर कमिटी तील सर्वच सन्मानिय संचालक मंडळाच्या उपस्थितीत मंदिरच्या भव्य प्रांगणात केशव महाराज माने शिनगारवाडीकर, नांदेड जिल्हयातील सर्व वाघे मंडळाचा जागरणाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वर्षातील सविसाव्या वार्षिक महोत्सवाचा पालखी सोहळा यशस्वी पणे पार पाडण्यासाठी गेल्या काही दिवसां पासून नरसी सर्कलचे माजी जि.प सदस्य माणिक लोहगांवे, नरसी नगरीचे माजी.सरपंच व्यंकट कोकणे, गांव स्तरावरील तंटामुक्तीचे माजी अध्यक्ष गंगाधर वडगावे,बाबाराव पाटे, पांडुरंग गुणाजी महाराज पाटे, व्यंकटी महाराज पाटे माधव वडजे व मंदिर कमिटीचे अध्यक्ष माधवराव मेकॉले,मारोती मांजरमे,मंदिर कमिटीचे सदस्य संग्राम मुगांवे, सदस्य पांडुरंग बागडे, दत्ता गागलेगावे, सदस्य हाणमंत मिसे, सदस्य शिवाजी नारे, ग्रामपंचायत सदस्य श्यामसुंदर कोकणे, गोविंदराव टोकलवाड, नागनाथ कोकणे, विठ्ठलराव कोकणे, माधव तुप्पेकर, प्रकाश तुप्पेकर, गोविंदराव तुप्पेकर, आदिनी मंडळी अथक परिश्रम घेऊन पालखी सोहळा यशस्वी केला आहे. भंडारा डोंगरावरील जागृत जाज्वल्य खंडोबा देवाचा पालखी सोहळा नरसीतील मुख्यचौकाला वळसा घालतांना चा हा क्षण आहे.

# राष्ट्र प्रेमाची भावना मनात ठेवून ध्वजदिन निधी संकलनात अमुल्य योगदान द्यावे -जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

भारत देशाच्या संरक्षणासाठी आपले वीर सैनिक देशाच्या सिमेवर कोणत्याही वातावरणात आपली सेवा निष्ठेने बजावत असतात. सैनिक अत्यंत कठीण वाता-वरणासह परिस्थितीला सामोरे जावून देशाच्या सिमेचे दिवसरात्र संरक्षण करत असतात. तरी सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अधिकाऱ्यांसह नागरिकांनी राष्ट्र प्रेमाची भावना मनात ठेवून ध्वजदिन निधी संकलनात आपले अमुल्य योगदान द्यावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.

सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ जालना येथील सैनिकी लॉन्सवर पार पडला. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी महापालिका उपायुक्त नंदा गायकवाड, सेवानिवृत्त स्क्वॉड्रन लिडर तथा जिल्हा सैनिक





कल्याण अधिकारी डॉ.रुपाली सरोदे, जिल्हा उद्योग केंद्र व्यवस्थापक योगेश सारणीकर, शिक्षणाधिकारी मंगल धुपे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ म्हणाले की, आपले सैनिक सिमेवर खडा पहारा देत असल्याने आपण देशांतर्गत निर्भय जीवन जगत असतो. लोकशाहीचे मुल्य अबाधित ठेवण्यास तसेच देशाच्या प्रगतीत सैनिकांचा मोलाचा वाटा आहे. जो देश आर्मी व मिल्ट्रीचा चुकीचा अवलंब करतो तो देश कधीही प्रगती करु शकत नाही. नवीन पिढीला सैनिकांच्या भावना समजण्यासाठी शाळेतील विविध कार्यक्रमात एखादा भाग सैनिकांवर आधारित ठेवण्यात यावा. नागरिकांनी सार्वजनिक जीवनात सैनिक, माजी सैनिकांसह वीर माता, वीर पिता, वीर पत्नी यांचा नेहमी आदर करावा. असे सांगुन सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचे गेल्या वर्षी दिले गेलेले उद्दीष्ट सर्व कार्यालय प्रमुखांनी पुर्ण केले त्याबद्दल अभिनंदन करत चालु वर्षाची उद्दीष्टपूर्ती करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

सशस्त्र सेना ध्वजदिन निधीचा सैनिकांच्या कल्याणकारी योजनांसाठी वापरण्यात येत असतो. जालना जिल्ह्याला सशस्त्र सेना ध्वजदिन निधीचे दिले गेलेले उद्दीष्ट २२१ टक्के पुर्ण केले आहे. सर्वांनी सैनिकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास मदत करावी. असे सांगून सशस्त्र सेना ध्वजदिन निधीचे महत्व प्रास्ताविकातुन सेवानिवृत्त स्क्वॉड्रन लिडर तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी डॉ. रुपाली सरोदे यांनी समजावुन सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने व शहिदांना आदरांजली अर्पण करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गोविंद इंगोले यांनी करुन आभार मानले. पार्थ सैनिकी शाळेतील विद्यार्थ्यांनी हम सब भारतीय है..! हे संगीतबध्द गीत सादर केले. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या माजी सैनिकांच्या पाल्यांचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच मागील वर्षी उत्कृष्ट निधी संकलन केलेल्या कार्यालय प्रमुखांचा गौरवही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमास माजी सैनिकांसह वीर माता, वीर पिता, वीर पत्नी, एनसीसी, पार्थ सैनिकी शाळेतील विद्यार्थी, नागरिक, विविध कार्यालयाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीस पळवून नेऊन नराधमाच्या चार तासात पोलिसांनी आवळल्या मुसक्या

### भोकरदन पोलिसांची कामगिरी, अल्पवयीन मुलीची सुधारगृहात रवानगी

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

एका अल्पवयीन मुलीस पळवून नेऊन सोलापूर जिल्ह्यातील पंढरपुरातील मठात ठेवणाऱ्या नराधमाच्या भोकरदन पो-लीसांनी मुसक्या आवळल्या असून सदरील मुलीची सुधारगृहात रव-ानगी करण्यात आली आहे. भोकरदन पोलीस ठाण्यात २१ नोव्हेंबर २०२४ रोजी कलम १३७ (२) भान्यास प्रमाणे दाखल होता. सदर गुन्ह्यातील अपहृत मुलगी हीस दादाराव भाऊसाहेब साबळे रा. लिंगेवाडी ता. भोकरदन जिल्हा जालना याने ऊस लावून लग्नाचे अमिष दाखवून सातारकर मठ, पंढरपुर जि. सोलापुर येथे ठेवले होते. याबाबत गुप्त माहीती काढुन तसेच घटनेचे गाभीय ओळखुन भोकरदन पोलीस ठाण्याचे पो-लीस निरीक्षक किरण बिडवे यांनी तात्काळ एक पोलीस पथक नेमुण त्यांना योग्य ते मार्गदर्शन करून सदर अपहृत मुलीचा शोध घेण्याबाबत पोलीस उपनिरीक्षक सागर शिंदे यांना सुचना दिल्या. सुंदर पयकास ५ डिसेंबर २०२४ रोजी मिळालेल्या गुप्त माहीतीवरून सदर ठिकाणावरून ताब्यात घेवून आरोपी दादाराव भाऊसाहेब साबळे रा. लिंगेवाडी ता. भोकरदन यास अटक केली. सदर अल्पवयीन मुलगी हीस बालसुधार गृह, जालना येथे हजर करण्यात आले आहे. तसेच ७ डिसेंबर रोजी भोकरदन येथील शिवाजी शाळेच्या समोरुन एक अल्पवयीन मुलीचे अपहरणाबाबत पोलीस ठाण्यात तक्रार प्राप्त झाल्यानंतर कलम १३७ (२) भान्यास प्रमाणे दाखल करून पोलीस उपनिरीक्षक पवन राजपुल व त्यांचे पथकाने पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या मार्गशनाखाली तांत्रिकदृष्ट्या कशोसीने तपास करून सदर अपहृत मुलीचा अवघ्या चार तासात शोध घेवुन तीस संभाजीनगर बसस्थानक परिसर येथुन ताब्यात घेवुन पुढील कारवाई करीत आहेत. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक अजयकुमार बंसल, अप्पर पो-लीस अधिक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पवन राजपुत, पो-लीस उपनिरीक्षक सागर शिंदे, पोलीस नाईक विकास जाधव, प्रशांत उबाळे, उमेश टेकाळे, पोलीस अंमलदार संदीप भुतेकर, किशोर मोरे, लक्ष्मण राणगोते, नंदकुमार दांडगे, महीला पोलीस सिमा देठे व दिपाली सपकाळ अशांनी केली आहे.



## संक्षिप्त

### कर्जमाफी, सोयाबीनला ८००० कापसाला १२००० हमी भाव द्या

#### अन्यथा मंत्रालयावर आंदोलन करणार- मयुर बोर्डे

तभा वृत्तसेवा
जाफ्राबाद/प्रतिनिधी



मराठवाडा विदर्भात सोयाबीन व कापुस ही प्रमुख पिक घेतल्या जात.परंतु अलीकडे दोन चार वर्षात सतत दुष्काळ,कधी ओला तर कधी कोरडा असल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे.सोयाबीन व कापुस पिक घेणारा शेतकरी आज मोठ्या प्रमाणात कर्जबाजारी होत आहे कारण शेतीचा उत्पादन खर्च हा दहा वर्षात चार पटीने वाढला परंतु त्या पटीने पिकाचा दर वाढला नाही उत्प-ादन खर्च देखील निघत नसल्याने कापुस सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यावर आत्महत्येची वेळ आली आहे असे शेतकरी नेते मयुर बोर्डे यांनी बोलतांना म्हटले.परतू राज्य सरकार व केंद्र सरकारने जर सोयाबीनला किमान आठ हजार रुपये तर कापसाला किमान बारा हजार रुपये हमी भाव द्यावा व संपूर्ण कर्जमाफी करावी अशी मागणी मयुर बोर्डे यांनी बोलतांना केली. सरकार खुर्ची च्या राजकारणात व्यस्त असून ज्या जगाच्या पोशिंद्याने कष्ट करून पिकवले त्यांच्यावर आज आत्महत्येची वेळ येत असेल तर हे राज्य कोणासाठी चालवणार असा प्रश्न देखील त्यांनी विचारला. जर लवकरात लवकर सरकारने या कडे लक्ष दिले नाही तर मंत्रालयावर आक्रमक आंदोलन करू असा इशारा मयुर बोर्डे यांनी दिला.

### दिपक वाघ यांचा निवडीबद्दल गावकऱ्यांनी केला सत्कार



तभा वृत्तसेवा
माहोरा/प्रतिनिधी

जाफ्राबाद तालुक्यांतील माहोरा येथील सर्व साधारण शेतकरी कुंटुंबातील दिपक जैयवंतराव वाघ या भुमि पुत्रांचा व नव तरुणाचे शिक्षण पदवीदर बी.एस.बी.एड.पर्यत झालेल्या तरुणाने नाशिक येथील सत्र न्यायलात परिक्षा उतिर्ण झालेले असुन दिपक वाघ,या भुमिपुत्राचा माहोरा येथील ग्रामसंसद कार्यालयात आज दि.९ डिसेंबर रोजी ग्रामसंसद कार्यालयांचे सरपंच गजानन पाटील लहाने,जेष्ठ नेते वामनराव पाटील लहाने, अंकुश पा.कोरडे, संतोष गौरकर, पुंजाराम पा.मुद्दे, संतोष वाघ,भानुदास मुद्दे, जेष्ठ पत्रकार बाळासाहेब गव्हले, लक्ष्मण वाघ,विजय चिंचोले,विलास पाटील, बाबुराव साबळे,गणेश गायकवाड,सुभाष इंगळे, विजु इंगळे,काळे भाऊ, जिवन साळवे,आदीनी या नव तरुण भुमीपुत्राचा पुष्पहार घालुन पेढे भरुन भव्य असा या भुमी पुत्राचा नागरिक सत्कार केला.

### राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण यांना विधान परिषदेवर घ्या

#### अण्णासाहेब चितेकर यांची राष्ट्रवादीचे पक्षप्रमुख अजितदादा पवार यांना रक्ताने पत्र लिहून मागणी



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जालना जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण यांना विधान परिषदेवर घ्या अशी मागणी राष्ट्रवादीच्या पदाधिकार्यानी केलीय. जालना येथील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी अण्णासाहेब चितेकर यांनी अजित पवार यांना रक्ताने पत्र लिहून ही मागणी केलीय. राष्ट्रवादी चे जालना जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण हे माजी आमदार असून ते पक्षात मागील अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. चव्हाण यांना राजकारणाचा चांगला अनुभव असून त्यांना पक्षाने संधी देत विधान परिषदेवर घ्यावे अशा विनंतीचे रक्ताने पत्र अण्णासाहेब चित्तेकर यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रमुख अजित पवार यांना लिहिलं आहे.

## जालन्यात पुन्हा पोस्टाच्या पार्सलद्वारे मागविलेली १ तलवार व १ खंजीर जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी


दिनांक ०९/१२/२०२४ रोजी जालना जिल्हयातील अवैध शस्त्रे बाळगणा-या आरोपीची माहिती घेऊन त्यांचा शोध घेणे कामी विशेष मोहीम राबवणे संदर्भात मा. पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बंसल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी यांचे सुच-नेवरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक निर्माण करुन जालना जिल्हा हद्दीतील अवैध शस्त्रे बाळगणा-या आरोपीतांची माहिती घेऊन शोध घेत असतांना खब-या मार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, पहमावतीनगर बारवाले कॉलेज पाठीमागे जालना येथील एका व्यक्ती त्याचे नावावर धारधार तलवार



व खंजीर पोस्टाद्वारे मागिवलेला असुन सदर तलवार व खंजीर डिलीव्हरी साठी आज रोजी येणार असल्याची माहिती प्राप्त झाली अशी माहिती मिळाल्यावर सदरची माहिती वरिष्ठांना कळवुन वरिष्टांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार गांधी चमन पोस्ट ऑफीस रेल्वे स्टेशन रोड जालना येथे सापळा लाऊन गुप्त बातमीदारांनी कळविलेल्या ईसम एक खाकी रंगाचा आयताकृती बॉक्स घेऊन जातांना दिसल्याने सदर इसमांस ताब्यात घेऊन त्यांना विचारपुस केली असता त्याने त्याचे नाव सै.तौसीफ से. शफिक वय २३ वर्ष रा. पद्मावतीनगर बारवाले कॉलेज पाठीमागे जालना असे सांगीतले. त्यांच्या कडील खाकी रंगाच्या आयताकृती पुठ्ठ्याच्या बॉक्स ची पंचासमक्ष झडती घेतली असता, त्यामध्ये ५००० रु किंमतीची ०१ धारधार तलवार व १०००/- रूपये किमंतीचा ०१ धारदार पाते असलेला खंजीर मिळुन आला. सदरचे ०१ धारधार तलवार व ०१ खंजीर जप्त करण्यात आले असुन सदर आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे कदिम जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा.पो-लीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि.श्री. योगेश उबाळे, पोउपनि.श्री. राजेंद्र वाघ, पोहेकॉ/४७४ पव्हरे, पोहेको/७६५ वाघ, पोहेको/१२४२ घुगे, पोहेकॉ/८५७ राठोड, पोहेको/८९७ जैवाळ, पोना/१३९५ पटेल, पोकों/१४४१ काळे सर्व स्थागुशा जालना व पोस्टे कदीम जालना येथील पोहेको/१२५३ जायभाये व पोका ४६८ पवार यांनी केली आहे.

## भाजपाचे जेष्ठ नेते आ.बबनराव लोणीकर यांना कॅबिनेट मंत्री पद द्यावे- उपसभापती संभाजी वारे



तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

**परतूर मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री बबनराव लोणीकर हे पाचव्यांदा विजयी झाले. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी ७० हजार ६५९ मते घेऊन विजय मिळवला आहे. विजयाची २०२४ला हॅट्रिक करणारे आमदार लोणीकर यांना कॅबिनेट मंत्रीपद देण्यात यावे. अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समिती परतूरचे उपसभापती संभाजी वारे यांनी केली**



परतुर विधानसभा मतदारसंघात आमदार लोणीकर यांची पकड मजबूत आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत समिती परतूर मंठा, जवळजवळ सर्वच जिल्हा परिषद सदस्य भाजपचे आहेत, कृषी उत्पन्न बाजार समिती परतुर व आष्टी, भाजपच्या ताब्यात आहे, मतदारसंघातील ८० टक्के ग्रामपंचायती भाजपच्या ताब्यात आहेत, परतुर मतदार संघ हा भाजप चा बालेकिल्ला म्हणून मराठवाड्यात ओळखला जातो, आमदार बबनराव लोणीकर यांनी मोठ्या प्रमाणात मतदारसंघात विकासाची कामे केलेली आहेत, वाटर ग्रीड चे मतदारसंघात जाळे विणलेले आहे, त्यामुळे मराठवाड्यात त्यांना वाटर ग्रीड चे जनक म्हणून ओळखले जाते, त्यामुळे त्यांना मतदारांनी पुन्हा पाचव्या संधी दिलेली आहे, राज्यातही नव्याने महायुतीचे सरकार स्थापन झाल्यामुळे आमदार लोणीकर यांना कॅबिनेट मंत्री पद देण्याची मागणी, परतूर मंठा विधानसभा मतदारसंघातील परतुर भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघन कणसे, मंठा तालुका अध्यक्ष सतीशराव निर्वळ, गणेशराव खवणे, भाजपा जिल्हा चिटणीस रमेशराव भापकर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संपतराव टकले, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष परतुर भागवत मानवतकर, मंठा तालुका अध्यक्ष विलास घोडके,राजेश मोरे, समाज कल्याण सभापती शहाजी राक्षे, माधवसिंह जनकवार, संदीप भैया बाहेकर,सनी तनपुरे, जगदीश पडूळकर, राजेंद्र वायाळ, कृष्णा आरगडे,नरेश कांबळे, तुकाराम सोळंके, उपसभापती रवी भैया सोळंके, बाळासाहेब लहाने, मेहराज भाई खतीब, सिद्धेश्वर केकान, दिनेश सेठ होलानी, प्रशांत बोणगे, इत्यादी कार्यकर्त्यांनी मागणी केलेली आहे

## जाफराबाद तालुक्यात श्री दत्त जयंती सप्ताहानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

तभा वृत्तसेवा
जाफराबाद/प्रतिनिधी

जाफराबाद तालुक्यातील विविध ठिकाणच्या गाव-ातील श्री दत्त मंदीरामध्ये श्री दत्त जयंती सप्ताहानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या सप्ताहाची सांगता महाप्रसाद वाटपाने करण्यात येणार असल्याचे संयोजक समितीच्या वतीने सांगण्यात आले आहे.

जाफराबाद शहरातील आदर्शनगरातील श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक केंद्रामध्ये श्री स्वामी समर्थ महाराजांची त्रिकाल महाआरती,नैवेदय,महाप्रसाद,सामुहीक गुरुचरित्र पारायणाचे पठण,भजन आदि धार्मिक कार्यक्रम प्रतिदिनी आयोजित करण्यात आले आहे.दत्त जयंती दिनी ह.भ.प.वैजयंती सिन्नरकर यांचे प्रवचन,श्री दत्तात्रय जन्म सोहळा, दिपोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाची सांगता महाप्रसाद वाटपाने होणार आहे. तर ब्राम्हण गल्लीतील श्री कानिफनाथ संस्थान मध्ये देखिल गुरुचरित्र पारायण, महाआरती, नैवेदय, महाप्रसाद,भजनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.दत्त जयंती उत्सव सोहळ्यास ह.भ.प.अंबरीश महाराज सोनईकर यांची उपस्थिती लाभणार आहे. या सोहळ्याचा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा,असे



मठाधिपती अनंता महाराज देशपांडे यांनी केले आहे. तर येथील सरदारसिंह यांच्या मळ्यातील श्री दत्त मंदीर,ब्राम्हण गल्लीतील श्री नवनाथ संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.भास्कर महाराज देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री दत्त जयंती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. जाफराबाद तालुक्यातील खा-परखेडा येथील श्री दत्त मंदीरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आसुन, येथे मोठी यात्रा भरते ,येथील सांगता सोहळ्याला मोठी महापगंत असते.तर खासगांव येथील श्री बोटुळे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या शेतात सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.याठिकाणी सामुहीक गुरुचरित्र पारायण,होम हवन, प्रवचन,भजन,किर्तन,आदि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# मराठा समाजाला न्याय, सक्षमता आणि स्थैर्याच्या दिशेने घेऊन जाण्याचा निर्धार

### समाजाच्या समस्या समजून घेऊन उपाय शोधण्यासाठी राज्यभर संवाद बैठका अभियान

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठा महासंघाच्यावतीने राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोढरे यांच्या नेतृत्वाखाली आणि त्यांच्या संकल्पनेतून राज्यभर एक मराठा लाख मराठा संवाद बैठका या अभियानाचा शुभारंभ रविवार दि. ८ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत करण्यात येऊन मराठा समाजाला न्याय, सक्षमता आणि स्थैर्याच्या दिशेने घेऊन जाण्याचा निर्धार करण्यात आला.

या बैठकीला राष्ट्रीय अध्यक्ष



राजेंद्र कोढरे, सरचिटणीस प्रकाश देशमुख, कोषाध्यक्ष प्रमोद जाधव, उपाध्यक्ष विनायक पवार, विभागीय अध्यक्ष प्रा. गोपाळ चव्हाण, विभागीय चिटणीस आतिश गायकवाड, जालना जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्यासह राज्यभरातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. मार्गदर्शन करताना राजेंद्र कोंढरे म्हणाले की, मराठा समाजाचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय आहे. आरक्षणासाठीच्या संघर्षासोबतच समाजाला आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम बनवणे अत्यावश्यक आहे. आर्थिक साक्षरता आणि व्यवसाय उभारणीकडे तरुणांनी वळले पाहिजे. 'एक मराठा लाख मराठा' अभियानाच्या माध्यमातून आम्ही मराठा समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणार आहोत. आरक्षणाच्या तरतुदीचे कायदेशीर मार्गदर्शन, वेगवेगळ्या योजनांची माहिती आणि त्या कशा राबवायच्या, या संदर्भातील इत्यंभूत माहिती असलेले पुढचे पाऊल हे पुस्तक आतापर्यंत ५० लाख समाज बांधवांपर्यंत पोहोचले आहे, असे त्यांनी सांगितले. मराठा महासंघाचे जालना जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी मराठा संघटन वाढवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. याप्रसंगी शासकीय योजनांची माहिती असलेल्या पु-स्तिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले तसेच मराठा समाजाच्या आरक्षणासाठी न्यायालयीन लढाईसह समाजासाठी असलेल्या योजनांची माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू, अशी शपथ पदाधिकाऱ्यांनी घेतली. या बैठकीत राज्यभरात जिल्हानिहाय जिल्हा संपर्क प्रमुखांच्या नियुक्त्या आल्या. छत्रपती संभाजीनगर जिल्हा संपर्कप्रमुख म्हणून अशोक पडुळ यांची नियुक्ती करण्यात आली.

या बैठकीला जालन्यातून कोषाध्यक्ष अशोक पडूळ, सुभाष चव्हाण, ड. शैलेश देशमुख, बबन गवरे, बाळकृष्ण उबाळे, कैलास ढमाळे, विष्णू पिवळ, रवी सूर्यवंशी, सौ. मंगल कोरडे, सौ. वृषाली देशमुख आदींची उप-स्थिती होती.

# मंदिरांनी त्यांच्या उत्पन्नातील दहा टक्के भाग सेवाकार्यासाठी वापरावा -अनिल सांबरे

## बजाजनगर मध्ये कै.बालकृष्ण नाईक रुग्णोपयोगी साहित्य केंद्राचा लोकार्पण सोहळा संपन्न संपन्न

छत्रपती संभाजीनगर : मंदिर हे हिंदू समाजाचे शक्ती केंद्र व सेवा केंद्र असून मंदिरांच्या माध्यमातून आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या हिंदू समाजातील लोकांसाठी संपूर्ण देशभर रुग्णोपयोगी साहित्य केंद्र वैद्यकीय उपचार केंद्र ,अभ्यासिका व वसतिगृह यासारखे विविध प्रकारचे सेवा कार्य उभे राहावेत म्हणून विश्व हिंदू परिषदेचा मंदिर अर्चक पुरोहित आयाम काम करतो.प्रत्येक मंदिराने आपल्या उत्पन्नातील दहा टक्के भाग अशा सामाजिक कार्यासाठी दिल्यास मंदिराचे समाजातील स्थान उंचावण्यास मदत होईल असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे क्षेत्र संपर्कप्रमुख अनिल सांबरे यांनी केले.

श्री अनिलजी सांबरे श्री.साईबाबा मंदिर ट्रस्ट बजाजनगर आणि विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयाम संचालित कै.बाळकृष्ण नाईक रुग्णोपयोगी साहित्य सेवा केंद्राच्या लोकार्पण सोहळ्याच्या कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध उद्योजक श्री मनोज कदम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वाळूज जिल्हा संघचालक श्री अनिल पाटील श्री साईबाबा ट्रस्ट चे सचिव साहेबराव पाथ्रीकर मंदिर आर्चक पुरोहित आयाम प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार विभाग संपर्क प्रमुख योगेश पाठक उपस्थित होते.

रविवार दिनांक ८ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी पाच वाजता श्री साईबाबा मंदिर ट्रस्ट बजाज नगरच्या प्रांगणात संपन्न झालेल्या कार्यक्रमात श्री. सांबरे जी पुढे म्हणाले भारत हा मंदिरांचा देश आहे जगात सर्वात अधिक मंदिरे भारतात आहेत मंदिरांनी त्यांच्याकडे असलेल्या जागेचा उपयोग करून विविध प्रकारची सेवाकार्य सुरू केल्यास समाजही अशा कामासाठी त्यांना मोठ्या प्रमाणात देणगी देऊ शकतो. यासाठी मंदिरांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन आणि कै. बालकृष्ण नाईक रुग्णोपयोगी साहित्य केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

विश्व हिंदू परिषद मंदिर आयामाचे प्रांत संपर्क प्रमुख राजीव जहागिरदार यांनी प्रास्ताविक केले.



श्री.जहागिरदार यांनी प्रास्ताविकात देवगिरी प्रांतात चाललेल्या मंदिर अर्चक पुरोहित आयामाच्या कामाची माहिती दिली आणि श्री साईबाबा मंदिर ट्रस्टने सेवा कार्य सुरू करण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराबाबत विश्वस्तांचे अभिनंदन केले आणि या साहित्य सेवा केंद्रातून गरजू रुग्णांना अत्यंत अल्प दरात व्हीलचेअर, वॉकर, कुबड्या, फोम गादी,वॉकिंग स्टिक सलाईन स्टॅन्ड,नेब्युलायझर, कमोड चेअर,फॉलोअर बेड ,ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर व युरीन पॉट इत्यादी प्राप्त होईल असे सांगितले.

प्रमुख अतिथी प्रसिद्ध उद्योजक श्री.मनोज कदम मनोगत व्यक्त करताना म्हणाले कै.बाळकृष्ण नाईक हे उच्च शिक्षित सुवर्णपदक विजेते होते असे असतानाही त्यांनी नोकरी लग्न न करता आपले संपूर्ण आयुष्य देश सेवेसाठी दिले आणि त्यांच्या नावाने हे सेवाकार्य आपण सुरू करतोय हे पाहून मला खूप आनंद झाला या माध्यमातून अडचणीत असलेल्या रुग्णांना भरपूर मदत होणार आहे. या रुग्णोपयोगी साहित्य केंद्राचा अधिकाधिक प्रचार करावा असे त्यांनी आवाहन केले आणि या साहित्य केंद्रासाठी कोणत्याही गोष्टीची आवश्यकता असल्यास मी आपल्या सोबत आहे असे आश्वासन त्यांनी दिले.

याशिवाय राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वाळूज जिल्हा संघचालक अनिल पाटील श्री साईबाबा मंदिर ट्रस्ट सचिव साहेबराव पाथरीकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कै. बालकृष्ण नाईक यांची पुतणी मेधा नाईक यांनी बाळकृष्ण नाईक यांच्या कार्याविषयी उपस्थितांना माहिती दिली या माहितीनंतर नाईक कुटुंबियांच्या सामाजिक कार्यातल्या योगदानाबद्दल श्रीमती विद्याताई नाईक यांचा सत्कार करण्यात आला.

लोकार्पण सोहळ्याचे सूत्रसंचालन कविता जगदाळे तर आभार प्रदर्शन मंदिर आयामाचे वाळूज प्रखंड सहप्रमुख संजीव जी तायडे यांनी केले.

महर्षी पाणिनी कन्या वेदपाठ शाळेतील मुलींनी म्हटलेल्या शांती पाठानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

या लोकार्पण सोहळ्यासाठी संपूर्ण नाईक कुटुंबीय, लक्ष्मण माने दामोदरजी घुगे,कैलास चव्हाण रामकृष्ण चव्हाण,ज्ञानेश्वर लबडे देवानंद पवार, शहाजी जगदाळे सह बजाजनगर परिसरातून आणि संभाजीनगर शहरातून मोठ्या संख्येत नागरिक बंधू-भगिनी उपस्थित होते.

# विभागीय लोकशाही दिनात २५ प्रकरणांवर सुनावणी

## प्रलंबित प्रकरणांचा तत्परतेने निपटारा करा - विभागीय आयुक्त दिलीप गावडे

छत्रपती संभाजीनगर दि.९: नागरिकांकडून प्रशासनाकडे येणाऱ्या तक्रार अर्जांवर विहित कालमर्यादेत कार्यवाही करण्यात यावी. प्रलंबित प्रकरणांचा तत्परतेने निपटारा करुन केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित तक्रारदारांना पत्राव्दारे कळविण्यात यावे, असे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी संबंधित विभागप्रमुखांना आज येथे दिले.

विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात विभागीय आयुक्त



श्री गावडे यांच्या अध्यक्षतेखाली आज लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे कामकाज पार पडले. त्यावेळी ते बोलत होते. उपायुक्त जगदिश मिनीयार, नायब तहसीलदार गजानन नांदगावकर यांच्यासह महसूल, पोलीस, कृषी, महापालिका, सहकार, भूमी अभिलेख, समाजकल्याण व ऊर्जा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

लोकशाही दिनात नव्याने दाखल पाच प्रकरणे व यापूर्वीचे वीस प्रकरणे अशा २५ प्रकरणांवर सुनावणी झाली. यापुर्वीच्या २९ प्रलंबित प्रकरणापैकी ९ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. आयुक्त श्री. गावडे यांनी तक्रारदारांचे म्हणने ऐकुण घेतले. तसेच प्रकरणांच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित विभागप्रमुखांना दिल्या. प्रत्येक प्रकरणामध्ये नियमाप्रमाणे तत्परतेने कार्यवाही करावी. पुढच्या लोकशाही दिनापुर्वी सर्व प्रकरणांचा निपटारा करा, असे निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले. कोणत्याही परिस्थितीत याबाबत प्रलंबितता राहता कामा नये, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी विभागातील जिल्हानिहाय सबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# कोहिनूर शिक्षण संस्था अध्यक्ष डॉ. ॲड. मोहम्मद मजहर खान साहेब यांच्या हस्ते अफरोज शेखचा सत्कार

तभा वूतसेवा

खुलताबाद , प्रतिनिधी कोहिनूर शिक्षण संस्था अध्यक्ष डॉ. ॲड मोहम्मद मजहर खान व संस्थेच्या सचिव श्रीमती डॉ.आस्मा मोहम्मद मजहर खान मॅडम यांच्या हस्ते कोहिनूर महाविद्यालयाचा गुणवंत विद्यार्थी अफरोज शेख यांची जिल्हा व सत्र न्यायालय , छत्रपती संभाजी नगर येथे कनिष्ठ लिपिक पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला व पुढील उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेला अशा विद्यार्थ्यांचा अभिमान वाटतो त्यांचे यश इतरांसाठी प्रेरणादायी



ठरो असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. यावेळी कोहिनूर शिक्षण संस्था कार्यकारिणी सहसचिव डॉ. ॲड मकसुद खान तसेच संस्थेच्या कोषाध्यक्ष श्रीमती यास्मिन मकसूद खान व हाफिस शब्बीर यांची उपस्थिती होती. अफरोज शेख या विद्यार्थ्याचे वर्ग अकरावी ते एम. एस्सी वनस्पतीशास्त्र पर्यंतचे सर्व शिक्षण कोहिनूर कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खुलताबाद येथे पुर्ण झाले आहे. तो सेवानिवृत्त शिक्षक अमीर शेख यांचा लहान मुलगा असून त्याची आई आशाबी शेख या गृहिणी आहेत.

# ग्राहक जागरण पंधरवाडा साजरा करण्यात यावा निवेदनाद्वारे मागणी

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.०९ डिसेंबर- ग्राहक जागरण दिन २४ डिसेंबर रोजी साजरा करण्यात येतो मात्र तो एक दिवस साजरा न करता २५ डिसेंबर ३१ डिसेंबर असा पंधरवडा साजरा करण्यात यावा अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायत कन्नड शाखेच्या वतीने दि. ९ डिसेंबर सोमवार रोजी तहसीलदार विद्याचरण कडवकर यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे

निवेदनात म्हटले आहे की,ग्राहकांना आवश्यक असलेली सर्व समावेशक गोष्टींची माहिती शहर तसेच ग्रामीण भागातील ग्राहकांपर्यंत पोहोचवावी या अनुषंगाने ग्राहक चळवळीतील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पथनाट्य, निबंध स्पर्धा, महिला मंडळ स्पर्धा, शेतकरी मेळावे या उपक्रमाद्वारे व्यापक जनसंपर्क करून ग्राहकाचे जनजागरण करावे तसेच सायबर फसवणूक डिजिटल अटक याविषयी ग्राहकांना माहिती द्यावी अशी मागणी

या निवेदनात करण्यात आली असून या निवेदनावर अखिल भारतीय ग्राहक पंचायती चे तालुका अध्यक्ष रोहित पिरथानी, उपाध्यक्ष सुनील जैन सचिव नंदकुमार शेजवळ यांच्यासह इतर सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# श्रीस्वामी समर्थ केंद्रात दत्तजयंती निमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताह प्रारंभ

## सलग चाळीस वर्षांपासून अखंड सप्ताह सोहळ्यात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.९ डिसेंबर:

श्रीस्वामी समर्थ सेवा केंद्र गंगापूर येथे श्री दत्त जयंतीच्या निमित्ताने अखंड नाम जप यज्ञ सप्ताह सोहळा साजरा करण्यात येत आहे.

सप्ताहमध्ये श्री गणेश याग, स्वामी याग चंडी याग रुद्र याग असे विशेष याग सह सकाळी महिला प्रहर सेवा व रात्री पुरुष प्रहर सेवा सुरू राहणार आहे.

यासप्ताह मध्ये सर्व सेवा





अखंड पणे सुरू राहणार आहे..

सप्ताह मध्ये ११२ सेवेकरी श्री गुरुचरित्र ग्रंथ पारायणास बसलेले आहे.

सप्ताहाचे यावर्षी ४० वे वर्ष असून यानिमित्ताने भरगच्च असे अध्यात्मिक सेवा कार्याचे आयोजन करण्यात आले आहेत श्री स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने भाविक भक्तांना सप्ताह मध्ये दर्शनासाठी जास्तीत जास्त भाविकांनी यावे. असे सेवा केंद्राच्या पंच कमिटीच्या वतीने अवाहन करण्यात आले आहे.सप्ताह सेवेकरिता जालना जिल्हा प्रमुख झुंजारराव पाटील काकडे, गंगापूर तालुका प्रतिनिधी गोपीनाथ प्रधान, कर सल्लागार शांतीलाल जाधव , याज्ञीकी संदीप काटकर, अमोल चौसाळकर, सुभाष कहाटे, सुनीता शर्मा, सुनीता सोळके, सायली धुमाळ, आदी सेवेकर्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# श्रीनाथ इंस्टीट्यूट ऑफ नर्सिंग येथे जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम साजरा

वाळूज महानगर ( प्रतिनिधी) जागतिक एड्स दिन जागतिक आरोग्य संघटना ( डब्ल्यू) आणि संयुक्त राष्ट्रांनी (युएन) च्या शिफारसीनंतर १९८८ मध्ये पहिल्यांदा साजरा केला गेला. श्रीनाथ इंस्टीट्यूट ऑफ नर्सिंग येथे एचआयव्ही/एड्स महामारीचा जगभरातील प्रभाव ओळखण्यासाठी सुंदर असे पथनाट्य सादरीकरण केले. या सदरीकरणामध्ये एचआयव्ही/ एड्स महामारीचा जगभरातील प्रभाव ओळखण्यासाठी, लोकांना शिक्षित करण्यासाठी आणि एचआयव्ही बाधित लोकांसाठी वकिली करण्यासाठी या दिवसाची स्थापना करण्यात आली. जगभरात जास्तीत जास्त सहभागी



होण्यासाठी तारीख निवडली गेली आणि लाल रिबन रोगाने प्रभावित झालेल्यांसाठी एकतेचे प्रतीक बनले. प्रत्येक वर्षी, एड्स मुक्त जगासाठी लढण्यासाठी वकिली आणि जागरूकता ही थीम लक्ष्यित केली जाते. २०२४ ची थीम आहे हक्काचा मार्ग घ्या: माझे आरोग्य, माझा हक्क! डब्ल्यूएचओ जगभरातील नेत्यांना आणि नागरिकांना एड्सच्या अंताची जाणीव होण्यास प्रतिबंध करणाऱ्या असमानता दूर करण्यासाठी आणि सर्वांच्या आरोग्याचा हक्क सांगण्यासाठी कृती करण्याचे आवाहन करते. हे लोकांना एचआयव्हीच्या बाबतीत, प्रतिबंध आणि त्यावर उपचार कसे करावे यासह शिक्षित करण्याची संधी देते. एचआयव्ही चाचणीपूर्वी आणि नंतर व्यावसायिक समुपदेशकांद्वारे समुपदेशन अत्यंत महत्वाचे आहे. अहवालाची गोपनीयता राखणे आणि रुग्णाला उपचार, सावधगिरी आणि भविष्यातील काळजीबद्दल माहिती देणे महत्वाचे आहे. ह्या सर्वा बाबी या पथनाट्य द्वारे सादर करण्यात आले. तसेच जागतिक एड्स दिन निमित्त विविध स्पर्धा रंगोली स्पर्धा, निबंध स्पर्धा व पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

या कार्यक्रमाचे समारोपण भारतीय ग्रामीण पुनर्रचना संस्थेचे सचिव एकनाथ जाधव हर्षला जाधव, सहसचिव अमन जाधव , प्राचार्य डॉ. संतोष शेळके, यांनी केले व प्रशासकीय अधिकारी भागचंद जाधव, शिक्षक सोनाली पाटोळे, रूपाली तांबे व प्राची मंडलिक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. तसेच जागतिक एड्स दिन जनजागृती रॅलीही आयोजित करण्यात आली होती.

# एमजीएम ऑलिंपिकला मंगळवारी सुरुवात

## मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार उद्घाटन सोहळा

छत्रपती संभाजीनगर, दि. ९ : महात्मा गांधी मिशनच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त यावर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून एमजीएम विद्यापीठाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे एमजीएम ऑलिंपिकचे आयोजन करण्यात आले आहे. एमजीएम ऑलिंपिकचा उद्घाटन सोहळा मंगळवार, दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता एमजीएम स्टेडियम येथे संपन्न होणार आहे. या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा हे उपस्थित राहणार आहेत.

दरवर्षी एमजीएम संस्थेंतर्गत असणाऱ्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'एमजीएम ऑलिंपिक' अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असते. यावर्षीच्या स्पर्धा मंगळवार, दिनांक १० डिसेंबर २०२४ ते गुरूवार दिनांक १२ डिसेंबर २०२४ दरम्यान एमजीएम स्टेडियम येथे संपन्न होणार आहेत. या स्पर्धेत एमजीएम संस्थेच्या नांदेड, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर येथील महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

'एमजीएम ऑलिंपिक' स्पर्धेत यावर्षी खालील क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे.

मैदानी खेळ : बास्केटबॉल, फुटबॉल, हॉलीबॉल, थ्रो बॉल, कबड्डी, स्विमिंग, खो - खो.

अंतर्गेही खेळ : बॅटमिंटन

ॲथलेटिक्स खेळ : जेव्हलीन थ्रो, शॉट पूट, डिस्कस थ्रो, १०० मी रन, २०० मी. रन, ४०० मी रन

'एमजीएम ऑलिंपिक' स्पर्धेची सर्व तयारी झाली असून उत्साहपूर्ण वातावरणात सर्व क्रीडा स्पर्धा पार पडतील, असे आयोजकांनी सांगितले आहे. यावेळी एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, सचिव अंकुशराव कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, खेळाडू व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# विज्ञान प्रदर्शन उद्घाटन व विश्वधरोहर सप्ताहचे बक्षीस वितरण

## जैन तीर्थ संरक्षिणी महासभेच्या वतीने विश्व धरोहर सप्ताह व प्रदूषण मुक्त दिवाळी निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला व निबंध स्पर्धेच्या बक्षीस वितरणाचा सोहळा संपन्न

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : गुरुदेव समंतभद्र विद्या मंदिर मधे खुलताबाद तालुका शिक्षण विभाग यांच्यावतीने विज्ञान प्रदर्शनाचे भव्य उद्घाटन , श्री भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थ संरक्षिणी महासभेच्या वतीने विश्व धरोहर सप्ताह व प्रदूषण मुक्त दिवाळी निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला व निबंध स्पर्धेच्या बक्षीस वितरणाचा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला, विश्व धरोहर सप्ताह निमित्ताने घेण्यात आलेल्या स्पर्धेत प्राथमिक गटातून तनवी राजेंद्र मिसाळ, ईकरा नईम शेख, आरव चंद्रकांत भालेराव तर माध्यमिक विभागातून साहिल अशोक मोघे, श्रेया नागेश झारेकर, मनस्वी सुरेश मुठे या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले, प्रदूषण मुक्त दिवाळी चित्रकला स्पर्धेत प्राथमिक गटातून समृद्धी समाधान मोरे, शहीद जुबेर शेख, सबा सर्वर शेख तर माध्यमिक विभागातून साहिल अशोक मोघे, छाया शिवाजी चौरे, वैष्णवी कैलास पांडव यांना पाहुण्याच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले यावेळी आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानी पार्श्वनाथ ब्रह्मचर्य आश्रम जैन गुरुकुल चे मार्गदर्शक वर्धमान पांडे हे होते,



खुलताबाद तालुका शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी मा श्री केवट साहेब हे चित्रकला प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी उपस्थित होते. यावेळी विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग चे विभागीय अधीक्षक मा श्री डॉ शिवकुमारजी भगत यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी तीर्थ संरक्षिणी महासभेचे महामंत्री महावीर ठोले, संस्थेचे कोषाध्यक्ष गौतमचंद ठोळे,अशोक पान्डे, पुरातत्व संयोजक अजित लोहाडे, राजकुमार कासलीवाल,संतोष पापडीवाल, निर्मलकुमार ठोले,प्रकाश राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती। अध्यक्ष दिनेश गंगवाल व सचिव डॉ प्रेमचंद पाटणी यांच्या मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला प्रशालेच्या वतीने निलेश सुभाष सारंगे व पायल बाबुराव सूलाने यांनी परिपाठा अंतर्गत संविधान व प्रतिज्ञा सादर केली. प्रशालेचे मुख्याध्यापक गुलाबचंद बोराळकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आपल्या प्रास्ताविका मधून विज्ञानाची आवश्यकता या विषयावर त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले, तसेच प्रशालेची विद्यार्थिनी गुंजन ठोकळ हिने विश्व धरोहर सप्ताह चे महत्त्व आपल्या मनोगतातून व्यक्त केले. विश्वधरोहर सप्ताह निमित्ताने प्रशालेत निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धेचे आयोजन वीरेंद्र वाकळे ,महेंद्र वाकळे, राजकुमार नरखडे, शोभा देशमाने यांच्या प मार्गदर्शनात करण्यात आले होते. या स्पर्धेत प्रशालेच्या वतीने एकूण १२० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेचे शिक्षक डॉ सुकुमार नवले, सुहास मिश्रीकोटकर, अंकुश ठोळे, प्रतिभा गंगवाल, सचिन अन्नदाते, प्रतीक्षा जैन, आशिष कान्हेड, पारस जैन, दीपक जैन व सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. विज्ञान प्रदर्शनी साठी खुलताबाद तालुक्यातून पंधरा शाळेनी सहभाग नोंदविला होता.

प्राथमिक गटातून प्रथम चि. सोहम बाबासाहेब बांबोडे जि प प्रशाला बाजार सावंगी, द्वितीय कु.ऋतुजा कैलास, जि प प्रशाला गोळेगाव ,तृतीय कु. जयश्री वाकचौरे सद्गुरू जनेश्वर विद्यालय घोडेगाव माध्यमिक विभागामध्ये प्रथम यश आप्पासाहेब हरणे जि प प्रशाला राजाराय टाकळी, द्वितीय अकिब मुक्तार शेख कैलास विद्यालय बोडखा, तृतीय रवी रामहरी गायकवाड महाराज सयाजीराव गायकवाड विद्यालय दरेगाव तर शैक्षणिक साहित्य शिक्षक प्राथमिक विभाग यामध्ये श्री दीपक जैन सर, माध्यमिक शिक्षक साहित्य निर्मितीमध्ये श्री पि.डी सोनार सर तर प्रयोगशाळा सहाय्यक या गटामध्ये प्रतीक्षा जैन याची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झालेली आहे अशी माहीती पियुष कासलीवाल नरेंद्र अजमेरा यांनी दिली

# ऑटो चालकास जातीवाचक शिवीगाळ व मारहाण करणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली,दि. ०९ डिसेंबर :** बोलेरो पिकप वाहनाने ऑटोला धडक देत उलट ऑटो चालकालाच जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण करणाऱ्या विरुद्ध हिंगोली शहर पोलीस ठाण्यात ट्रॉसिटी क्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिंगोली तालुक्यातील संतुक पिंपरी येथील गोपीनाथ संभाजी काशीदे हे दि. ६ डिसेंबर रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास त्यांचा प्रवासी ऑटो घेऊन संतुक पिंपरीकडे जात असताना हिंगोली शहरातील बस्थानकाजवळ पाठीमागून येणाऱ्या बोलेरो पिकप क्रमांक एम. एच. ३८ एक्स ०५४९ चे चालक शुभम शिंदे यांनी त्यांच्या आटोला ओव्हरटेक करण्याच्या नादातऑटोला धडक दिली. या धडकेत ऑटोचे नुकसान झाल्याने ऑटो चालक गोपीनाथ काशिदे यांनी जाब विचारला असता बोलेरो पिकप चालक शुभम शिंदे यांनी उलट ऑटो चालक गोपीनाथ काशिदे यांनाच मारहाण केली. तसेच मारहाण करण्यापासून रोखणाऱ्या अन्य प्रवाशांनाही दमदाटी केली. तसेच जातीवाचक शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. या महाराणीत गोपीनाथ काशिदे जखमी झाले. त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले. याप्रकरणी गोपीनाथ काशिदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शुभम शिंदे यांच्या विरोधात हिंगोली शहर पोलीस ठाण्यात ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त देगलूर येथे ८७ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ०९ डिसेंबर :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देगलूर येथील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा येथे वंचित बहुजन आघाडी व सुशिलकुमार देगलूरकर मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. माजी नगरसेवक तथा पँथर फोर्स संघटना प्रमुख सुशीलकुमार देगलूरकर यांनी १० वर्षापूर्वी महापरिनिर्वाण दिनानिमित्त रक्तदान शिबिराची सुरुवात केली होती. त्यानंतर आजतागायत हे रक्तदान शिबिराचा उपक्रम सुरू आहे. पहिल्या वर्षापासून ते आजपर्यंत नेहमी सातत्याने शेकडो युवक मोठया प्रमाणात व उत्स्फूर्ततेने रक्तदान करतात याही वर्षी या रक्तदान शिबिरात ८७ रक्तदात्यांनी रक्तदान केले यावेळी माजी नगरसेवक सुशिलकुमार देगलूरकर, तहसीलदार भारत सूर्यवंशी, मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, निवृत्ती कांबळे, डॉ. विनायक मुंडे, मच्छिन्द्र गवाले, डॉ.उत्तम इंगोले, संजय कांबळे, रमेश भायेगावकर, अशोक देसाई दरेगावकर, अशोक कांबळे, मन्मथ परबते, आदी मान्यवर उपस्थित होते महारक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी स्वप्नील देगलूरकर, प्रथ्वीराज वाघमारे, अभिनंदन खानापूरकर, अभिजित वाघमारे, निवृत्ती दिंडे, रत्नदिप सूर्यवंशी, कमलाकांत नरबागे, नितीन वाघमारे, नागेश लोहबंदे, चंद्रकांत मरखेलकर, प्रशांत माळे, सुरेश बकरे, सुरज वाघमारे, गौतम वाघमारे, अंतेश्वर बोने, आर्यन धनवे, निशिकांत कांबळे, प्रवीण कांबळे, आकाश वाघमारे, माधव कांबळे, सुनील शेरे, संजय कांबळे, अक्षय टेकाळे, डॉ.मारोती कांबळे, अभिजित कांबळे, विठ्ठल सुंडगीकर, यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## महामानवास रक्तदान करून कृतिशील अभिवादन

# स्ट्राँग गोल्ड ब्लू फाऊंडेशनचा उपक्रम, ७५६ आंबेडकरी अनुयायांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ डिसेंबर**

प्रज्ञासूर्य, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना रक्तदान शिबिर व अन्य सामाजिक उपक्रम राबवून स्ट्राँग गोल्ड ब्लू फाऊंडेशन नांदेड तर्फे संस्थापक अध्यक्ष रवी राजीव भोकरे व सचिव स्वाती बालाजी दुधमल यांच्या सहकाऱ्यांनी कृतिशील अभिवादन केले. मागील १६ वर्षांपासून दरवर्षी हा कार्यक्रम घेतला जातो.



महापरिनिर्वाण दिनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात दिवसभर अभिवादन गीत गायनाचा कार्यक्रम झाला. याच मंडपात ७५६ हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करून डॉ. बाबासाहेब यांना कृतिशील अभिवादन केले. तसेच स्ट्राँग गोल्ड ब्ल्यू फाऊंडेशन तर्फे नांदेड जिल्ह्यातील २३५ श्रद्धांजलीपर गीत गायन, वादनकर्ते यांना मफलर, कालवश रुक्मीनबाई गोणारकर सन्मानचिन्ह, सन्मानपत्रासह सन्मानित करण्यात आले. तसेच तृतीयपंथांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी सुप्रसिद्ध गायक चैतन्यकुमार चोपडे, कु. नालंदा सांगवीकर, क्रांतिकुमार पंडित, सौ. सुरेखा पाटील, सुनील लामटिळे, आकांक्षा मोतेवार, पवन चौदंते यांचा फाऊंडेशनच्या वतीने रवी भोकरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन यथोचित सन्मान केला.

रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती, स्वेटर, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. रक्तदान शिबिरास खा. रवींद्र चव्हाण, जिल्हाधिकारी अभिजित राऊत, पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, शिक्षणाधिकारी सविता बिरगे, सुभाष काटकांबळे, भगवान गायकवाड यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील प्रमुखांनी भेट दिली. यासर्वांचा रवी भोकरे यांनी सन्मान केला. या नीटनेटक्या आणि शिस्तबद्ध कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवेदक अमोल खरात, पृथ्वी भंडारे यांनी केले.

# व्हाईस ऑफ मीडियाच्या तालुका माहुरच्या अध्यक्षपदी विजय आमले तर उपाध्यक्षपदी फिरोज पठाण!



**तभा वृत्तसेवा**
**माहूर दि.०९ डिसेंबर** : व्हाईस ऑफ मीडिया तालुका माहुर शाखेची बैठक दिनांक ४ऑक्टोंबर २०२४रोजी स्थानिक एकविरा धाम येथे जिल्हाध्यक्ष डॉ.गणेश जोशी यांच्या अध्यक्षतेखाली तर राज्य सरचिटणीस श्रीनिवास भोसले जिल्हा कार्यकारिणी सदस्य अविनाश चमकुरे, डॉ.प्रविणकुमार सेलुकर, भगवान सुर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली याबैठकीत विजय आमले यांची सर्वानुमते हात वर करून लोकशाही पद्धतीने दुसऱ्यांदा तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली तर,उपाध्यक्षपदी फिरोज पठाण, सचिवपदी संजय बनसोडे यांची निवड करण्यात आली.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते नुतन तालुका अध्यक्ष विजय आमले यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी पत्रकार जयंत गिरे,सचिन बेहरे, निखिल कोरडे, महीला पत्रकार सौ.सुरेखा तळणकर, सय्यद किरमाणी, दैनिक लोकमतचे तालुका प्रतिनिधी नितेश बनसोडे, गजानन कुलकर्णी उपस्थित होते. तालुका अध्यक्षपदी बिनविरोध निवड केल्याबद्दल विजय आमले यांनी मान्यवरांचे तसेच सर्व सदस्यांचे आभार मानले.

# आ. कदम यांचा कोळी येथे नागरी सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**निवघा(बा),दि. ०९ डिसेंबर**

तालुक्यातील कोळी येथे आज रोजी नवनिर्वाचित आ बाबूरावजी कदम कोहळीकर यांचा भव्य सत्कार आयोजित केला होता त्यानिमित्ताने कोळी नगरीतील लाडक्या बहिणी व तरुण मंडळीने नगर भोजनाची व्यवस्था केली होती त्याचबरोबर रक्तदान शिबिर ही या ठिकाणी संपन्न झाले यावेळी हदगाव तालुक्यातील संपूर्ण शिवसैनिक या ठिकाणी आमदार बाबुरावजी कदम यांच्या सत्कारासाठी कोळी नगरीमध्ये उपस्थित झाले होते. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, गोपाल सारडा अनिल पाटील बाभळीकर आनंद भंडारे, प्रताप सोळुंके बबन कदम, संभाराव लांडगे, संदेश पाटील, शेखर पाटील, राजू चौतमाल, परमेश्वर चौतमाल, भागवत चौतमाल, रित्विक कदम, कृष्णा चौतमाल आणि कार्यकर्ते या ठिकाणी उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. कोहळीकर म्हणाले की माझा शपथविधी हा आज होता परंतु कोळी नगरीतील कार्यक्रमामुळे मी शपथविधी हा कालच करून घेतला त्यामुळेच आज मी या कार्यक्रमाला येऊ शकलो कोळी नगरीतील नागरिकाचे प्रेम पाहता बाबुराव कदम

**आता आपले चांगले दिवस आले आहेत आ बाबुरावजी पाटील कोहळीकर यांच्या निमित्ताने एक चांगला नेता आपल्याला भेटलेला आहे त्यामुळे विकास आणि विकास होणार यात काही मात्र शंका नाही आणि जेवढा जास्त आपल्या गावाचा विकास होईल याकडेही ध्येय असणार आहे येणाऱ्या काळामध्ये गावाचा विकास हा आमदार साहेबाकडून होणार आहे यातही काही शंका नाही.**

यांनी झुकते माप दिले असल्याचेही बोलले जात आहे पुढे बोलताना ते म्हणाले की मी पाच वर्ष तुमचा सालगडी म्हणूनच काम करणार आहे अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. परंतु लाडक्या बहिणीचे प्रेम पाहून आ बाबुरावजी कदम कोहळीकर यांच्या डोळ्यातून आनंदाचे अश्रू वाहू लागले होते हे सर्व नी पाहिले आहे. माझ्या बहिणीचे प्रेम मी कदापिही विसरू शकणार नाही असेही ते बोलले. शपथविधीनंतर हा माझा पहिलाच सन्मान आहे आणि गावकऱ्यांच्या प्रेमामुळे मी मुंबईहून थेट कोळी गावात आलो आहे असेही ते बोलले. येणारा काळामध्ये सर्वांना सोबत घेऊन आपल्याला काम करायचं आहे आणि हदगाव हिमायतनगर तालुक्याला एक ओळख निर्माण करून द्यायचं माझं स्वप्न आहे आणि साकार करण्यासाठी तुमची साथ हवी आहे अशीही ते बोलले. हदगाव तालुक्यात अनेक योजना मी राबवणार आहे त्यामध्ये प्रामुख्याने जलसिंचन आरोग्य आणि तरुण पिढीला हाताला काम हे मुद्दे घेऊन मी सध्या तरी काम करीत आहेत असेही ती बोलले तालुक्यामध्ये नव तरुणांच्या हाताला काम देण्याचे कार्य माझ्या हातून व्हावे हेही ते यावेळी बोलले मी सर्व समाजासोबत राहील आणि सर्वांना एकजूट करून मी सर्वांचे प्रश्न मार्गी लावील अशी गवाही त्यांनी यावेळी दिली यावेळी कोळी नगरीतील तरुणांचे सुद्धा त्यांनी आभार मानले एवढा भव्य दिव्य कार्यक्रम या ठिकाणी साजरा केला नगर भोजन त्याचबरोबर रक्तदान शिबिर असे अनेक विविध कार्यक्रम आपण या ठिकाणी साजरे केले त्याबद्दल नवतरुणांची त्यांनी कौतुक केले.

यावेळी आमदार बाबुरावजी कदम कोहळीकर यांचा सत्कार ग्रामपंचायत कोळी यांच्यामार्फत करण्यात आला. त्यावेळी सरपंच प्रा. डॉ. संजय कदम उपसरपंच संतोष चौतमाल ग्रामपंचायत सदस्य संदीप सोनुले गजाजन डेंगळे चंद्रकांत राऊत शिपाई विठ्ठल जाधव हेही उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील नवतरुण व शिवसेनेत यांनी परिश्रम घेतले आहे.

# श्री दत्तगडावर घटस्थापनेने आजपासून श्री दत्त जन्मोत्सवास सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि.०९ डिसेंबर**

दरवर्षी प्रमाणे यंदाही श्री दत्त संस्थान शिखर,माहूरगड येथील श्री दत्त जन्मोत्सव सोहळा ०८ ते १७ डिसेंबर या कालावधीत साजरा केला जाणार असून, मिती मार्गशीर्ष शु.०७ रविवार दिनांक ०८ डिसेंबर रोजी सर्वतीर्थावर प्रथम अभिषेक पूजा करून घटस देवतेला प.पू.महंत महाराज यांच्या हस्ते बेलपत्र वाहून त्यांच्या उपस्थितीत घटस्थापना पार पडली.विधिवत पूजा अर्चा करून घटस्थापना व सर्वतिर्थावर जाऊन निशान पूजनाने आजपासून श्री दत्त जन्मोत्सवास सुरुवात झाली.



परमपूज्य महंत श्री मधुसूदन गुरू अच्युत भारती महाराज यांचे प्रतिनिधी मुख्य पुजारी वासुदेव भारती महाराज, हरिअर भारती महाराज, धनराज भारती महाराज ही सर्व महापुरुष मंडळी निशाण घेऊन दत्तगड पायथ्याजवळील सर्वतीर्थावर जाऊन घटस्थापना देवतेला कलशाला अभिषेक करून निशाण घेऊन परत दत्तशिखरला आले. यावेळी मुख्य पुजारी वासुदेव भारती महाराज यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला.त्याचे पौरोहित्य रवींद्र जोशी,ऋषिकेश जोशी यांनी केले.यावेळी साधु संत मंडळी व संस्थानचे सर्व उत्सव कर्मचारी उपस्थित होते.

श्री दत्त संस्थान शिखर,माहूरगड येथे श्री दत्त जन्मोत्सव सोहळा रविवार दि.०८/१२/२०२४ ते मंगळवार दि.१७/१२/२०२४ पर्यंत.. साजरा करण्यात येणार आहे. या कालावधीत संस्थानच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे व येथे चित्रे निमित्ताने येणाऱ्या लाखो भाविकांसाठी भंडारा, अन्नदान, महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. मिती मार्गशिर्ष शु.०७ रविवार दि.०८/१२/२०२४ रोजी घटस्थापना व निशान पुजा सर्वतिर्थ येथे करण्यात आली. मार्गशिर्ष शु.११ (एकादशी) बुधवार दि.११ रोजी श्री दत्त महाराजांची पहिली पालखी पु. महंत महाराजाच्या उपस्थितीत पालखी सोहळ्याची सुरूवात होणार असून, एकादशीला पालखी झाल्यानंतर देवकते महाराज व संच (छत्रपती सभांजीनगर) यांच्या किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मार्गशिर्ष शु.१२ (व्दादशी) गुरूवार दि.१२ रोजी श्री दत्त महाराजांची दुसरी पालखी व कासवा समोर देवकते महाराज व संच यांचा किर्तन सोहळा होणार आहे.

मार्गशिर्ष शु.१३ (त्रयोदशी) शुक्रवार दि.१३ रोजी श्री दत्त महाराजांची तिसरी पालखी गादी जवळ संच देवकते महाराज व संच यांचा किर्तन सोहळा होणार आहे. मार्गशिर्ष शु. १४ (चतुर्दशी) शनिवार दि. १४ रोजी श्री दत्त महाराजांचा अभिषेक प. पु. महंत महाराजांच्या हस्ते व सभामंडपामध्ये दत्त जन्म सोहळा व किर्तन व दत्त जन्म अध्याय वाचन ऋषिकेश जोशी माहूर व देवकते महाराज व संच श्री दत्त महाराजाची (चौथी पालखी), मार्गशिर्ष शु. १५ (पौर्णिमा) रविवार दि.१५ रोजी श्री दत्त महाराजांची पाचवी पालखी (पौर्णिमा), सोमवार दि.१६ रोजी प.पु. महंत महाराजाच्या उपस्थितीत कार्यक्रम दहिहांडी सोहळा व किर्तन सोहळा राधा, कृष्ण, बळीराम, मंगळवार दि.१७ रोजी प.पु. महंत महाराजांच्या उपस्थितीत सकाळी ६ वा. काकडा आरतीने या श्री दत्त जन्मोत्सवाची सांगता होणार आहे.

# नांदेड जिल्हा निर्यातक्षम केळी उत्पादक शेतकऱ्यांचा हब बनविणार : अभिजीत राऊत

## मॅग्रेट प्रकल्प अंतर्गत केळी उत्तम कृषी पद्धती या विषयावर प्रशिक्षण संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ डिसेंबर**

अलिकडच्या काळात शेतकऱ्यांनी पारंपारिक पीक पद्धती सोडून निर्यातक्षम केळी उत्पादकतेवर भर द्यावा. तसेच शेतीसह शेतमाल प्रक्रिया उद्योगाकडे वळावे. उत्पादित केलेला पक्का शेतमाल निर्यात करण्याकडे भर द्यावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले.



जिल्हा नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतेच सहकार व पणन विभाग अंतर्गत आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र ऍग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्रेट) प्रकल्प अंतर्गत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे, कृषी व आत्मा विभाग नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने केळी उत्तम कृषी पद्धती या विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास मॅग्रेट प्रकल्प पुण्याचे अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, प्रकल्प संचालक आत्मा शिरफुले, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणेचे मनुष्यबळ विकास तथा वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी हेमंत जगताप, प्रकल्प उपसंचालक मॅग्रेट लातूर महादेव बरडे, विभागीय प्रकल्प अधिकारी मॅग्रेट, केळी संशोधनाचे प्रभारी अधिकारी डॉक्टर शिवाजी शिंदे, पोखर्णी कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. देविकांत देशमुख, संचालक के डी एक्सपोर्ट सोलापूर किरण डोके, उपसरव्यवस्थापक महाकृषी शेतकरी उत्पादक कंपनी सोलापूर नरहरी कुलकर्णी, बारड शितलादेवी शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष निलेश देशमुख, बारडकर, हिरकणी बायोटेकचे रत्नाकर देशमुख, विभागीय अधिकारी सोमनाथ जाधव, गजेंद्र नवघरे, अक्षय हातागळे आदी उपस्थित होते.

मॅग्रेट प्रकल्पा अंतर्गत नांदेड, परभणी व हिंगोली या तीनही जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी केळी निर्यातीसाठी मॅग्रेट प्रकल्पांतर्गत आवश्यक ती सर्व मदत केली जाईल असे मॅग्रेट प्रकल्पाचे अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव यांनी आश्वासित केले. केळी निर्यातीसाठी आवश्यक ती सर्व मदत, त्यासाठी लागणारी ऑनलाइन नोंदणी याविषयी कृषी विभाग मार्गदर्शन व मदत करेल असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी सांगितले. एमसीडीसीला लातूर विभागामध्ये केळी पिक प्रशिक्षण घेण्यासाठी मॅग्रेट प्रकल्पाने संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रकल्पाचे हेमंत जगताप यांनी आभार मानले. किरण डोके यांनी निर्यातक्षम केळी पीक लागवड तंत्रज्ञानातील विविध बारकावे समजून सांगितले . निलेश देशमुख यांनी निर्यातक्षम केळी पिकाची वाव व संधी याविषयी मार्गदर्शन केले. नरहरी कुलकर्णी यांनी केळी लागवडी मधील खत व पाणी व्यवस्थापन व निर्यातक्षम उत्पादन याविषयी मार्गदर्शन केले. गणेश पाटील यांनी ग्लोबल गॅप प्रमाणिकरण व फ्रुट केअर योजना याविषयी सविस्तर माहिती दिली. लिंग समानता व सामाजिक समावेशन याविषयी अक्षय हातागळे यांनी माहिती दिली. या कार्यक्रमासाठी नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यातील ३५० हून अधिक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला.

# कवी साईनाथ रहाटकर 'साहित्य सखा' पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ डिसेंबर :** येथील यशवंतराव चव्हाण विचार मंचच्या वतीने मराठीतील नवोदित कवी साईनाथ रहाटकर दगडगांवकर यांना दि.८ डिसेंबर रोजी साहित्य सखा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.रहाटकर हे निखळ भावनेने मराठी भाषेची साहित्य सेवा करीत असून राज्यातील अनेक साहित्यिकांशी स्नेहबंध जोडून आहेत.साहित्य चळवळीला समर्पित भावनेने वाहून घेतलेल्या या युवा कवीचा यशवंतराव चव्हाण विचार मंचच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक डॉ.जगदीश कदम आणि कवी देवीदास फुलारी यांच्या हस्ते शाल,पुष्पहार, सन्मानचिन्ह आणि ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी विचार मंचचे अध्यक्ष प्रा.नारायण शिंदे,परभणी येथील साहित्यिक केशव वसेकर,अनुवादक भीमराव राऊत, प्रकाशक निर्मलकुमार सूर्यवंशी,कवी महेश मोरे, डॉ भगवान अंजनीकर,कवी गीतकार जाफर आदमपूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# पत्रकार संरक्षण समितीच्या देगलूर तालुकाध्यक्षपदी शेख असलम यांची नियुक्ती



**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ०९ डिसेंबर**

पत्रकार संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष विनोद पत्रे यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष महेंद्र गायकवाड यांनी पत्रकार संरक्षण समितीच्या देगलूर तालुकाध्यक्ष पदी युवा पत्रकार शेख असलम यांची नियुक्ती करण्यात करण्यात आली.

पत्रकार संरक्षण समिती हि संपूर्ण राज्यात शहरी व ग्रामीण भागातील पत्रकारांच्या न्याय, हक्कासाठी लढा देत असून नांदेड जिल्ह्यात हि पत्रकार संरक्षण समितीचे मोठे कार्य आहे. जिल्ह्यात शहरी व ग्रामीण भागातील पत्रकारांच्या अडीअडचणी सोडविण्याचे काम पत्रकार संरक्षण समिती करीतआहे. संपूर्ण जिल्ह्यात समितीने नवीन पदाधिकाऱ्यांची निवड केली असून देगलूर येथील युवा पत्रकार शेख असलम यांची देगलूर तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष महेंद्र गायकवाड यांच्या हस्ते हि निवड करण्यात आली आहे. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते नामदेव कांबळे, पत्रकार कुलदीप सूर्यवंशी, पत्रकार रियाज अत्तार, यांची उपस्थिती होती. पत्रकार संरक्षण समितीचे जिल्हासचिव शशिकांत पाटील गाडे, सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष आशिष देशपांडे, जिल्हासहसचिव शेख रफिक यांच्यासह अनेकांनी शेख असलम यांच्या निवडीचे अभिनंदन केले आहे.

# संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती मुदखेड येथे मोठ्या उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०९ डिसेंबर**

शहरात दि. ८ डिसेंबर रोजी संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती सर्व धर्मातील राजकीय पक्षांचे नेते तसेच प्रमुख पदाधिकारी व तालुक्यातील नागरिक यांच्या उपस्थितीत संताजी जगनाडे महाराज यांच्या जयघोषात साजरी करण्यात आली. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी तेली समाजाच्या वतीने संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. या जयंतीला जिल्हाध्यक्ष बी आर कदम, कार्याध्यक्ष बालाजी चव्हाण, तिरुपती पाटील कोंडेकर, भगवानराव मनूरकर, माधवराव पवळे, तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, शहराध्यक्ष कैलास गोडसे, राम कुलूपवार, गंगाधर पगीरवार, बजरंग पिन्नलवार, मोहम्मद गौस,नागेश शिवाजी पिन्नलवार, महेश पिन्नलवार, करीम खान, मुजिब पठाण, संदीपकुमार देशमुख, माधव हामंद, साहेबराव गोरखवाड, ईश्वर पिन्नलवार, सुरेश सूर्यवंशी, आकाश सोनटक्के, संजय बोकेफोड, दादाराव पाटील, बळवंत पाटील, सूर्यकांत चौदंते, अविनाश चौदंते, यशवंत रानखांबे, अब्दुल रजाक, भगवान पवार, राजेश पवार, रमेश बोडके, अविनाश हटकर, बालाजी गुळेवाड, प्रशांत पाटील, शिवाजी वडजे, युसूफ भाई, अश्फाक मौली, मोईन फुलवाले अनिल कल्याणे आदी उपस्थित होते.

# सुलोचनाबाई मुंडे यांचे निधन



**किनवट-** तालुक्यातील मांडवा येथिल सुलोचनाबाई संतराम मुंडे (वय वर्ष ७२) यांचे ८ डिसेंबर रोजी सायंकाळी हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन असून आज (सोमवार-९ नोव्हेंबर) दुपारी ३ वाजता त्यांच्या पार्थीवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. गोवर्धन मुंडे यांनी अग्नीसंस्कार केले. त्यांच्या पश्चात तीन मुलं, सुना, नातवंड असा परिवार आहे. सुलोचनाबाई मुंडेंना ८ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी हृदय विकाराचा झटका आल्याने त्या गतप्राण झाल्यात. सुलोचनाबाई ह्या दिल्ली येथिल राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाचे वरीष्ठ अन्वेशक गोवर्धन मुंडे, सत्यनारायण मुंडे आणि वसंत मुंडे यांच्या त्या मातोश्री आहेत. मुंडे बंधूंचे वडील स्व.संतराम मुंडे यांचे ८ डिसेंबर २००२ रोजी निधन झाले होते. आणि ८ डिसेंबर २०२४ रोजी त्यांच्या आई सुलोचनाबाईंना देवाज्ञा झाली, ८ तारीख आणि डिसेंबर महिन्याचा योगायोग आलाय. अंत्ययात्रेस प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता.

# मुदखेडमध्ये एतच् विरोधात काँग्रेसची स्वाक्षरी मोहीम

## लोकशाही वाचविण्यासाठी 'मत पत्रिके'ची मागणी, ५० हजार स्वाक्षरीचा निर्धार

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०९ डिसेंबर**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने राज्यात लोकशाही वाचविण्यासाठी एतच् हटाओ स्वाक्षरी मोहिम राबविली जात असून याच धर्तीवर मुदखेड तालुक्यात एतच् हटविण्यासाठी ५० हजार स्वाक्षरीचा संकल्प काँग्रेस कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे. या मोहिमेची सुरवात मुदखेड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने दि.०८ डिसेंबर रोजी शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकातून करण्यात आली आहे.



लोकसभा निवडणूक असो की, महाराष्ट्र तथा हरियाणा विधानसभा निवडणुक असो यांच्या निकालात झालेला संख्यात्मक गोंधळ आणि निवडणूक आयोगाकडून न मिळणारी समाधानकारक उत्तरे यामुळे देशात एतच् विरोधात मोठा रोष व्यक्त होत आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस खा राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने महाराष्ट्रात एतच् हटाओ स्वाक्षरी मोहिम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, आ अमित देशमुख यांच्या आदेशाने प्रत्येक जिल्ह्यात एतच् विरोधात स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यात मुदखेड तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने 'एतच् हटाओ देश बचाओ' स्वाक्षरी मोहिमेचे आयोजन डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात करण्यात आले होते. यावेळी जिल्हाध्यक्ष बी आर कदम, कार्याध्यक्ष बालाजी चव्हाण, तिरुपती पाटील कोंडेकर, भगवानराव मनूरकर, माधवराव पवळे, तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, शहराध्यक्ष कैलास गोडसे, कार्याध्यक्ष मोहम्मद गौस, मुजिब पठाण, संदीपकुमार देशमुख, माधव हामंद, साहेबराव गोरखवाड, सुरेश सूर्यवंशी, आकाश सोनटक्के, संजय बोकेफोड, दादाराव पाटील, बळवंत पाटील, सूर्यकांत चौदंते, अविनाश चौदंते, यशवंत रानखांबे, अब्दुल रजाक, भगवान पवार, राजेश पवार, रमेश बोडके, अविनाश हटकर, बालाजी गुळेवाड, प्रशांत पाटील, शिवाजी वडजे, युसूफ भाई, अश्फाक मौली, मोईन फुलवाले अनिल कल्याणे आदी उपस्थित होते.

लोकप्रतिनिधी कायदा १९५१ कलम ६१ मध्ये अनुल्लेखित आहे की, देशातील मतदान हे मत पत्रिकेवरच घेतले जाईल. तर नव्याने १९८९ मध्ये त्यात करण्यात आलेल्या सुधारणे नुसार एका किंवा काही मतदारसंघातील विशिष्ट परिस्थिती पाहूनच एतच् चा वापर केला जाऊ शकतो असा कायदा असतांना कुठलेही ठोस कारण नसताना देशात सरसगट एतच् चा वापर करणे बेकायदेशीर असून लोकप्रतिनिधी कायदा १९५१ मधील कलम ६१ ची देशात पायमल्ली चालू आहे अशी प्रतिक्रिया प्रा संदीपकुमार देशमुख यांनी दिली.

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हाधिकारी यांच्याहस्ते खंडोबाची पूजा

**परभणी,/प्रतिनिधी-** चंपाषष्ठीनिमित्त शहरातील श्री खंडोबा बाजार येथे शनिवारी (दि.०७) महाराष्ट्राचे कुलदैवत मल्हारी मार्तंड खंडोबाची शासकीय पूजा जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या हस्ते करण्यात आली.

याप्रसंगी तहसीलदार संदीप राजापुरे, मनपा आयुक्त धैर्यशील जाधव, मारोतराव बनसोडे, माजी नगरसेवक सुनीलराव देशमुख, अनंत बनसोडे, अण्णा डिगोळे, शिवाजी बोबडे, सुरेश चांदणे, एकनाथ पारटकर, लक्ष्मण बोबडे, आबासाहेब खुणे, राजेश बालटकर, बबन बनसोडे यांच्यासह समाज बांधव व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच जिल्हाधिकारी गावडे यांनी चंपाषष्ठीनिमित्त संपूणर्र् जिल्ह्यास शासकीय सुट्टी जाहीर केल्याबद्दल त्यांचे श्री खंडोबा देवस्थानच्या वतीने स्वागत करून आभार व्यक्त करण्यात आले.

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त रक्तदान शिबीर

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतरत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रवि सोनकांबळे मित्रामंडळाच्या वतीने शुक्रवारी (दि.६) डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण ९३ दात्यांनी रक्तदान करुन महामानवास अभिवादन केले.

शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी रघुनाथ गावंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक यशवंत काळे, जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. नागेश लखमावार, ज्येष्ठ नेते बी.एच. सहजराव, खमिसा गुलाम मोहम्मद मिठू, मोहम्मद एकबाल, राधाजी शेळके, सतिश कांबळे, प्राचार्य सुरेश सदावर्ते, प्रा. डॉ. भीमराव खाडे, प्रा. डॉ. प्रविण कनकुटे, प्रा. अरुणकुमार लेमाडे, राणूबाई वायवळ, आशाताई मालसमिंदर, शोभाताई सभादिडे, द्वारकाबाई गंडले, छायाताई रतन भराडे, प्रदिप वाहूळे, डॉ.बी.एस. मुंडे, सुधीर साळवे, डी.आर. तुपसमिंदर, भगवान जगताप, विश्वजत वाघमारे, गो.गा. म्हस्के, महेंद्र गाडेकर, राहुल काळे यांची उपस्थिती होती. रक्तदान शिबीरासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे डॉ. संकेत वाघ आणि न्यू लाईफ ब्लड बॅकचे पंकज खेडकर यांचे सहकार्य लाभले.

### मराठवाडा प्राथमिक शाळेत अभिवादन

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शुक्रवारी (दि.०६) नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा प्राथमिक शाळा खंडोबा बाजार शाखेत अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित मान्यवरांच्याहस्ते डॉ. बाबाासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक व्यंकटेश तोरंबेकर तर प्रमुख वक्ते म्हणून माध्यमिक विभागाचे शिक्षक नरेंद्र देशपांडे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना देशपांडे यांनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रीयत्वाचा आदर व सन्मान करून समाज व्यवस्थेत बदल करण्याचा संकल्प करून तो पूर्णत्वास नेला, असे सांगितले. तर तोरंबेकर यांनी, शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे माध्यम आहे, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल माने यांनी तर प्रास्ताविक पवन जाधव यांनी केले. आभार कु. मोहिनी ढाकरगे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. संगीता मोरे, सौ. मीना ढगे, सौ. शिवगंगा तायडे यांनी परिश्रम घेतले.

### संविधान प्रतीचे वितरण करुन महामानवास अभिवादन

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील नालंदा चॅरिटेबल ट्रस्ट संचालित नालंदा विपश्यना केंद्रात महापरिनिर्वाण दिनी संविधान प्रतींचे मोफत वितरण करून संविधानाचे शिल्पकार बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखे अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नालंदाचे उपाध्यक्ष प्रा. अरुणकुमार लेमाडे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून लोकनेते विजयराव वाकोडे, डॉ. भारत नांदुरे, प्रा. निता गायकवाड व प्रा. रफिक शेख यांची उपस्थिती होती. लोकनेते विजयराव वाकोडे यांच्या नेतृत्वाखाली डॉ. भारत नांदुरे हे 'हर घर संविधान' अभियान राबवत असून एक लाख प्रती मोफत वितरित करण्याचा त्यांनी संकल्प केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून ह्या दोघांनी महापरिनिर्वाण दिनी 'नालंदा'ची निवड करीत या ठिकाणी उपस्थित सर्वांना संविधान प्रतिंचे वाटप करुन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोख्या पध्दतीने अभिवादन केले. कार्यक्रमाची सुरुवात धम्मज्योती महिला मंडळाच्या वतीने बुद्ध वंदना आणि भीमस्तुतीने झाली. 'नालंदा'चे भा. ना. इंगळे यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन केले.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# आर पी हॉस्पिटलमध्ये कर्करोग निदान व उपचार केंद्र : आ.डॉ.राहुल पाटील यांची माहिती

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी येथील आरपी हॉस्पिटल येथे आर पी हॉस्पिटल व म ेडीकल कॉलेज आणि मुंबईतील टाटा कर्करोग संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सुसज्ज व अत्याधुनिक कर्करोग निदान व उपचार केंद्र सुरू होणार आहे अशी माहिती आमदार डॉ.राहुल पाटील यांनी दिली.

कर्करोग निदान व उपचारासाठी रुग्णांना मुंबईत टाटा रुग्णालयात जावे लागते, परंतु तेथे दोन ते तीन महिने तपासणीमध्ये वेळ जातो, त्याामुळे कर्क रोगाचा आजार बळावतो उपचारास वेळ मिळत नाहीत म्हणून मराठवाड्यातील रुग्णांसाठी आमदार डॉ. राहुल पाटील यांच्या पुढाकारातून आर पी हॉस्पिटल येथे कर्करोग रुग्णांसाठी निदान व उपचार केंद्र सुरू करण्यात येणार आहे, म ुंबईतील टाटा कर्करोग संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हे केंद्र सुरू होत आहे. या ठिकाणी विविध प्रकारच्या चाचण्या, निदान, अत्याधुनिक तंत्रज्ञान



व सुविधा प्रदान केल्या जाणार आहेत. जगात २०२२ मध्ये कर्करोगाच्या एकूण १९ कोटी नऊ लाख ७६ हजार ४९९ प्रकरणाचे निदान झाले, त्याम ुळे कर्करोगाचे प्रमाण वाढत चालले आहे.कर्करोग प्रतिबंधित केला जाऊ शकतो. त्याची तपासणी आणि सुरुवातीच्या टप्प्यावर उपचार केले जाऊ शकतात.त्यामुळे प्रत्योक देशात कर्करोग रोखणे हे सार्वजनिक आरोग्याचे महत्त्वाचे आव्हान आहे. आमदार डॉ.राहुल पाटील यांनी मराठवाड्यातील पहिले सुसज्ज कर्करोग निदान केंद्र आरपी हॉस्पिटल येथे सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. या केंद्रामुळे परभणी सह संपूर्ण मराठवाड्यातील रुग्णांना मुंबई पुणे जायची गरज नाही. किमोथेरपी, इमिनोथेरपी, कर्करोग शस्त्रक्रिया,रेडिएशन थेरेपी अंतर्गत एक्स्टर्नल बीम रेडिओथेरपी, इंटरनल रेडिओथेरपी, ब्रॅकरी थेरेपी, स्टेरोओटॅक्टीक बॉडी रेडिओथेरपी, टोटल बॉडी इरिएडेशन, इम्युनो रेडीओथेरपी, प्रोटॉन थेरेपी, बोरॉन न्यूट्रॉन कॅप्चर थेरपी तसेच कर्करोगाच्या दृष्टीने आरोग्य सुविधा रुग्णास मिळणार आहेत. त्यामुळे रुग्णांवर होणारा आर्थिक आणि मानसिक ताण कमी होईल. हे कॅन्सर सेंटर कॅन्सरच्या प्रतिबंधक उपाय योजना आणि जागृती कार्यक्रमासही संबंधित आहे.यामुळे लोकांना कॅन्सर बद्दल माहिती मिळेल आणि त्यांना योग्य वेळी उपचार घेण्यास मदत होईल असे आमदार डॉ.राहुल पाटील व आरपी हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेज अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे यांनी सांगितले.



## चिंचोली काळे येथे भागवत सप्ताहास प्रारंभ

**जिंतूर,/प्रतिनिधी :** तालुक्यातील चिंचोली काळे येथे दरवर्षी प्रमाणे भागवत साप्ताहास प्रारंभ झाला आहे. भागवतचार्य ह भ पं गिरीश महाराज रामपुरीकर कथा वाचन करत असून त्यांना लिंबाजी महाराज ठोंबरे, विवेक देशमुख, देविदास वावरे, गणेश उंडेगावकर, ज्ञानेश्वर तळेकर, नागेश जोशी साथ देत आहेत. दैनंदिन कार्यक्रमात काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ आणि रात्री कीर्तन व हरी जागर संपन्न होत आहे.

कीर्तनामध्ये ह भ पं कांता महाराज झरीकर, सचिन महाराज ढोले, तुकाराम महाराज , मधुकर महाराज खापरे, मुकुंद महाराज हिस्सीकार, चांगदेव महाराज कंडारीकर, वैजनाथ महाराज गरड यांचा समावेश आहे. समारोप ह भ पं त्र्यंबक महाराज दास्तापूरकर यांच्याकाल्याच्या कीर्तनाने होणार आहे. प्रारंभच्या दिवशी कुकडे परिवारातर्फे आरती करण्यात आली त्याा सुधाकररावं कुकडे,म धुकररावं कुकडे, माणिकरावं कुकडे, भगवान कुकडे, प्रसाद कुकडे आणि भागोजी कुकडे, दत्तरावं कुकडे, जगनाथ कुकडे, रोहिदास कुकडे, महादेव कुकडे आणि कुकडे परिवाराचा समावेश होता. कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी तर्फे करण्यात आले आहे.

## व्हीजन पब्लिक स्कूलचे विज्ञान प्रदर्शनात घवघवीत यश

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सोनपेठ गटसाधन केंद्र आयोजित तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन दि.५ रोजी संपन्न झाले. हे प्रदर्शन सोनपेठ येथील विश्वभारती प्राथमिक शाळा सोनपेठ येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून गटशिक्षणाधिकारी शौकत पठाण हे उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून व्हिजन पब्लिक स्कूलचे प्राचार्य प्रदीप खटाळ व तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख उपस्थित होते. तसेच परीक्षक म्हणून दिवार , म्हेत्रे, धसकटे हे उपस्थित होते. या विज्ञान प्रदर्शनात तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक गटात एकूण ३५ शाळांनी सहभाग घेतला होता.त्यामधे माध्यमिक गटातून (गणितीय मॉडलिंग आणि संगणकीय विचार) हा प्रयोग व्हिजन पब्लिक स्कूलच्या रितेश पवार याने करून त्याने प्रथम क्रमांक पटकावला. यामध्ये



आर्यन शिंदे व सह शिक्षिका सुनीता पवार यांचा सहभाग होता. तसेच विश्वभारती सेकंडरी स्कूल च्या विद्यार्थ्यांनी (नैसर्गिक शेती) या प्रयोगात द्वितीय क्रमांक मिळविला असून यामध्ये साक्षी मुळी, अनुष्का पवार, शिक्षक बाळू पवार,धीरज जोगदंड,मोईन शेख यांनी सहभाग घेतला होता. या प्रयोगाची जिल्हा स्तर साठी निवड झाली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनीता पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन नागरगोजे यांनी केले. शाळेचे अध्यक्ष डॉ. बबन पवार, सचिव सारिका पवार, प्राचार्य प्रदीप खटाळ , पप्पू पवार, उपप्राचार्य सुरज गायकवाड व शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक वर्गातून विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमात इंद्रायणी शाळा प्रथम

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या वतीने 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियान राबविण्यात येत असून या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात तालुक्यातील मांडाखळी येथील इंद्रायणी प्राथमिक शाळेने तालुक्यातून प्रथम तर सावंगी खु. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने तृतीय क्रमांक मिळवला आहे.

महाराष्ट्रातील प्रत्येक शाळांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा तसेच आनंददायी व प्रेरणादायी वातावरण निर्मिती व्हावी या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियान राबवण्यात येत आहे. हा उपक्रम महाराष्ट्र शासनाच्या वतीने मागील दोन वर्षापासून राबवल्या जात आहे. या उपक्रम ाच्या माध्यमातून केंद्र, तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावरून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढले जातात. या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात सहभागी होणाऱ्या शाळांचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे. त्यामध्ये




इंद्रायणी प्राथमिक शाळा, म ंडाखळी मागील दोन वर्षापासून या उपक्रमात आपला सहभाग नोंदवत आहे. मागील वर्षी परभणी तालुक्यातून तृतीय क्रम ांक मिळाला होता. तर यावर्षी परभणी तालुक्यातून प्रथम क्रम ांक मिळवत राज्य शासनाचे तीन लाख रुपयाचे रोख पारितोषिक मिळवले आहे. याबद्दल संस्था अध्यक्ष प्रा. किरण सोनटक्के व संस्थेच्या सचिव प्रा.सौ. शितल सोनटक्के यांच्या वतीने शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन विशेष सत्कार करण्यात आला. तर सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटप करून आनंद उत्सव साजरा करण्यात आला. इंद्रायणी प्राथमिक शाळेचा तालुक्यातच नाही तर जिल्ह्यात प्रथम क्रमांक आला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करून प्रा. किरण सोनटक्के यांनी सर्व शिक्षकांना व विद्यार्थ्यांना मिळवलेल्या यशस्वीतेबद्दल शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेच्या सचिव प्रा.सौ.शितल सोनटक्केयांच्यासह समन्वयक आर एस चाफे, मुख्याध्यापिका सौ.रोडे एस. आर. मुख्याध्यापक विलास पवार, प्राचार्य एस. पी. कऱ्हाळे, विभाग प्रमुख श्री खाडे व्ही. एल., डाढाळे टी.आर., नवनाथ सोनटक्के आदी मान्यवर उपस्थित होते. प्रस्ताविक सौ. रोडे एस.आर.यांनी केले. सूत्रसंचालन सौ. पुष्पा कदम यांनी तर टी. आर. डाढाळे यांनी आभार मानले.

सावंगी खु. शाळेचेही यश... तालुक्यातील सावंगी खु. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने या उपक्रमात तृतीय क्रमांक पटकाविला आहे. या शाळेत सद्यस्थितीत एकूण ७ शिक्षक कार्यरत असून १०८ विद्यार्थी आहेत. शाळेत नियमितपणे विविध उपक्रम त्यामध्ये , आनंददायी शनिवार, चला शिकूया प्रयोगातून विज्ञान, तारखेनुसार पाढे, दररोज इंग्रजी शब्द पाठांतर, अभ्यास गट इत्यादी उपक्रम घेतले जातात. शाळेसाठी सावंगी खु. गावच्या सर्व गावकऱ्यांची भरपूर प्रमाणात मदत असते. नुकतेच शाळेच्या कंपाउंड वॉलवर एकूण १०८ चित्र तयार करण्यात आलेली असून यामध्ये शालेय उपयोगी चित्रे काढण्यात आलेली आहे

## मौ.अंगलगावला वनराई बंधाऱ्याचे काम पूर्ण



**जिंतूर,/प्रतिनिधी-** मौजे अंगलगाव ता. जिंतूर तेथे तालुका कृषी अधिकारी श्री शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसहभागातून वनराई बंधारा बांधण्यात आला सदर बंधारा हा २५० बॅगचा असून जवळपास ४ तास ५० गावकऱ्यांनी श्रमदान केले. बंधारा तयार करण्यास एकही रुपया खर्च न करता टाकावू वस्तूपासून तयार करण्यात आला.

बंधाऱ्यात ५० फूट रुंद , ६०० फूट लांब आणि जवळपास ५ फूट खोल एवढा पाणी साठा होणार आहे त्यामुळे सभोवतालच्या शेतकऱ्यांना गहु, ज्वारी व हरभरा या पिकांना संरक्षित पाणी देण्यासाठी उपलब्ध होऊन जवळपास १५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे त्यामुळे सभोवतालची पाणी पातळी वाढून शेतकऱ्यांच्या उत्पादनात नक्कीच वाढ होणारं आहे. अशा प्रकारचे गावात १० वनराई बंधारे बांधण्याचे गावकऱ्यांनी संकल्प केला असून लवकरच ते पूर्ण करणार आहेत. वनराई बंधारा तयार करण्यासाठी कृषी सहाय्यक श्री जी. टी. राठोड व शेती शाळेतील शेतकरी यांनी श्री किशोर शेळके मंडळ कृषि अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करून गावकऱ्यांच्या मदतीने बंधारा पुर्ण केला. याकामी गावातील सरपंच, माजी सरपंच, पोलीस पाटील, प्रगतशील शेतकरी, शेती शाळेतील सर्व शेतकरी आणि कृषी विभागातील कर्मचारी यांनी सर्वांनी परिश्रम घेतले.

# जिंतूर तालुक्यातील पाच हजार कुंटूंबाचे रोजगारासाठी स्थलांतरण- निवडणूकीनंतर बेरोजगारांचा लोंढा महानगरांकडे

**परभणी,/प्रतिनिधी:** जिंतूर- सेलू विधानसभेची निवडणूक संपल्यानंतर हाताला काम नसलेल्या बेरोजगार तरूणांचा लोंढा आता रोजगारासाठी मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक या महानगरांकडे पाच हजार कुटुंब धाव घेत असल्याचे दिसून येत आहे. परंतु या बेरोजगारांच्या लोंढ्याला आडविण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी उद्योगधंदे नसल्याची मोठी शोकांतिका आहे.

जिंतूर तालुका हा टंचाईग्रस्त तालुका म्हणून ओळखला जातो. या तालुक्यामध्ये खरीप पेरणी झाल्यानंतर शेतकऱ्याच्या हाताला काम उरत नाही. डोंगरपट्ट्यामध्ये शेती सिंचनासाठी पाणी नाही. येलदरी मोठे धरण जिंतूर तालुक्यात असून त्या धरणाचा येथील शेतकऱ्यांना एक गुंठाभर सिंचनासाठी सुद्धा फायदा होत नाही. सदरील तलावाच्या धरणातील पाणी औंढा नागनाथ ,वसमत ,सेनगाव, हिंगोली ,नांदेड या जिल्ह्यांना मोठ्या प्रमाणात होत आहे. पाण्याची कमतरता असल्याने अनेक मजूर ऊसतोड काम करण्यासाठी कारखान्याची उचल घेऊन स्थलांतरित झाले आहेत. तर बेरोजगार तरुणांना हाताला काम नसल्याने दिवाळीनंतर तरुण स्वतः च्या कुटुंबाची उपजीविका भागविण्यासाठी पुणे, मुंबई, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक या महानगरांमध्ये स्थलांतरित होत असताना दिसून येत आहे. एकंदरीत जिंतूर तालुक्यामध्ये दिवाळीनंतर व खरीप हंगाम संपल्यानंतर गावपातळीवरील मजूर गावामध्ये काम मिळत नसल्याने गेल्या अनेक वर्षांपासून विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर घेत उपजिविकेसाठी कामधंद्यांच्या शोधार्थ ५००० हजार कुटुंब महानगरे जवळ करतात. यावर्षी विधानसभा निवडणूक असल्याने त्यांना जाण्यास थोडा विलंब झाला. निवडणुकीत प्रचाराच्या माध्यमातून थोडाफार रोजगार मिळाला होता. या निवडणुकीमध्ये अनेक बेरोजगारांना आमिषे दाखवून मोठ्या प्रमाणामध्ये मतदान करण्यासाठी प्रभावित केली होते .आता निवडणूक झाली, निकाल लागला. त्यामुळे हंगामी रोजंदारीप्रमाणे इतके दिवस प्रचारात गुंतलेले तरूण आता रोजगाराच्या शोधार्थ मुंबई, पुण्याची वाट धरीत आहेत. अनेक बेरोजगार तरुण व मजूर हाताला काम मिळावे यासाठी स्थलांतर होत असताना दिसून येत आहेत. प्रशासनाकडून तात्काळ रोजगार हमीची कामे सुरू केल्यास मजुरांचे स्थलांतर थांबेल व गावपातळीवरील बेरोजगार तरुणांना हाताला काम



मिळाल्यास गाव सोडण्याची वेळ येणार नाही, अशी प्रतिक्रिया गाव पातळीवरील तरुणांमध्ये ऐकाव्यास मिळत आहे.

तालुक्यात मोठा उद्योग नसल्याने बेरोजगारांची अडचण जिंतूर तालुक्यात २०० लोकांना रोजगार मिळेल असा एकही उद्योग नाही जिंतूर तालुका हा डोंगराळे तालुका असून सदरील तालुक्यामध्ये मोठा उद्योग नसल्याने मजुरांना कामासाठी वन वन भटकावे लागत आहे.शासनाच्या वतीने मोठा उद्योग उभारणे महत्वाचे आहे.

पाचशे लोकांना रोजगार मिळणारा कारखाना बंद मैनापुरी खत कारखाना जिंतूर तालुक्यात मागील २० वर्षांमध्ये स्थापन झाला होता .परंतु सदरील कारखाना बंद असल्याने मजुरांना रोजगार उपलब्ध नाही .तसेच एमआयडीसी मध्ये मागील वीस वर्षांपूर्वीच दूधडेरी चे संकलन करणारा कारखाना शासनाच्या वतीने चालू केला होता .तोही कारखाना बंद अवस्थेत आहे.

# नगर परिषदेने अवास्तव व अन्यायकारक मालमत्ता कर मागे घ्यावा

## शहरातील व्यापारी, मालमत्ताधारक, पत्रकारांची मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ डिसेंबर.**
नगरपरिषद हिंगोलीच्यावतीने शहरातील मालमत्तांधारकांना २०२४-२५ ते २०२७-२८ या चतूर्थ वार्षिक प्रस्तावित कर आकारणी करण्या करता महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम ११९(१) व १२४ अन्वये नोटीसा देण्यात येत आहेत. सदरील मालमत्ता कर आकारणी अवास्तव आणि अन्यायकारक असल्यामुळे ती मागे घेण्यात यांवी अशी मागणी शहरातील व्यापारी, मालमत्ताधारक तसेच पत्रकारांनी सोमवार दि ९ डिसेंबर रोजी मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांचेकडे केली आहे. यावेळी मुख्याधिकारी मुंढे आणि निवेदनकर्ते यांच्यात सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

निवेदनात करवाढी संदर्भात वृत्तपत्रात नोटीस प्रसिद्ध केली आहे. त्यात कलम ११८ व ११९ एकत्रित मालमत्ता कर निर्धारण नोटीसीचे प्रकाशन केलेले आहे असे नमूद असले तरी प्रत्यक्षात वाटप करण्यात येत असलेल्या नोटिसीवर कलम ११९ व १२४ अन्वये च्या कलमांच्या असलेल्या वाटप करण्यात येत आहे. वास्तविक पाहता कलम ११९ प्रमाणे आक्षेप दाखल केल्यानंतर कलम १२० प्रमाणे आक्षेपावर कार्यवाही करण्याकरता प्राधिकृत मूल्यनिर्धारण अधिकारी यांच्याकडे सदरचे आक्षेप पाठवून त्यावर सुनावणी झाल्यानंतर सदरची करनिर्धारण यादी दुरुस्त करून नगर परिषदेकडे कलम १२१ अन्वये यादीचे अधिप्रमाणान करून परत पाठवल्यानंतर मालमत्ताधारकांना पाहण्यासाठी खुली करण्यात येते याकरिताची नोटीस पण प्रसिद्ध करणे आवश्यक असते, कलम १२२ प्रमाणे अधिप्रमाणान यादी निर्णायक असली तरीही कर निर्धारण यादीत कलम १२३ प्रमाणे दुरुस्ती करण्याची तरतूद सदर अधिनियमात आहे असे असताना आपण या प्रक्रियेतील महत्त्वाचे टप्पे कमी केलेले आहेत जे नियमबाह्य व अधिनियमाच्या विरुद्ध आहेत.

तसेच आपण याबाबतीत वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या नोटिस मध्ये ज्यांना आक्षेप दाखल करायचे असतील त्यांनी संपूर्ण थकबाकीची रक्कम भरल्याशिवाय अक्षेप दाखल करण्यात येऊ नये असे अक्षेप स्वीकारण्यात येणार नाही असे नमूद केलेले आहे ते मालमत्ता धारकांच्या मूलभूत अधिकारांच्या विरूद्ध व अन्यायकारक आहेत नगरपरिषद अधिनियमात अशी कोणती हि तरतूद नाही.

ज्या जुन्या इमारती आहेत त्यांचे वर कर लावतांना त्या इमारतीच्या आयुष्यमाना प्रमाणे त्यावर घसारा काढून व ते वजा करून त्याचे भाडे मूल्य ठरविणे आवश्यक असताना तसे करण्यात आलेले नाही तसेच आपण जे उपकर लावलेले आहेत. त्याचे दर जरी शासनाने निर्धारित केलेले असले तरीही ते लावण्यापूर्वी जी प्रक्रिया राबविल्या जाते ती पाहणे पण आवश्यक ठरते कारण कांही कर निवासी व अनिवासेतर मालमत्तांना लागू होतात व काहींना नाही त्यामुळे हे म्हणणेही चुकीचे आहे की उपकरावर अक्षेप घेण्यात येऊ नयेत.सदर नोटीसांतील कर आकारणी पाहता शहरातील मालमत्ता धारकांवर अन्याय करणारी व अवास्तव असल्याचे स्पष्ट होत आहे.

ही प्रक्रिया राबविताना सदर अधिनियम, कायदे, शासन आदेश यांचे कडे दुर्लक्ष केले असल्याचे पण दिसून येत आहे ज्यामुळे सदरची कर प्रकरणे न्यायालयीन प्रक्रियेत अडकून नगरपरिषदेच्या कर संकलनावर पण मोठा परिणाम होणार आहे.

सध्या नगरपरिषदेवर शासन नियुक्त प्रशासकीय अध्यक्ष आहेत. लोकप्रतिनिधी कोणीही नसल्यामुळे मालमत्ता धारकांची बाजू मांडण्याकरता आज रोजी नगरपरिषद अस्तित्वात नाही तसेच सदर अधिनियमात उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जी अपिलीय समिती असते त्यामध्ये नगरपरिषदेचे नगर सेवक प्रतिनिधी असावेत अशी स्पष्ट तरतूद आहे परंतु सध्या नगर परिषद अस्तित्वात नसल्यामुळे लावले जाणारे कर हे एकतर्फी व मालमत्ता धारकावर अन्याय करणारे ठरणार आहेत. त्यामुळे जोपर्यंत लोकनियुक्त नगरपालिका अस्तित्वात येत नाही तोपर्यंत कर वाढ करण्यात येऊ नये. शहर विकासासाठी कर आकारणी करणे आवश्यक आहे हे सत्य असले तरीही सध्या प्रस्तावित मालमत्ता कर आकारणी ही अवास्तव व अन्याय्यकारक असल्याने ती मागे घेण्यात यावी अशी मागणी शहरातील मालमत्ताधारक यांच्या वतीने करण्यात यावी अन्यथा शहरातील व्यापारी, नागरिक, पत्रकार, मालमत्ताधारक यांना नाईलाजाने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

निवेदनावर माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, सुधीरअप्पा सराफ, अनिल नैनरवाणी, माबुद बागवान, जगजीतराज खुराणा, पत्रकार नंदकिशोर तोष्णीवाल, प्रकाश इंगोले, धोंडीराज पाठक, व्यापारी कैलाशचंद्र काबरा, शाम खंडेलवाल, प्रशांत सोनी, सुदर्शन कंदी, दिनेश बगडीया, बाबा घुगे, मधुसुदन बगडिया, रजनीश पुरोहीत, महेश मोकाटे, मिलींद उबाळे, राजु जोशी, सुमीत चौधरी, बालाजी कल्याणकर, सचिन निलावार, विकास काप्रतवार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**नियमानुसारच मालमत्ताधारकांना कलम ११९ च्या नोटीसा– मुख्याधिकारी मुंढे**

व्यापाऱ्यांना देण्यात आलेल्या कलम ११९ नुसार नोटीसांचा हेतू घर कच्चे, टीनशेड किंवा पक्के आरसीसीचे आहे. त्याचा वापर किती आहे, वापर कर्मिशियल किंवा निवासासाठी आहे याचे तपशीलवार देण्यासाठी आहे. यावर मालमताधारकांना काही आक्षेप असेल तर ३० दिवसांच्या आत आक्षेप नोंदविण्यासाठी कालावधी देण्यात आला आहे. २४ डिसेंबरपर्यंत सूचना, हरकती, आक्षेप देऊ शकतात. त्यावर पुन्हा निर्णय घेतल्या जाईल, सुनावणी धेतल्या जाईल. कर योग्य मुल्यावर एमफसी ॲक्टनुसार २२ ते २७ टक्के कर आकारण्यात येतो. हिंगोली नगर पालिकेने त्यावर २४ टक्के टॅक्स आकारला आहे. मागीलवेळी २५ टक्के कर आकारला होता. रेड अक्षरात दिलेला कर मालमत्ता धारकांना आकारण्यात येणार आहे. कर योग्य मुल्यावर २४ टक्के मालमत्ता कर, १ टक्का वृक्षकर, शिक्षण कर आणि रोजगार उपकर आकारल्या जातो, अशी माहीती मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी दिली आहे.

# मराठा सेवा संघाच्यावतीने राष्ट्रमाता जिजाऊ व्याख्यानमाला



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ डिसेंबर**
मराठा सेवा संघ व सलग्निक कक्षाच्या वतीने गेल्या पंचवीस वर्षापासून हिंगोली येथे राष्ट्रमाता राजमाता मासाहेब जिजाऊ व्याख्यानमालेचे अविरतपणे आयोजन करण्यात आले आहे, यंदा दिनांक ५ जानेवारी ते ७ जानेवारी दरम्यान कै. शिवाजीराव देशमुख सभागृहात ही व्याख्यानमाला पार पडणार आहे.

दरवर्षी हिंगोलीत राष्ट्रमाता राजमाता मासाहेब जिजाऊ व्याख्यानमालेचे आयोजन जानेवारी महिन्यात करण्यात येते, त्याबाबत व्याख्यानमालेच्या पूर्वतयारीसाठी स्मृतीशेष ॲड. प्रल्हादराव उमरेकर विद्यार्थी वसतिगृहात बैठक संपन्न झाली, यंदा व्याख्यानमालेचे २६ वर्ष असून दिनांक ५ ते ७ जानेवारी दरम्यान व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवस वेगवेगळ्या विषयावर महाराष्ट्रातील नामवंत व्याख्याते प्रबोधन करणार आहेत. भारतीय संविधानाला ७५ वर्षे झाल्याबद्दल तसेच मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांना ७५ वर्षे होत असल्याने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्याची तयारी बैठकीत करण्यात आली आहे. वेगवेगळ्या समित्या करून कार्यक्रमाची जबाबदारी देण्यात आली आहे. नियोजन बैठकीला संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे, खंडेराव सरनाईक, सुधाकर इंगोले, राजकुमार वायचाळ, सुधाकर बल्लाळ, पंडित शिरसाट माधव जाधव, विश्वास वानखडे, सोमनाथ इंगोले यांची उपस्थिती होती.



**हिंगोली– येथील नगर पालिकेतील कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापनच्या पथकाने आपत्तीवेळी करावयाच्या सुरक्षेच्या उपाययोजनांचे प्रशिक्षण दिले. यावेळी नगर पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी प्रात्यक्षिकात सहभाग घेतला होता. छाया– विजय गुंडेकर**

# हिंगोलीत काँग्रेसच्यावतीने ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहीम



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ९ डिसेंबर**
महाराष्ट्रात प्रदेश काँग्रेसने ईव्हीएम हटवून बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यासाठी स्वाक्षरी मोहीम सुरु केली असून ईव्हीएम विरोधातील लढाई काँग्रेस ताकतीने लढणार असल्याचे प्रतिपादन आमदार प्रज्ञाताई सातव यांनी केले.यावेळी महाविकस आघाडीच्या हिंगोली विधानसभा मतदार संघाच्या उमेदवार माजी सभापती रुपालीताई पाटील गोरेगावकर उपस्थित होत्या.

शहरातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन रविवारी स्वाक्षरी मोहीमेची सुरुवात करण्यात आली यावेळी माजी शहराध्यक्ष बापुराव बांगर,जिल्हा उपाध्यक्ष सुरेश सराफ,कृउबा सदस्य शामराव जगताप,सेवादल जिल्हाध्यक्ष सुदाम खंदारे, जिल्हा उपाध्यक्ष विलास गोरे, माजी नगरसेवक अनिल नेनवाणी,विद्यार्थी काँग्रेस जिल्हाध्यक्ष जुबेर मामु, अल्प संख्यांक सेलेचे अध्यक्ष साद अहमद, माजी नगरसेवक माबुद बागवान, गजानन देशमुख, बासीत मौलाना, आरेफ लाला, मुजीब कुरेशी, बंटी नागरे, अजय बांगर, आबेदअली जहागीरदार, मिलींद उबाळे, प्रशांत बाहेती, फेरोज पठाण, अश्विन मुदीराज, चंदु प्यारेवाले, अक्षय डाखोरे, शेख अजीम उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### नेत्रदान केल्याबद्दल लदनिया परिवाराचा सत्कार



हिंगोली– शहरातील प्रसिध्द व्यापारी सुभाष लदनिया यांच्या कुटुंबातील इंद्रमणी लदनिया यांनी मरणोत्तर नेत्रदान केले. नेत्रदानामुळे अखिल भारतीय मारवाडी महिला संघाच्यावतीने लदनिया परिवारातील सदस्यांचा सत्कार करण्यात आला. नेत्रदानामुळे दोन दृष्टीहीन लोकांना दृष्टी मिळणार आहे. या समाज कार्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले. यावेळी सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी ज्येष्ठ व्यापारी सुभाष लदनिया यांचा सत्कार करतांना शाखा अध्यक्ष अर्चना सोनी, सचिव प्रीती खंडेलवाल, विजया अग्रवाल, किरण बडजाते, संजय खंडेलवाल, गोपाल लदनिया, निलेश लदनिया, राहुल लदनिया, सौ निर्मलादेवी लदनिया, सौ उषादेवी लदनिया, सौ प्रीती लदनिया आदींची उपस्थिती होती.

### हिंगोलीत हळदीला १० ते १४ हजार रूपये भाव

हिंगोली– येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हळदीला १० हजारापासून ते १४ हजारापर्यंत प्रतिक्विंटल भाव मिळत आहे. त्यामुळे सोमवारी येथील संत नामदेव मार्केट यार्डमध्ये सुमारे ३ हजार क्विंटल हळदीची आवक आली आहे. सध्या हिंगोली बाजार समितीत हळदीला चांगला भाव मिळत असल्याने मोठ्या प्रमाणावर शेतकरी हळद विक्रीसाठी आणत असल्याचे दिसत आहे.

### बांग्लादेशातील हिंदुवरील अत्याचाराविरोधात आज हिंगोलीत जन आक्रोश मोर्चा

हिंगोली– मागील अनेक दिवसांपासून बांग्लादेशातील हिंदुवर तेथील कट्टरपंथीय आणि जिहाद्यांकडून हिंदू महिला, तरूण मुली यांच्यावर अत्याचार तसेच तरूण मुले, वृध्द यांच्यावर प्राणघातक हल्ले होत आहेत. हिंदू धर्मियांच्या मंदिरावर हल्ले करून हिंदू धर्माच्या भावना दुखावल्या जात आहे. दिवसेंदिवस हिंदूवर होणाऱ्या हल्ल्यामध्ये आतापर्यंत अनेकांना प्राण गमवावे लागत असून हिंदू तेथे असुरक्षित आहेत. तेथील सरकार कट्टरपंथीयांच्या बाजूने असल्याचे दिसत आहे. हिंदूवर होणाऱ्या अत्याचाराचा विरोध करण्यासाठी हिंगोलीत दि १० डिसेंबर रोजी जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून हा मोर्चा येथील गांधी चौकातून सकाळी १० वाजता निघणार आहे. या मोर्चात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, भाजप तसेच इतर हिंदुत्वावादी संघटना सहभागी होणार असून या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. यावेळी जिल्हाधिकारी यांना निवेदने सादर करण्यात येणार आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ध्वजदिन निधी संकलन कार्यक्रमाचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ डिसेंबर**
येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात ध्वजदिन निधी संकलन कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे, माहीती अधिकारी प्रभाकर बारहते, नायब तहसीलदार सचिन जोशी, बोथीकर, प्राचार्य व्ही एस कनवटे, प्राचार्य जे एस भोयर, सय्यद मीर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्ह्यातील विविध कार्यालयाचे प्रमुख, माजी सैनीक, विधना पत्नी, तसेच अवलंबीत यांचीही उपस्थिती होती. सन २०२३ मध्ये ध्वजनिधीचे उत्कृष्ट संकलन करणाऱ्या कार्यालय प्रमुचांना स्मृतीचिन्ह आणि प्रशस्ती पत्र देऊन गौरविण्यात आले. सुत्र संचालन प्रा नागोराव इंगोले यांनी तर आभार सुरेश भालेराव यांनी मानले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वाढीव कराला स्थगिती देण्याचे आदेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ डिसेंबर**
हिंगोली विधानसभेचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी हिंगोली नगर परिषदेने यावर्षी आकारलेल्या वाढीव मालमत्ता करास स्थगिती द्यावी अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे निवेदनाद्वारे केली होती. या मागणीचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी दखल घेत करवाढीस तात्पुरती स्थगिती देऊन तातडीने नव्याने कर धोरण करण्याबाबतचे आदेश दिले असल्याची माहीती भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिली आहे.

यासंदर्भात भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले होते. त्यामध्ये यावर्षी नगर परिषदेने हिंगोलीतील मालमत्ता धारकांना नियमबाह्य मालमत्ता करात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त होत आहे. हिंगोली नगर परिषदेने करात वाढ करतांना सहा पटीने वाढ करून घरपट्टीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ केलेल्या करवाढीप्रमाणे योग्य अपीलीय अधिकारी यांचेकडे दार मागण्यासाठी वेळ देण्यात आली नसल्याने हिंगोली येथील व्यापारी, मालमत्ताधारक, पत्रकार तसेच सर्वसामान्य नागरिक यांच्यामध्ये प्रचंड नाराजी आहे. त्यामुळे या करास स्थगितीची मागणी करण्यात आली होती. वाढीव करवाढीस तत्काळ स्थगीती देऊन नव्याने कर धोरण करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली. या मागणीची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेत करवाढीस तात्पुरती स्थगिती देऊन तातडीने नव्याने कर धोरण करण्याबाबतचे आदेश दिले आहेत. या आदेशानंतर नगर परिषदेची काय भूमिका असेल याकडे शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# सांदीपनी पब्लीक स्कूलमध्ये महापरिनिर्वाण दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ डिसेंबर**
संदीपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर तरोडा (बु) नांदेड येथे महापरिनिर्वाण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर शाळेतील सहशिक्षिका सौ. सुकेक्षनी गव्हाणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्य सर्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. जयदीप पवळे, रितेश वानखेडे, कु. आराध्या कदम, कु. मनस्वी अन्नमवार, कु. शौर्या गायकवाड, कु. प्रीतीका कोकरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार भाषणामधून थोडक्यात सांगितले.

या कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, सौ. रेश्मा विपुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखाले यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खंडेराव जोगदंड यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.